नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५५ * अंक १२२ * * नागपूर * बुधवार, दिनांक ३० जुलै २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## खेवलकरसह पाच जणांना दोन दिवसांची पोलीस कोठडी

पुणे, दि. २९ प्रतिनिधी

संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडवून देणाऱ्या हाय-प्रोफाइल पुणे रेव्ह पार्टी प्रकरणी आज शिवाजीनगर न्यायालयात महत्त्वपूर्ण सुनावणी पार पडली. याप्रकरणी मुख्य आरोपी प्रांजल खेवलकरसह पाच जणांना दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे, तर दोन महिला आरोपींना न्यायालयीन कोठडीत पाठवण्याचा आदेश न्यायालयाने दिला. या निकालामुळे आता प्रकरणाच्या तपासाला नवी दिशा मिळण्याची शक्यता आहे. आजच्या सुनावणीवेळी राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रोहिणी खडसे आणि ठाकरे गटाच्या नेत्या रुपाली पाटील ठोंबरे यांनी वकिलाच्या भूमिकेत कोर्टात हजेरी लावल्याने या प्रकरणाला आणखी महत्त्व प्राप्त झाले होते.

अग्रलेख
खरीखरी

## मालदीवची मैत्री

आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी नुकतेच मालदीवला जाऊन आले. मालदीवचे राष्ट्रपती मोहम्मद मोईज्जू घोर भारत विरोधी होते. भारतासोबत कट्टर दुश्मनी दाखवून हे महाशय निवडून आले होते पण आता त्यांचे भारत प्रेम अक्षरशा उतू चाललेले आहे. त्यांनी यावर्षी मालदीवच्या स्वातंत्र्य दिनाचा जो कार्यक्रम असतो त्याला मुख्य अतिथी म्हणून आपल्या भारताचे पंतप्रधान मोदी यांना बोलावले होते. आपण भारताविरुद्ध इतके बोल बोल बोललो आहोत की आता त्याची भरपाई केल्याशिवाय आपला निभाव लागणे शक्य नाही हे कदाचित त्यांना कळले असावे. त्यामुळेच हे मोहम्मद मोईज्जू यांनी आपल्या पंतप्रधानांच्या स्वागतामध्ये स्वतःला आपल्या मंत्रिमंडळासह झोकून दिले होते. आपण म्हणजे भारताने पुरवलेले दोन हेलिकॉप्टर आणि एक डोनियर एअरक्राफ्ट यांच्या माध्यमातून तातडीची सेवा देण्यासाठी भारतीय सेनेचे काही अधिकारी आणि सैनिक मालदीव बेटावर होते. हे सर्व सैनिक भारताने परत बोलवावे. या परकीय सैनिकांना आमच्याकडे राहण्याचा कोणताही अधिकार नाही असे मौकापरस्त विधान करून त्यांनी भारताला डिवचण्याचा प्रयत्न केला होता. अर्थात हे सर्व त्यांच्या चीन प्रेमापाई घडले होते हे साऱ्या जगाला ठाऊक झालेले आहे. हे मालदीवचे राष्ट्रपती निवडून यायच्या आधी आणि निवडून आल्यानंतर चीनच्या प्रेमात आकंठ बुडालेले होते, कारण राष्ट्रपती झाल्याबरोबर त्यांचा पहिला दौरा चीनचाच होता. यापूर्वी या देशाचे सर्वोच्च नेते सर्वात प्रथम भारतात येत होते पण राष्ट्राध्यक्ष होताच मोहम्मद मोईज्जू यांना भारताचा द्वेष करण्याची कावीळच झालेली होती. पण वनराज वनराज असतो. या ठिकाणी वनराज म्हणजे भारत आहे. हा वनराज भारत चिमुकल्या इकडून तिकडे उडणाऱ्या माशांना कशासाठी बरे मारणार, त्यामुळे आपण त्याविरुद्ध एक शब्दही बोललो नाही. खरे तर चीनला भारताचे सैनिक हाकलून त्यावेळी मालदीवच्या जवळ आपले सैनिक पाठवायचे होते असे म्हणतात. आता जरा भौगोलिक परिस्थिती पाहूया. आपल्या लक्षद्वीप पासून मालदीव हे अंतर नागपूर ते नाशिक एवढेच आहे. मालदीवचे सामरिक दृष्ट्या महत्त्व आपल्याला ठाऊक होते. त्यामुळे आपण आणि आपल्या देशाने ते संबंध जपण्याचा प्रयत्न केला. त्याच वेळी चीनपरस्त मालदीवलाही भारताचे महत्त्व जाणवून देणे तितकेच गरजेचे होते. मोहम्मद मोईज्जू यांच्या विधानानंतर भारताने आपले पर्यटक आणि प्रवासी मालदीवला पाठवले बंद केले आणि मालदीवचे धाबे प्रचंड दणाणले. भारतीय पर्यटकांच्या भरवशावरच त्या देशाची मदार होती आणि आहे. त्यानंतर मालदीवच्या राष्ट्राध्यक्षांना साक्षात्कार झाला. आपल्या मंत्रिमंडळातील भारत विरुद्ध गरळ ओकणाऱ्या तीन मंत्र्यांना त्यांनी काढून टाकले. मग मोहम्मद मोईज्जू यांनी भारताला भेट दिली आणि आपण तुमच्या मागे ठामपणे उभे राहू हा विश्वास दिला. कारण ज्या देशाला म्हणजेच भारताला वैरी समजले, तो भारत आपल्याला मदत करतो आणि ज्याला सच्चा मित्र समजले तो चीन फक्त आपल्याकडून नफा कमवू इच्छितो असे दिसून आल्यावर मालदीवच्या राष्ट्राध्यक्षांचे डोळे उघडले. भारताने मालदीवला बरीच मोठी कर्जाऊ रक्कम दिलेली होती. ती देता येणे मालदीवला शक्यच नव्हते म्हणून भारताने मुदत वाढवून दिली होती. मालदीव सध्या भीषण आर्थिक संकटात आहे. त्यामुळेच आता भारताच्या उदार सहकार्याची त्याला गरज आहे. भारत हा उदारमतवादी देश आहे आणि आपल्या शेजाऱ्याबरोबर निरपेक्षपणाने चांगले संबंध ठेवू इच्छितो हे त्यांना आता कळून चुकले आहे. मालदीव मध्ये मैत्रीचे आभासी दिवे लावणाऱ्या चीनचे खरे रूप कळाल्यावर भारतच आपला भाग्यविधाता ठरणार आहे हे मालदीवला कळून चुकले आहे. पंतप्रधान मोदी यांनी मालदीवच्या स्वातंत्र्यदिनी आपली उपस्थिती दर्शवून दोघांच्याही परस्पर प्रेमाच्या धाग्याला मजबुती देण्याचे काम केलेले आहे. मोक्याच्या ठिकाणी असलेल्या मालदीवच्या बेटाला भारताची जी मैत्री लाभली आहे ती यापुढे मालदीव आणि भारतालाही लाभदायक ठरणार यात शंका नाही. इति मालदीव कुराण !

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

# अखेरची संधी! एकही चूक खपवून घेतली जाणार नाही

## मुख्यमंत्री फडणवीस यांचा मंत्र्यांना इशारा

मुंबई, दि. २९ प्रतिनिधी

राज्यातील मंत्र्यांच्या वादग्रस्त वर्तनावर अखेर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी थेट लक्ष घातले असून, मंत्रिमंडळ बैठकीनंतर तब्बल २० मिनिटे फक्त मंत्र्यांचा "क्लास" घेतला. सरकारची विश्वासार्हता, जनतेतील प्रतिमा आणि माध्यमांत सरकारबद्दल निर्माण होणारी नकारात्मक चर्चा यामुळे मुख्यमंत्री प्रचंड नाराज झाले आहेत. "वादग्रस्त विधाने, चुकीच्या कृती आणि बेफिकीर वर्तन आता अजिबात खपवून घेतले जाणार नाही! ही अखेरची संधी आहे, त्यानंतर जी कारवाई करायची ती निःसंकोचपणे करणार!" असा रोखठोक इशारा मुख्यमंत्री फडणवीस यांनी सर्व मंत्र्यांना दिला आहे.



### सरकारच्या बदनामीला कंटाळलो!

पावसाळी अधिवेशनादरम्यान काही मंत्र्यांच्या अजब वक्तव्यांमुळे सरकार अडचणीत आले. काहींच्या वर्तनावरुन पक्षाच्या शिस्तीचे आणि नीतीधर्माचे धिंडवडे निघाले. त्यावर आज फडणवीस यांनी थेट शब्दांत आणि स्पष्ट भाषेत नाराजी व्यक्त करत सत्ताधाऱ्यांच्या बेजबाबदार वर्तनावर आक्रमकपणे कारवाईचा इशारा दिला.

बैठकीनंतरचा हा क्लास इतका तीव्र होता की "आता एकही प्रकार सहन केला जाणार नाही," ही स्पष्ट भूमिका त्यांनी अधोरेखित केली. "सरकार कुणाच्या खाजगी मतांवर चालत नाही. व्यक्तिगत विधानांमुळे जर सरकारची बदनामी होते, तर ती जबाबदारी वैयक्तिक नव्हे, संपूर्ण मंत्रिमंडळावर येते!" – असे सांगत त्यांनी मंत्र्यांना चाप लावण्याचा संदेश दिला.

राजकीय वर्तुळात या घडामोडींची मोठी चर्चा असून, काही मंत्र्यांचे नावं घेऊन संभाव्य कारवाई होणार असल्याचेही सुत्रांकडून समजते. मुख्यमंत्री फडणवीस हे मुख्यमंत्री असले तरी, भाजपच्या "डॅमेज कंट्रोल" टीमचेही नेतृत्व करताना दिसत आहेत. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर, वादग्रस्ततेपासून दूर राहण्याचे आणि शिस्तबद्ध वागणूक ठेवण्याचे आदेश आता मंत्रिमंडळाला दिले गेले आहेत.

एकूणच, हा इशारा म्हणजे मंत्र्यांना मिळालेली 'लास्ट वॉर्निंग' आहे. आता कुणाचा पाय घसरला तर त्याची थेट किंमत पदावरुन जाण्याचीही असेल – हे मुख्यमंत्री फडणवीसांच्या विधानावरून स्पष्ट दिसत आहे.

# दहशतवाद्यांचा धर्म बघून कोणी दुःखी होऊ नका

## गृहमंत्री अमित शहा यांचा विरोधकांवर 'स्ट्राईक'

नवी दिल्ली, दि. २९ प्रतिनिधी

'ऑपरेशन महादेव' अंतर्गत सोमवारी सुरक्षा दलांच्या संयुक्त कारवाईत तीन दहशतवादी मारले गेले. यापैकी सुलेमान लष्कर-ए-तोयबाचा कमांडर होता आणि पहलगाम हल्ल्यात सहभागी होता. आमच्या एजन्सींकडे याचे पुरावे आहेत. इतर दोन दहशतवादी देखील ए ग्रेड दहशतवादी होते. पहलगाममध्ये आपल्या लोकांना मारणाऱ्या तिन्ही दहशतवाद्यांना मारले आहे. मला वाटले दहशतवाद्यांना मारलेलं पाहून विरोधक आनंदी होतील. दहशतवाद्यांचा धर्म बघून कोणी दुःखी होऊ नका, अशा शब्दात गृहमंत्री अमित शहा यांनी लोकसभेत विरोधकांवर 'स्ट्राईक' केला.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी लोकसभेत ऑपरेशन सिंदूरवर बोलताना पहलगाम दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या लोकांबद्दल शोक व्यक्त केला. त्यानंतर त्यांनी ऑपरेशन सिंदूर आणि त्यानंतरच्या घटनांमध्ये मृत्युमुखी पडलेल्या आणि जखमी झालेल्या लोकांबद्दलही शोक व्यक्त केला. अमित शाह म्हणाले की, 'पहलगाम दहशतवादी हल्ला दुपारी १ वाजता झाला आणि मी संध्याकाळी ५:३० वाजता श्रीनगरमध्ये उतरलो होतो. २३ एप्रिल रोजी सुरक्षा बैठक झाली, सर्व सुरक्षा दलांसोबत झालेल्या या



बैठकीत असा निर्णय घेण्यात आला की पहलगाम दहशतवादी हल्ल्यातील आरोपी पाकिस्तानात पळून जाऊ नयेत आणि आम्ही त्यासाठी व्यवस्था केली. आम्हाला दाचीगाममध्ये दहशतवादी असल्याची माहिती मिळाली. मे ते २२ जुलै या कालावधीत या माहितीची पुष्टी करण्यासाठी प्रयत्न केले गेले. दहशतवाद्यांचे संकेत मिळवण्यासाठी लष्कर, सीआरपीएफ आणि आयबीचे अधिकारी फिरत राहिले. जेव्हा आम्हाला संकेत मिळाले तेव्हा दहशतवाद्यांना घेरण्यात आले. एकूणच, काल झालेल्या कारवाईत, आमच्या निष्पाप नागरिकांना मारणारे तिन्ही दहशतवादी मारले गेले.

सुलेमान उर्फ फैजल जाट, अफगाण आणि जिब्रान नावाच्या दहशतवाद्यांनी पहलगाम दहशतवादी हल्ला केला. या दहशतवाद्यांना मदत करणाऱ्या लोकांना पहलगाममध्ये हल्ला करणारे हे दहशतवादी आहेत हे ओळखण्यास सांगितले गेले. यासोबतच, घटनास्थळावरून सापडलेल्या काडतुसांची एसएफएल चौकशी करण्यात आली. कालच्या कारवाईत सापडलेल्या काडतुसेचीही तपासणी करण्यात आली आणि रायफल्सही तपासणीसाठी चंदीगडला पाठवण्यात आल्या. या सर्व तपासातून हे तिघेही तेच दहशतवादी असल्याचे सिद्ध झाले.

यावेळी अमित शहा म्हणाले की, "मला वाटले होते की, दहशतवाद्यांना मारल्याची माहिती समजल्यानंतर सत्ताधाऱ्यांसह विरोधी पक्षांनाही आनंद होईल, परंतु असे दिसते की त्यांच्या चेहऱ्यावर शाई लावण्यात आली आहे. दहशतवादी मारले गेले असले तरी तुम्हाला त्रास होत आहे, हे कोणत्या प्रकारचे राजकारण आहे? माझ्या हातात बॅलिस्टिक रिपोर्ट आहे. सुरक्षा तज्ञांनी स्वतः मला फोन करून सांगितले आहे की ऑपरेशन महादेवमध्ये सापडलेल्या या गोळ्या पहलगाममध्ये झाडण्यात आलेल्या गोळ्या आहेत. मी पहलगाम दहशतवादी हल्ल्यात मारल्या गेलेल्यांच्या कुटुंबियांना सांगू इच्छितो की मोदी सरकारने दहशतवाद्यांना तसेच त्यांना पाठवणाऱ्या त्यांच्या सूत्रधारांनाही मारले. मी तुम्हाला खात्री देतो की येणाऱ्या काळात कोणीही असे करण्याचे धाडस करणार नाही."

# सरकारने पर्यटकांना देवाच्या भरवश्यावर सोडून दिले- प्रियांका गांधी

नवी दिल्ली, दि. २९ वृत्तसंस्था

"सत्ताधाऱ्यांनी केलेल्या सगळ्या भाषणांतून सुटलेली गोष्ट म्हणजे पहलगाम हल्ला का आणि कसा झाला", असं म्हणत काँग्रेस खासदार प्रियांका गांधी यांनी नरेंद्र मोदी सरकारवर हल्लाबोल केला आहे. संसदेच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान लोकसभेत पहलगाम हल्ला व त्यापाठोपाठ राबवण्यात आलेले ऑपरेशन सिंदूर यावर सविस्तर चर्चा चालू आहे. या चर्चेदरम्यान प्रियांका गांधींनी मोदी सरकारवर परखड शब्दांत टीकास्त्र सोडलं. तसेच, पर्यटक पहलगामला सरकारच्या भरवश्यावर गेले होते, पण



सरकारनं त्यांना देवाच्या भरवश्यावर सोडून दिलं, असंही त्या म्हणाल्या.

"कालपासून मी सत्ताधाऱ्यांची भाषणं ऐकते आहे. संरक्षण मंत्र्यांनी तासाभराचं भाषण केलं. पण त्या सगळ्यांच्या भाषणातून एक गोष्ट सुटली. २२ एप्रिल रोजी जेव्हा २६ भारतीयांना त्यांच्या कुटुंबीयांसमोर जीवे मारलं गेलं, तो हल्ला कसा झाला? का झाला? हे दहशतवादी तिथे कसे आले? आजकाल प्रचाराचं युग आहे. आपलं सरकार गेल्या काही काळापासून जाहिरातबाजी करत आहे की काश्मीरमध्ये सगळं काही व्यवस्थित झालं आहे. पण त्याचदरम्यान पहलगाममध्ये हल्ला झाला", असं प्रियांका गांधी आपल्या भाषणाच्या सुरुवातील म्हणाल्या.

दरम्यान, पहलगाम हल्ल्यावेळी पर्यटकांच्या सुरक्षेसाठी तिथे एकही सैनिक किंवा पोलीस नव्हता, असं प्रियांका गांधी म्हणाल्या. यासाठी त्यांनी हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेले शुभम द्विवेदी यांच्या पत्नीने दिलेल्या प्रतिक्रियेचा संदर्भ दिला.

# लढण्याची इच्छाशक्तीच दाखवली नाही- राहुल गांधी

नवी दिल्ली, दि. २९ वृत्तसंस्था

युद्धविरामावरून लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी ऑपरेशन सिंदूरवरील चर्चेदरम्यान, केंद्र सरकारवर बोचरी टीका केली आहे. तुम्हीतर ऑपरेशन सिंदूरच्या रात्रीच युद्धविराम केला. लढण्याची इच्छाशक्तीच दाखवली नाही, असा टोला राहुल गांधी यांनी लगावला. राहुल गांधी पुढे म्हणाले की, सरकारने चूक केली आहे. आपलं कुणाशी भांडण झालं आणि



आपण त्याला सांगितलं की, भावा आता ठीक आहे . आम्हाला भांडण नको आहे. आम्ही एक फटका मारला आहे. आता दुसरा मारणार नाही. येथे चूक लष्कराकडून नाही तर सरकारकडून झाली आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी आपण युद्ध थांबवलं, असं २९ वेळा सांगितलं आहे. जर पंतप्रधान नरेंद्र मोदींमध्ये इंदिरा गांधी यांच्या तुलनेत ५० टक्के दम असेल तरी त्यांनी येथे डोनाल्ड ट्रम्प खोटं बोलत आहेत, असं सांगावं, असं आव्हानही राहुल गांधी यांनी दिलं.

## चव्हाण यांनी घेतली पीएम मोदींची भेट

मुंबई, दि. २९ प्रतिनिधी

भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी सोमवारी नवी दिल्ली येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सदिच्छा भेट घेतली.

पंतप्रधान मोदींसोबतच्या भेटीत त्यांनी कार्यकारी अध्यक्ष म्हणून केलेल्या कामाचा अहवाल त्यांना सादर केला. महाराष्ट्रात बूथ पातळीवर सुरू असलेले संघटनकार्य, सदस्य नोंदणी मोहिम, पदाधिकाऱ्यांचे प्रशिक्षण, संपर्क अभियान आणि महिला-युवा आघाड्यांच्या उपक्रमांचा सविस्तर आढावा आहे. पुढील वाटचालीस मोदी यांनी चव्हाण यांना शुभेच्छाही दिल्या.















# अनिल पवार यांची शिवसेना शेतकरी संघटनेच्या महाड तालुका अध्यक्षपदी निवड

**महाड निलेश लोखंडे ।** किंजलोली बुद्रुकचे ग्रामपंचायत चे माजी सरपंच शिवसेना नाते विभाग संपर्कप्रमुख व तरुण युवा नेतृत्व नामदार भरत शेठ गोगावले यांचे खंदे समर्थक अनिल पवार यांची शिवसेना शेतकरी संघटना महाड तालुका अध्यक्षपदी निवड शिवसेना शेतकरी संघटनेचे रायगड जिल्हाध्यक्ष विजय सावंत यांनी नियुक्तीपत्र घेऊन केली आहे हे नियुक्तीपत्रक आमदार भरत शेठ गोगावले यांच्या हस्ते अनिल पवार यांना देण्यात आले अनिल पवार यांची निवड होताच नाते विभागातील सर्व शिवसेना पदाधिकारी यांनी त्यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले आहे अनिल पवार यांची निवड होताच त्यानं सर्व भागातून त्यांचे कौतुक होत आहे



# रक्षाबंधन सणासाठी तळा बाजारपेठेत विविधरंगी राख्या दाखल.

**तळा श्रीकांत नांदगावकर ।** बहीण भावाच्या नात्यातील प्रेमाचे प्रतीक असलेल्या व नाते घट्ट करणाऱ्या रक्षाबंधन सणासाठी तळा बाजारपेठेत विविध रंगाच्या राख्या विक्रीसाठी दाखल झाल्या आहेत.रक्षाबंधन म्हणजे भाऊ बहिणीच्या आयुष्यातील अविस्मरणीय दिवस.या दिवशी बहीण आपल्या लाडक्या भावाला प्रेमाने राखी बांधून आपलं रक्षण करण्याचं वचन मागते. व भाऊ ही तेवढ्याच निष्ठेने आपल्या बहिणीला रक्षण करण्याचं वचन देतो.असा हा सण काही दिवसांवर येऊन ठेपला असल्याने रक्षाबंधनाचे प्रतीक असलेल्या विविध रंगाच्या राख्या तळा बाजारपेठेत विक्रीसाठी दाखल झाल्या आहेत.५ रु.पासून १०० रु.तसेच त्यापेक्षाही जास्त किंमतीच्या राख्या विक्रीसाठी उपलब्ध झाल्या आहेत. भाऊ लांब राहत असल्याने बहिणींना राख्या पोस्टाने अथवा कुरिअरने पाठवाव्या लागतात. त्यामुळे




तळा बाजारपेठेत काही दिवस आधीच राख्या विक्रीसाठी दुकानात दाखल झाल्या आहेत. पूर्वी गोंडयाच्या राखीला ग्राहकांची अधिक पसंती असायची मात्र आता त्यात बदल होऊन ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी लहानमुलांसाठी रंगीबेरंगी कार्टून, डोरेमन,क्रिश, छोटा भीम या कार्टून असलेल्या तर मोठ्यांसाठी गोंडा, रुद्राक्ष, हिरेजडित आशा अनेक आकर्षित राख्या उपलब्ध झाल्या आहेत.त्यामुळे तळा बाजारपेठेत अशा विविधरंगी राख्या खरेदी करताना महिला वर्ग पाहायला मिळत आहे.

## स्वप्नवत रस्ते... पण खड्ड्यांच्या छायेत !

# सुधागड तालुक्याचा आक्रोश

## मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांसह सर्व मंत्रिमंडळाला पालीचे दर्शन घेण्याचे आमंत्रण

**सुधागड-पाली गौसखान पठाण ।** महाराष्ट्रातील सुधागड तालुक्यातील पाली-खोपोली महामार्ग व नगरपंचायत हद्दीतील अंतर्गत रस्त्यांवरील जीवघेण्या खड्डयांमुळे स्थानिक रहिवासी प्रचंड त्रस्त झाले आहेत. गावकरी, वाहनचालक , विद्यार्थी तसेच रुग्णवाहिकांचे चालक – सर्वसामान्य जनतेला प्रवास म्हणजे एक युद्ध वाटू लागले आहे.




"इथे खड्डा रस्ता म्हणजे बांधल्यासारखी विनोदी उदाहरण सत्य आहे. नसलेला चंद्रावर हॉटेल कल्पना!" हा हे आजचा कटू मोर्चे, आंदोलने, निषेध अनेक तरीही केवळ दौ- याच्या काही तात्पुरत्या होत असल्याचे योजनांची सतत नाही आणि कार्यवाहीही तक्रारी आणि वेळा झाले मंत्र्यांच्या दिवशीच उपाययोजना चित्र आहे. अंमलबजावणी निधीची ठोस नाही. या रस्त्यांवरून जाणारे प्रवासी प्रशासनाच्या दुर्लक्षाचीच साक्ष देतात.

पालीतील प्रसिद्ध वकील नरेश शिंदे आणि नोऐल चिंचोलकर यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि मंत्रीमंडळाला सुधागड तालुक्याला भेट देण्याचे खुले आमंत्रण दिले आहे. त्यांनी असा विश्वास व्यक्त केला आहे की जर मंत्र्यांनी प्रत्यक्ष अनुभव घेतला, तर पाली-खोपोली महामार्गासह अंतर्गत रस्त्यांची दुरुस्ती युद्धपातळीवर सुरू होईल.

या आमंत्रणात विनंती केली आहे की काही मान्यवरांनी वाकण-पाली मार्गे, तर काहींनी खोपोली-पाली मार्गे यावे जेणेकरून खड्डयांची वस्तुस्थिती प्रत्यक्ष पाहता येईल. नागरिकांचे म्हणणे आहे की जिथे राजकारणाला खड्डयांची जाणीव होते, तिथे विकासाला गती मिळते.हे आज पर्यंत इतिहास आहे.

सुधागडवासीयांची ही हाक केवळ तक्रार नाही, तर रस्त्याच्या माध्यमातून सुरू असलेली एक सामाजिक चळवळ आहे. या आवाजाला गांभीर्याने घेतले गेले, तर पालीचा विकास रस्त्यावरून चालत नाही तो धावत सुटेल.सुधागड तालुक्यात विशेष म्हणजे तालुक्यातील सर्व पक्षाचे लोकप्रतिनिधी मात्र या गंभीर समस्या बाबत मौन धारण केलेले आहे. एकही प्रतिनिधी याबाबत आवाज उठवताना दिसत नाही.

# नवी मुंबई पोलिस आयुक्तालयाच्या पुनर्रचनेच्या

## पार्श्वभूमीवर शिवसनेचे स्थानिक नेते चंद्रशेखर सोमण यांचे पोलिस आयुक्तांना निवेदन सादर

**पनवेल दत्ता कुलकर्णी ।** कामोठे पोलीस ठाणे पनवेल विभागातच ठेवण्याची मागणी.* नुकतीच नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या पुनर्रचनेला गृह विभागाने मंजुरी दिल्यानंतर पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी नव्या परिमंडळाची तसेच सहाय्यक पोलीस आयुक्त विभागाच्या पुनर्रचनेची घोषणा केली.

या पार्श्वभूमीवर शिवसेनेचे स्थानिक नेते व पोलिस मित्र चंद्रशेखर सोमण यांनी नुकतीच पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांची भेट घेऊन लेखी निवेदन सादर केले. त्यावेळी भारंबे यांचे अभिनंदन केले. नवीन रचनेत सहाय्यक पोलीस आयुक्त स्तरावर फेरबदल झाले असून कामोठे पोलीस ठाणे खारघर विभागात वर्ग केले आहे. याविषयी चंद्रशेखर सोमण यांनी तपशीलवार चर्चा करून कामोठे पोलीस ठाणे पनवेल विभागातच ठेवण्याची विनंती केली आहे. चंद्रशेखर सोमण हे गेले 30 वर्षाहून अधिक वर्षे नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या विविध सुधारणा उपक्रमांशी संलग्न आहेत. नवी मुंबई आयुक्तालयाच्या जडणघडणीत




सोमण यांचे मोठे योगदान राहिले आहे. याबाबतीत आयुक्त मिलिंद भारंबे यांनीही सविस्तर भूमिका विषद केली. सदरच्या विनंतीबरोबरच इतर पोलीस ठाण्यांच्या हद्दीचाही आढावा घेण्याचे त्यांनी तात्काळ आदेश दिले. सहपोलीस आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली पनवेलच्या उपायुक्तांना सदर बाबतीत तातडीने अहवाल देण्यास सांगितले. याबरोबरच नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत द्रोणागिरी, करंजाडेसहित अजून किमान तीन पोलीस ठाण्यांचा प्रस्ताव विचाराधीन असल्याचे संकेत आयुक्तांनी दिले. चंद्रशेखर सोमण यांनी सदर कामी पुढाकार घेतल्याबद्दल पोलीस आयुक्त आणि सहपोलिस आयुक्तांचे आभार मानले.

तसेच सध्या सर्व पोलीस ठाण्यांच्या आणि सहाय्यक पोलीस आयुक्त आणि उपायुक्त कार्यालयांचे महानगर टेलिफोन बंद असल्याने नागरिकांना संपर्कासाठी अडचण होत असल्यामुळे तात्काळ सर्व पोलीस ठाण्यांसाठी व वरिष्ठ कार्यालयांसाठी एक नवीन मोबाईल नंबर घेऊन त्याचा संपर्क क्रमांक सर्वसामान्यांसाठी प्रसिद्ध करण्याची मागणीही चंद्रशेखर सोमण यांनी केली.

चंद्रशेखर सोमण यांनी सह पोलिसायुक्त संजय येनपुरे यांच्याशी चर्चा करून पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या आरोग्यविषयक काही उपक्रमांची चर्चा केली. येनपुरे यांनी सदर सूचनांचे स्वागत करून अंमलबजावणी करण्याची ग्वाही दिली

# पन्हळघर खुर्द वाडकर आळी येथे संरक्षण भिंतीचे उद्घाटन

## पन्हळघर खुर्द येथे अंतर्गत रस्ता पेव्हर ब्लॉक बसवण्याच्या कामाचा भूमिपूजन सोहळा उत्साहात संपन्न

**राम भोस्तेकर माणगाव ।** माणगाव तालुक्यातील लोणेरे विभागात विकासकामांचा शुभारंभ मोठ्या उत्साहात करण्यात आला. दिनांक 28 जुलै रोजी पन्हळघर वाडकर आळी येथे नाल्यालगत उभारण्यात आलेल्या संरक्षण भिंतीचे उद्घाटन आणि मौजे पन्हळघर खुर्द येथे अंतर्गत रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसवण्याच्या कामाचे भूमिपूजन सोहळा पार पडला. जिल्हा प्रमुख प्रमोद घोसाळकर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून, महाराष्ट्र राज्याचे रोजगार हमी व फलोत्पादन मंत्री नामदार भरत गोगावले यांच्या शुभहस्ते कार्यक्रम संपन्न झाला




यावेळी कार्यक्रमाला जिल्हा संपर्कप्रमुख अरुण चालके, जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर, समन्वयक निलेश केसरकर, उपतालुकाप्रमुख पंढरी शेडगे, माजी सभापती महेंद्र तेटगुरे, संपर्कप्रमुख प्रताप घोसाळकर, विभागप्रमुख रवि टेंबे, युवासेना उपतालुकाप्रमुख अभिजित टेंबे, सरपंच हारिदास शेडगे, उपसरपंच रमेश जाधव, श्री. सिताराम उभारले, पंचायत सदस्य समाधान करकरे, बयाजी करकरे, दिलीप करकरे, अनिकेत घोसाळकर, तसेच विभागातील शिवसेना, युवासेना पदाधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी, ग्रामस्थ, महिला मंडळ व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या विकासकामांमुळे परिसरातील नागरिकांना मूलभूत सुविधा प्राप्त होणार असून, पावसाळ्यात होणाऱ्या अडचणींवर कायमस्वरूपी तोडगा निघणार आहे. कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत शिस्तबद्ध व उत्साही वातावरणात पार पडले. उपस्थित ग्रामस्थांनी मंत्री नामदार भरत गोगावले यांचे व शिवसेना नेतृत्वाचे आभार मानले.

# प्रगतीशील पनवेल महानगरपालिकेची लघूपट स्पर्धा

## प्रचार प्रसिद्धी पोस्टरचे अनावरण

**पनवेल दत्ता कुलकर्णी ।** पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या संकल्पनेतून प्रगतीशील पनवेल ही भव्य दिव्य अशी लघूपट स्पर्धा ( शॉर्टफिल्म) महानगरपालिकेमार्फत आयोजित करण्यात आली आहे. या लघूपट स्पर्धेचे प्रचार प्रसिद्धी पोस्टर अनावरण आज 29 जुलै रोजी आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त वैभव विधाते, उपायुक्त प्रसेनजित कारलेकर, सहाय्यक आयुक्त डॉ. रूपाली माने, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर, जनसंपर्क अधिकारी वर्षा कुलकर्णी उपस्थित होते.

विकसनशील विकासात्मक प्रगतीशील अशी पनवेल महानगरपालिकेची वाटचाल सुरू आहे.1ऑक्टोबरपासुन पनवेल मनपा आपल्या दशकपूर्ती वर्षात पदार्पण करीत आहे. मनपाने गत नऊ वर्षांच्या कालावधीत विविध विकासात्मक कामे केलेली आहे. या अनुषंगाने ही लघूपट स्पर्धा जाहिर करण्यात आली आहे.




**लघूपट स्पर्धेसाठी २०सप्टेंबर २०२५पूर्वी नोंदणी करणे आवश्यक आहे. त्याकरिता shortfilmpmc@gmail.com या ईमेल आयडी वर संपर्क साधावा.**

**या स्पर्धेसाठी जास्तीत जास्त स्पर्धकांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात येत आहे.**

### अटी शर्ती

ही स्पर्धा सर्वांसाठी खुली आहे. लघुपटाचा कालावधी दहा ते पंधरा मिनिटे एवढाच असेल. मराठी, हिंदी, इंग्रजी या भाषेतील लघुपट पात्र असतील. मात्र 'प्रगतीशील पनवेल' हा विषय केंद्रभागी असणे महत्त्वाचे आहे. स्पर्धेत भाग घेण्यासाठी shortfilmpmc@gmail.com या ईमेल आयडी वरती नोंदणी आवश्यक आहे. नोंदणी नंतर संबंधितांना स्पर्धेच्या सविस्तर अटी शर्ती बाबत माहिती दिली जाईल.

### 3 लाख 75 हजाराची पारितोषिके

स्पर्धेसाठी एकुण 20 पारितोषिके देण्यात येणार असून त्यांची रोख रक्कम तीन लाख 75 हजार एवढी आहे. यात सर्वोकृष्ट लघूपटास 1 लाख रूपये रोख, प्रशस्तीपत्रक सन्मान चिन्ह असे पारितोषिक असणार आहे. तर द्वितीय लघूपटास 75 हजार रूपये रोख, प्रशस्तीपत्रक सन्मान चिन्ह, तृतीय लघूपटास 50 हजार रूपये रोख, प्रशस्तीपत्रक सन्मान चिन्ह व उत्तेजनार्थ 2 लघूपटास प्रत्येकी 25 हजार अशी पारितोषिके देण्यात येणार आहेत. या शिवाय 5 लघूपटांना प्रत्येकी 10 हजार तर 10 लघूपटांना प्रत्येकी स्पर्धेसाठी 5 हजार विशेष पारितोषिके देण्यात येणार आहेत. याशिवाय दशकपूर्तीनिमित्त दहा पारितोषिके असणार आहेत.

# बचतगटातील महिलांची गरुडझेप

## 228 महिलांनी तयार केल्या 1 लाख 56 हजार 20 गणपती मूर्ती

**अलिबाग रत्नाकर पाटील ।** रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील विविध महिला बचतगटातील २२८ महिलांनी उमेद अभियान अंतर्गत गणपती मूर्ती व्यवसायात पाऊल ठेवले आहे. या व्यवसायातून महिलांना आर्थिक स्थैर्य प्राप्त झाले आहे. बचत गटातील महिलांनी १ लाख ५६ हजार २० गणपती मूर्ती तयार केल्या असून, यामधून कोट्यवधी रुपयांची उलाढाल होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक प्रियदर्शिनी मोरे यांनी बचत गटातील महिलांना व्यवसायाच्या दृष्टीने मार्गदर्शन केल्याने, जिल्ह्यातील महिला शक्ती गणपती मूर्ती व्यवसायात गरुड झेप घेऊ शकल्या आहेत.

रायगड जिल्ह्यातील पेण तालुका गणपती मूर्तींचे माहेरघर म्हणून ओळखले जाते. पेणमध्ये तयार केलेल्या गणपती मूर्तींना देश, विदेशात मोठी मागणी आहे. सुबक आखणी, नेटकी बैठक, सुंदर कोरीवकाम, डोळ्यांची रचना आणि रंगकाम यामुळे पेणच्या गणपती मूर्तींना स्वतची खास ओळख प्राप्त झाली असून, गणपती मूर्तींना गणेशमूर्तींना भौगोलिक मानांकन मिळाले आहे. या व्यवसायात पेण तालुक्यातील महिला बचतगट उतरले आहेत.

ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत पेण तालुक्यातील विविध बचत गटातील २२८ महिला या गणपती व्यवसायात सहभागी झाल्या आहेत. महिला बचत गटांनी १ लाख ५६ हजार २० गणपती मूर्ती तयार केल्या असून, यामधील १ हजार ५०० गणपती मूर्ती परदेशात पाठविण्यात आल्या आहेत. गणपती मूर्ती व्यवसायातून कोट्यवधी रुपयांची उलाढाल होण्याची अपेक्षा आहे. व्यवसायासाठी उमेद अभियान मार्फत महिला बचत गटांना फिरता निधी तसेच ग्राम संघांना समुदाय गुंतवणूक निधी आणि बँकांमार्फत पतपुरवठा करण्यात आला असून, महिलांच्या या व्यवसायाला गती प्राप्त झाली आहे. या व्यवसायामुळे महिलांच्या हाताला काम मिळाल्यामुळे त्या अधिक सक्षम झाल्या आहेत.



### अधिकाऱ्यांनी केली पाहणी

पेण तालुक्यातील बचतगटातील महिला तयार करीत असलेल्या गणपती मूर्तींची पाहणी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले व जिल्हाधिकारी जिल्हा ग्रामीण विकास अधिकारी प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे यांनी केली. यावेळी त्यांनी या व्यवसायातील बारकावे जाणून घेतले. तसेच त्यांना भेडसावणाऱ्या समस्या जाणून घेतल्या. गणपती मूर्ती व्यवसाय करणाऱ्या महिलांना भेडसावणाऱ्या समस्या सोडविण्याकरिता प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन यावेळी अधिकाऱ्यांनी दिल्या.

# मारलं समुद्रकिनाऱ्याची धूप

## उलमळून मोठ्या प्रमाणात वृक्ष जमीनदोस्त

**श्रीवर्धन सोपान निंबरे ।** हरिहरेश्वर ते मारलं समुद्रकिनारी पावसाळी रौद्ररूप घेतलेल्या लाटांनी किनाऱ्याची मोठ्याप्रमाणात धूप झाली आहे. यामध्ये किनाऱ्यावरील मोठे मोठे वृक्षही उलमळून पडले असून किनारा नष्ट होत असल्याचे दिसून येत आहे. यामुळे मारलं हद्दीतील नागरिकांना भविष्यात धोका निर्माण होणार असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे. किनाऱ्यावरील होत असलेली मोठ्या प्रमाणात धूप ही लाटांमुळे होत असून या ठिकाणी धूप प्रतिबंधक बंधारा नाही.लाटांच्या सततच्या माऱ्यामुळे



किनाऱ्याची माती, वाळू वाहून जात आहे. हरिहरेश्वर हे दक्षिण काशी तीर्थक्षेत्र असून शेजारी हाकेच्या अंतरावर पर्यटकांना आकर्षित करणारा मारलं समुद्र किनारा आहे. संबंधित प्रशासनाने या ठिकाणी लवकरात लवकर धूप प्रतिबंधक उपाययोजना करणे आवश्यक आहे.

**"स्थानिक नागरिकांची चिंताः**

मारलं हद्दीतील नागरिकांना किनाऱ्याच्या धूपमुळे खूप भीती वाटते आहे, कारण समुद्राच्या लाटा त्यांच्या नारळीच्या बाग व वस्तीच्या जवळ येऊ लागली आहे. प्रशासनाने यावर लवकरात लवकर उपाययोजना करणे गरजेचे आहे.

# रोहा-तांबडी रस्ता पुन्हा संकटात! डोंगर सरकतोय, मोठे दगड झाडांसह रस्त्यावर येण्याचा धोका – तात्काळ उपाययोजना करा: प्रवासी व वाहतूकदारांची मागणी.

**रोहा संतोष सातपुते ।** मुख्य जिल्हा मार्ग क्रमांक ५० वरील रोहा-तांबडी हा डोंगराळ व चढणीचा रस्ता सध्या गंभीर धोक्याच्या छायेत आहे. मागील आठवड्यात पावसामुळे सात ते आठ ठिकाणी माती सरकली असून, मोठे दगड व झाडं डोंगर उतारावरून रस्त्यावर येण्याच्या स्थितीत आहेत. अशा परिस्थितीत पाऊस जोरदार पडत आहेच परंतु आणखी पावसाचा जोर वाढला, तर वाहतूक पूर्णपणे बंद होण्याचा आणि जीवितहानी होण्याचा



धोका वाढला आहे. गेल्या आठ ते दहा दिवसांपूर्वी मुसळधार पावसामुळे याच डोंगर भागाचा काही भाग रस्त्यालगत सात ते आठ ठिकाणी पडलेला आहे . त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागा व लोकप्रतिनिधी त्याने तात्काळ लक्ष देऊन तातडीने उपाययोजना कराव्यात अशी मागणी देखील प्रवासी व वाहतूकदारांनी केलेले आहे .

हा रस्ता अनेक गावांना जोडणारा प्रमुख दुवा असल्यामुळे प्रवाशांसाठी अत्यावश्यक आहे. हा जो जोड रस्ता रोहा मुरुड , तळा तसेच तांबडी , बाराशेत , म्हसाडी ,सवाणे व वाली अशा गावांना रस्ता आहे . परंतु रोहा हनुमान टेकडी पासून चढणीचा भाग असल्याने वाहने आधीच अडथळ्याने जात आहेत. याशिवाय, रात्रीच्या वेळी या मार्गावर कोणतीही प्रकाश व्यवस्था नसल्याने अपघाताची शक्यता आणखी वाढते. यामुळे प्रवासी वर्ग व वाहतूकदारांकडून प्रशासनाकडे तात्काळ स्थायी उपाययोजनांची जोरदार मागणी केली जात आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्त्यालगत स्लोप स्टॅबिलायझेशन, संरक्षक भिंती, चेतावणी फलक अशी मागणी होत असून लोकप्रतिनिधींनीही या गंभीर विषयाकडे दुर्लक्ष न करता लक्ष देणे गरजेचे आहे. धोका स्पष्टपणे समोर दिसत असताना, उपाययोजना न होणे म्हणजे शेवटी एखाद्या दुर्घटनेची वाट पाहणं, असा संतप्त सूर आता नागरिक, प्रवासी आणि वाहनचालकांमध्ये मनात साशंकता येऊ लागलेली आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभाग व लोकप्रतिनिधी नक्की कोणती भूमिका घेतात हे देखील पाहणे तेवढेच महत्त्वाचा आहे .

**पेण नगरपरिषद, पेण**

**जाहीर निविदा सुचना सन २०२५-२६**

पेण नगरपरिषद पेण जि. रायगड यांजकडून खालील कामासाठी अनुभवी व इच्छुक व्यक्ति/संस्था/कंपनी यांजकडून जाहिर निविदा मागविणेत येत आहेत.

| अ. क्र | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम | निविदा फॉर्म फी | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | पेण नगरपरिषद आरोग्य विभागाकडील वाहने दुरुस्ती करणेकामी लागणारे साहित्य पुरवून बसवून देणे. | ९,७०,०००/- | ९,७००/- | १५००/- | कार्यादेश आदेशापासून १वर्ष |

**कामाच्या अटी व शर्ती**

१) निविदा विक्री कालावधी दिनांक ३०/०७/२०२५ ते दिनांक ११/०८/२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस वगळता) मिळू शकतील

२) निविदा जमा करण्याचा कालावधी दिनांक १२/०८/२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत

३) निविदा उघडण्याचा कालावधी दिनांक १३/०८/२०२५ रोजी सायं. ५.०० वाजता अथवा प्रशासकीय सोयीनुसार

४) याबाबतची अधिक माहिती नगरपरिषदेच्या आरोग्य विभागात कार्यालयीन वेळेत उपलब्ध होईल.

**प्रशासक तथा मुख्याधिकारी**
पेण नगरपरिषद, पेण

**पेण नगरपरिषद, पेण**

**जाहीर निविदा सुचना सन २०२५-२६**

**जाहीर निविदा सुचना क्र. ५** **दिनांक :**

पेण नगरपरिषद, पेण, जि. रायगड यांजकडून खालील कामांसाठी इच्छुक ठेकदारांकडून टक्केवारी दराच्या सिलबंद निविदा द्विनोंद लिफाफा पद्धतीने मार्गावणेत येत आहेत.

**कामाचे नावः**
सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरीता गौरी, गणपती विसर्जनाचे मंडप उभारणे, मंडप व स्टेज उभारणे, पावसापासून संरक्षणाकरीता पत्र्याची शेड असलेला मंडप, मंडप व स्टेज उभारणे तसेच टेबल, खुर्ची पुरविणे व विद्युत व्यवस्था, बॅरिगेटिंग करणे इत्यादी कामे करणे. ( निविदा फॉर्म फी - ५००/- निविदा इसारा रक्कम - ५०००/-)

**कामाच्या अटी व शर्ती :-**

1. निविदा फॉर्म ची विक्री कार्यालयीन वेळेत दिनांक ३०/०७/२०२५ ते दिनांक ०८/०८/२०२५ पर्यंत सकाळी ११.०० ते सांय. ५..00 वाजेपर्यंत कार्यालयात उपलब्ध होतील
2. निविदा फॉर्म दिनांक ०८/०८/२०२५ रोजी दुपारी ५.१५ वाजेपर्यंत स्विकारले जातील.
3. निविदा शक्य झाल्यास त्याच दिवशी दु.५.३० वाजता अथवा कार्यालयाचे प्रशासकीय सोयी प्रमाणे उघडणेत येतील,
4. निविदा द्विनोंद पद्धतीने सादर करणेच्या असून लिफाफा क्र.१ पॅनकार्ड, आधारकार्ड, इसारा रक्कम भरल्याची पावतोचो छायांकीत प्रत, परिशिष्ट अ इत्यादी कागदपत्र सादर करणे बंधनकारक राहील. तर लिफाफा क्र. २ मध्ये स्वहस्ताक्षरात संपूर्ण भरलेला निविदा फॉर्म सादर करणेचा आहे
5. सशर्त निविदा नाकारली जाईल. कोणतीही एक निविदा स्विकारणेचा अथवा सर्वच निविदा नाकारणेचा आंधकार नगरपरिषदेने राखून ठेवला आहे.
6. कामासंबंधी अतिरिक्त माहिती नगरपरिषदेचे बांधकाम विभागात कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस खेरीज) मिळू शकेल

**मुख्याधिकारी**
पेण नगरपरिषद. पेण

# गावंडगाव आश्रम शाळेची विद्यार्थिनी कु. साक्षी चव्हाण हिला मिळाली 'इस्त्रो' भेटीची संधी

**अकोला :** इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या खाजगी विजाभज प्रवर्गाच्या उच्च माध्यमिक निवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना इस्त्रो (भारतीय अंतराळ संशोधन संस्था) या संस्थेस भेट देण्यासाठी अमरावती विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांची निवड करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याच्या मुख्यालयी चाचणी परीक्षा दि.२७.७.२०२५, रविवारला घेण्यात आली. अकोला जिल्ह्यात परंडा तालुका



बार्शीटाकळी येथे घेण्यात आलेल्या चाचणी परीक्षेत स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक संस्था झरंडी द्वारा संचालित, बाबासाहेब नाईक उच्च माध्यमिक आश्रम शाळा गावंडगाव ची विद्यार्थिनी कु. साक्षी सुरेश चव्हाण १२ वी विज्ञान हीची चाचणी परीक्षेत गुणवत्ता यादीत आल्याने इस्त्रो भेटीसाठी निवड झाली आहे. शिक्षण संस्थेचे सचिव मा रामसिंगजी जाधव साहेब व प्राचार्य सुरेश चव्हाण सर, मुख्या. रमेश चव्हाण सर व सर्व शिक्षक यांनी कु. साक्षी चव्हाण हीचे अभिनंदन करुन इस्त्रो या संस्थेस भेटीसाठी शुभेच्छा दिल्या. कु. साक्षी चव्हाण चे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.

# लिंगनिदान प्रतिबंधासाठी 'ट्रॅकिंग सिस्टीम' राबवावी : जिल्हाधिकारी अजित कुंभार

## जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेत आरोग्य विभागाच्या विविध बैठका

▪**अकोला,दि २९ (प्रतिनिधी) :** सीआरएस अहवालानुसार अकोला जिल्ह्याचे लिंग गुणोत्तर प्रमाणात सुधारणा होऊन एक हजार पुरूषांमागे ९४० महिला इतके प्रमाण झाले आहे. या कार्यात अधिक सुधारणांसाठी सोनोग्राफी सेंटरच्या अचानक तपासण्या, धाडी यांची संख्या वाढवावी, तसेच 'ट्रॅकिंग सिस्टीम' राबवावी, असे निर्देश जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी आज येथे दिले.

पीसीपीएनडीटी जिल्हा टास्क फोर्स, जिल्हा एड्स नियंत्रण समिती, राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण बैठक,



राष्ट्रीय मौखिक आरोग्य कार्यक्रम आदी विविध बैठका जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेत जिल्हाधिकारी कार्यालय इमारतीच्या तिस-या मजल्यावरील सभागृहात झाल्या, त्यावेळी ते बोलत होते. जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. तरंगतुषार वारे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे, डॉ. आशा मिरगे, मोहन खडसे, डॉ. सीमा तायडे, प्रतिभा अवचार, समितीच्या विधी समुपदेशक ॲड. शुभांगी ठाकरे आदी यावेळी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. कुंभार म्हणाले की, लिंगनिदान प्रतिबंधासाठी तपासण्यांबरोबरच ट्रॅकिंग करणेही गरजेचे आहे. त्यासाठी आशा सेविकांची भूमिका महत्वपूर्ण आहे. याबाबत जाणीवजागृती होणे आवश्यक आहे. गरोदर मातांविषयीचा डेटा, आवश्यक ट्रॅकिंग ही जबाबदारी, तपासण्या व मागोवा ही जबाबदारी काटेकोरपणे पार पाडावी. सोनोग्राफी केंद्रांना अचानक भेटी, धाडी यांची संख्या वाढवावी. प्रारंभी ॲड. ठाकरे यांनी सोनोग्राफी केंद्रांच्या मान्यता, नूतनीकरण, यंत्रणा हस्तांतरण आदींबाबतचे अर्ज, नियम यांची माहिती सादर केली.

### तंबाखूमुक्त शाळांसाठी मोहिम राबवा : जिल्हाधिकारी

प्रत्येक शाळेचा परिसर तंबाखूमुक्त होण्यासाठी मोहिम राबविण्याचे निर्देश जिल्हाधिका-यांनी जिल्हा समितीच्या बैठकीत दिले. ते म्हणाले की, पोलीस व विविध विभागांचे सहकार्य घेऊन शाळा-शाळांचे सर्वे क्षण करावे. जागृतीसाठी मेळावे घ्यावेत. आवश्यक तिथे कारवाई करावी.

सर्व तालुक्यात तंबाखू नियंत्रण समित्यांची स्थापना करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.राष्ट्रीय मौखिक आरोग्य कार्यक्रमात तंबाखूजन्य पदार्थ सेवन करणा-या किंवा जोखमीतील व्यक्तींच्या तपासण्या होतात. त्यात जून महिन्यातील २६५ तपासण्यांत २२ व्यक्तींना कर्करोगपूर्व स्थितीचे निदान झाले. त्यांना उपचार, मार्गदर्शन मिळवून देण्यात आले.

जिल्हा एड्स नियंत्रण कार्यक्रमात २०२४-२०२५ या वर्षात ९५ हजार ३५२ तपासण्या झाल्या.

त्यात २१८ एचआयव्हीबाधित आढळून आले. जोखमीच्या व अतिजोखमीच्या क्षेत्रात प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवावी व व्यापक तपासण्या कराव्यात, असे निर्देश जिल्हाधिका-यांनी दिले.

# अकोला जिल्ह्यातील चौदावा धोकादायक व्यक्तीला केले स्थानबद्ध

▪**अकोला,दि २९ (प्रतिनिधी) :** शहरातील हरीहर पेठ, ईदगाह जवळ, जुने शहर, अकोला ता. जि. अकोला येथे राहणारा कुख्यात गुंड विनायक महेंद्र येन्नेवार, वय २५ वर्ष याचे वर यापुर्वी हिसकावून नेणे, चोरी, राहत्या घरात चोरी करणे, आतमध्ये मालमत्ता असलेले पात्र अप्रम ाणीकपणे फोडुन उघडणे, गुप्तपणे व गैरपणे एखादया व्यक्तीला परिरुध्द करण्याकरीता तिचे अपहरण करणे, जबरी चोरी करतानां इच्छापुर्वक दुखापत करणे, बलाद्ग्रहण करण्यासाठी एखादया व्यक्तीला क्षती पोहचवण्याची भिती घालणे, गृह अतिक्रमण करणे, दरोडा घालण्याची पुर्व तयारी करणे, दंगल करणे, घातक हत्यारांनी किंवा साधनांनी इच्छापुर्वक जबर दुखापत पोहोचवणे, गैर निरोध, पन्नास रूपये इतक्या रकमेच्या नुकसान करून आगळीक करणे, अश्लील कृती आणि गाणी, बेकायदेशीर रित्या शस्त्र बाळगणे, शांतताभंग घडवून आणण्याच्या उद्देशाने अपमान करणे, फौजदारीपात्र धाकदपटशा करणे असे बरेच गंभीर गुन्हे दाखल आहेत. त्याचे वर यापुर्वी विवीध कलमान्वये प्रतिबंधक कार्यवाही करण्यात आली होती, परंतु त्याचे वर त्याचा



काहीच परिणाम झालेला नव्हता. तो प्रतिबंधक कार्यवाही करून सुध्दा जुमानत नसल्याने त्याचे विरूध्द गंभीर दखल घेण्यात येवुन कुख्यात गुंड विनायक महेंद्र येन्नेवार, याचे गुन्हेगारी वृत्तीस आळा बसावा याकरीता मा. पोलीस अधीक्षक, अकोला यांनी त्यास स्थानबध्द करण्याबाबतचा प्रस्ताव मा. जिल्हादंडाधिकारी, अकोला यांना सादर केला होता. मा. जिल्हादंडाधिकारी, श्री. अजित कुंभार यांनी सर्व कायदेशीर बाबींची पडताळणी करून तसेच स्वत:चे स्त्रोताव्दारे माहीती मिळवुन सदर कुख्यात गुंड हा धोकादायक व्यक्ती असल्याची खात्री झाल्याने त्यास एक वर्षाकरीता अकोला जिल्हा कारागृहात स्थानबध्द केले.

# जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे सोमवारी आयोजन

▪**अकोला,दि २९ (प्रतिनिधी) :** जिल्हास्तरीय लोकशाही दिन व दिव्यांग लोकशाही दिन दि. ४ ऑगस्ट रोजी दु. ३ वा. जिल्हाधिकारी कार्यालयातील लोकशाही सभागृहात आयोजित करण्यात आला आहे.सर्व संबंधित, तसेच अधिकारी व कर्मचा-यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. यापूर्वीच्या प्रलंबित तक्रारींचा अनुपालन अहवाल लोकशाहीदिनापूर्वी सादर करण्याचे निर्देश संबंधित यंत्रणांना देण्यात आले आहेत. दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिन व दिव्यांग लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते.

# सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या पदाधिकाऱ्यांची सभा संपन्न

## मिरवणुकीतील सहभागासाठी अखाड्यांना साहित्य देण्याचा निर्णय

▪**अकोला,दि २९ (प्रतिनिधी) :** आगामी गणेश विसर्जन मिरवणुकीसंदर्भात सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या वतीने सोमवारी अखाडे व व्यायाम शाळा पदाधिकाऱ्यांची विशेष सभा आयोजित करण्यात आली. या बैठकीत यंदाच्या मि रवणुकीत होणाऱ्या सहभागावर महत्वपूर्ण चर्चा झाली असून महत्वाचे निर्णय घेण्यात आले. १७ जुलै रोजी पार पडलेल्या प्रथम नियोजन सभेत ठरल्याप्रमाणे, यंदाही सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या वतीने मिरवणुकीत सहभागी होणाऱ्या



सर्व अखाड्यांना आवश्यक साहित्य पुरवण्यात येणार आहे, असा निर्णय या बैठकीत एकमुखाने घेण्यात आला. तसेच, मिरवणुकीत सहभागी होणाऱ्या मोठ्या गणेश मंडळांच्या कार्यकर्त्यांसोबत लवकरच स्वतंत्र बैठक घेऊन नियोजन व सुरळीत मिरवणूक याविषयी सविस्तर चर्चा केली जाणार असल्याचे मंडळाने सांगितले. आज झालेल्या या सभेत बहुसंख्य अखाड्यांचे प्रमुख व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते, यावरून उत्सवाच्या तयारीसाठी सर्व घटक किती सज्ज आहेत, हे स्पष्ट झाले. या बैठकी मुळे विसर्जन मिरवणुकीसाठी आवश्यक नियोजनास सुरुवात झाली असून उत्सव शांततापूर्ण व शिस्तबद्ध पार पडण्यासाठी मंडळ कटिबद्ध आहे.

# हिपॅटायटिस दिवसानिमित्त स्त्री रूग्णालयात कार्यक्रम

▪**अकोला,दि २९ (प्रतिनिधी) :** जिल्हा स्त्री रुग्णालयात हिपॅटायटिस दिवसानिमित्त सोमवारी कार्यक्रम झाला.अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. वंदना पटोकार, वरिष्ठ तज्ज्ञ डॉ.अस्लम , डॉ. उमेश अग्रवाल, डॉ. वाडेकर, डॉ.अबिद उपस्थित होते. जागतिक हिपॅटायटिस दिन २०२५ ची थीम ' लेट्स ब्रेक इट डाउन' अशी निश्चित करण्यात आली आहे, हिपॅटायटिस निर्मूलन आणि यकृताच्या कर्करोगाला प्रतिबंध करतानाच उपचारातील आर्थिक, सामाजिक अडथळे दूर करण्यासाठी योगदान देऊया, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

## थोडक्यात

### शहरातील गुंड प्रवृत्तीचे सराईत आरोपीला केले हद्दपार





**अकोला :**अकोला शहरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवु नये तसेच विवीध प्रकारचे वारंवार गुन्हे करणा-या ईसमांवर कायदयाचे धाक रहावे याकरीता पोलीस अधीक्षक श्री. अर्चित चांडक, अपर पोलीस अधिक्षक श्री. बी चंद्रकांत रेड्डी साहेब यांचे मार्गदर्शनामध्ये प्रतिबंधात्मक उपाय योजना म्हणुन पो.स्टे. सिटी कोतवाली व पो.स्टे. अकोट फाईल. हद्दीतील १) गुलाम अली औलाद हुसेन वय ३५ वर्ष रा. ईराणी झोपडपट्टी, अकोला, २) अंबादास उर्फ सोनु रोहीदास थोरात वय २५ वर्ष रा. अण्णाभाउ साठे नगर, अकोट फाईल, अकोला या आरोपी विरुध्द दाखल गुन्हयांचे स्वरूप पाहता त्यांचे विरूध्द महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५६ अन्वये अकोला जिल्हयातुन हद्दपार करण्या बाबत प्रस्ताव तयार करून उपविभागीय दंडाधिकारी, अकोला यांचे कडे सादर करण्यात आला होता.त्यानुसार उपविभागीय दंडाधिकारी, अकोला यांचे आदेशान्वये उपरोक्त वर नमुद ०२ गुन्हेगारी प्रवृत्तीच्या ईसमांना अकोला व बाळापुर तालुक्यातुन सहा महिण्याकरीता हयार करण्यात आले आहे.मा. पोलीस अधीक्षक अर्चित चांडक साहेब यांनी अकोला आगामी सण-उत्सव काळात जिल्हयात कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहुन शांतता रहावी या करीता अश्या प्रकारचे गुन्हे करणारे व कारवाईस न जुमानणा-या सराईत गुन्हेगारी प्रवृत्तीचे ईसमांची माहिती संकलीत करण्याचे आदेश दिले असुन त्यांचे विरूध्द वरील प्रमाणे प्रभावी प्रतिबंधक कारवाई करणे सुरू आहे.

### अल्पशा आजाराने तरुणाचा मृत्यू!

**वाडेगांव :** येथील अशोक नगरातील रहिवासी निलेश प्रकाश वानखडे वय ३३ वर्षे अल्पशा आजाराने दगावला. घरची परिस्थिति बेताची असून त्याचे अचानक जाण्याने हळहळ व्यक्त होत आहे. एक निर्व्यसनी तरुण घर प्रपंच चालवत असतांना सामाजिक कार्यात धावून यायचा. कुणाच्या ही सुख दुःखात सहभागी होत होता. त्याचे पश्चात आई वडील, पत्नी, एक छोटी मुलगी आणि मोठा आप्त परिवार आहे. वाडेगाव पत्रकार संघाच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात आली.

# शिक्षकाकरिता क्षयरोग विषयी संवेदीकरण कार्यशाळा संपन्न

▪**अकोला,दि २९ (प्रतिनिधी) :** राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम शहर क्षयरोग कार्यालय अकोला महानगरपालिकेच्या वतीने टीबी मुक्त भारत अभियान दि. १ जुलै ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत मनपा कार्यक्षेत्रात राबविण्यात येणार आहे. या अनुषंगाने भारत स्काऊड गाईड जिल्हा कार्यालय येथे जिल्हातील सर्व उपस्थित शिक्षणाकरीता क्षयरोग विषयी संवेदीकरण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी प्रमुख मार्गदर्शन दिपक पाटील वरीष्ट क्षयरोग प्रयोगशाळा पर्यवेक्षक क्षयरोग विभाग यांनी टीबी मुक्त भारत अभियानाबाबत सविस्तर माहिती






दिली. व प्रत्येक शाळेमध्ये शिक्षकांनी या अभियानाची माहिती विद्यार्थीना द्यावी व संशयीत क्षयरुग्णाची मोफत एक्सरे तपासणी व नॅट तपासणी करावी जेणे करुन जास्तीत जास्त क्षयरुग्णांना शोधून त्यांना उपचाराखाली आणता येईल व टीबी मुक्त करण्याच्या दुष्टीने वाटचाल करता येईल याबाबत मार्गदर्शन केले. तर क्षयरुग्णांना मिळणा-या सुविधा जसे एक्सरे, नॅट तपासणी, एचआयव्ही, डायबेटीक तपासणी, औषधी तसेच १०००/- रुपये निक्षय पोषण आहार योजनेअंर्तगत डीबीटी स्वरुपात त्यांना त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येईल.तसेच उमेश पद्मने जिल्हा पिपिएम समन्वयक यांनी प्रधानमंत्री टीबी मुक्त अभियाना बाबत माहिती दिली. भारत सरकारच्या निश्चित केलेल्या लक्षणानुसार वैयकतीक संस्था, मंडळे, ट्रस्ट, शासकीय विभाग, खाजगी मंडळ, खाजगी कंपनी, सामाजिक कार्यकर्तेसुध्दा यामध्ये सामील होईल व नोंदणी करुन किमान ६ महिने जास्तीत जास्त ६ वर्ष निक्षयमित्र नोंदणी करुन क्षयरुग्ण दत्तक घेवू शकतात.

# आंतरमहाविद्यालयीन बुद्धिबळ स्पर्धांचे उद्घाटन

▪**अकोला,दि २९ (प्रतिनिधी) :** कृषी महाविद्यालय, अकोला येथे तीन दिवसीय आंतरम हाविद्यालयीन बुद्धिबळ स्पर्धांचे उद्घाटन आज उत्साहात पार पडले. या स्पर्धेचे उद्घाटक म्हणून डॉ. डी. एम. पंचभाई (अधिष्ठाता, कृषी पं. दे. कृ. वि. अकोला) उपस्थित होते, तर अध्यक्षस्थानी डॉ. संजय भोयर (सहयोगी अधिष्ठाता, कृषी महाविद्यालय, अकोला) यांनी स्थान भूषवले.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अरविंद सोनकांबळे (अधिष्ठाता, उद्यानविद्या), डॉ. ययाती तायडे (सहयोगी अधिष्ठाता - पी. जी. आय.), डॉ. शेषराव चव्हाण (सहयोगी अधिष्ठाता), डॉ. शैलेश हरणे (सहयोगी अधिष्ठाता, वनविद्या महाविद्यालय), डॉ. संदीप हाडोळे (विद्यार्थी कल्याण अधिकारी) आणि डॉ. जे.पी. देशमुख (शास्त्रज्ञ, कृषी विद्या) आदी मान्यवर उपस्थित होते.

या बुद्धिबळ स्पर्धेत एकूण २६ कृषी महाविद्यालयांनी सहभाग नोंदवला असून, त्यामध्ये मुलींच्या गटातून १३ आणि मुलांच्या गटातून २६ संघ सहभागी झाले आहेत. ही स्पर्धा पुढील तीन दिवस चालणार आहे.उद्घाटनपर भाषणात डॉ. डी. एम. पंचभाई यांनी सर्व खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.




# अकोल्याच्या सुपुत्राला अयोध्येत वीरमरण.... कुरणखेड गावावर शोककळा

**अकोला :** शौर्य, त्याग आणि देशभक्ती यांची परंपरा जपणाऱ्या कुरणखेड गावावर पुन्हा एकदा दुःखाचा डोंगर कोसळला आहे. गावचा सुपुत्र, फाईव्ह मराठा बटालियनमध्ये सेवा देणारे जवान नितेश मधुकर घाटे (वय ३५) अयोध्या



येथे आपल्या कर्तव्यावर असताना वीरगतीला प्राप्त झाले आहेत. त्यांच्या निधनाची बातमी समोर येताच संपूर्ण कुरणखेड आणि परिसरात शोककळा पसरली असून, गावातील प्रत्येक व्यक्ती हळहळत आहे.कुरणखेड गावाचे सुपुत्र नितेश घाटे गेल्या पंधरा वर्षांपासून भारतीय सैन्यात कार्यरत होते. पुलगाव अंतर्गत येणाऱ्या अकोला जिल्ह्यातील या शेतकरी कुटुंबातील नितेश यांनी फाईव्ह मराठा बटालियनमध्ये आपली शौर्यगाथा लिहिली होती. सध्या अयोध्या येथे त्यांची ड्युटी सुरू होती. मात्र दिनांक २८ जुलै रोजी अचानक शॉक लागल्याने त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या वीरमरणाची खबर गावात पोहोचताच काळजाला चटका लावणारा शोक पसरला.नितेश यांचे वडील मधुकर घाटे हे शेतकरी असून त्यांनी आपल्या तीन मुलांना शिकवले. त्यांच्या थोरल्या मुलानेही भारतीय लष्करात सेवा केली होती, मात्र सेवा संपल्यानंतर तो अपघातात मरण पावला होता.


# भाजपा जिल्हा ग्रामीणची कार्यकारिणी जाहीर !

## विलास पोटे, डॉ. संजय भटकर, नंदकिशोर खोकले, मोनाली गावंडे, चंदा लवाडे, राखी गाडेकर, पुष्पा रत्नपारखी, दादाराव पेठे यांच्याकडे सचिवपदाची जबाबदारी, तर प्रसिद्धी प्रमुख म्हणून गिरीश जोशी यांच्या कडे

▪**अकोला,दि २९ (प्रतिनिधी) :** जिल्हाध्यक्ष संतोष शिवरकर यांनी आमदार रणधीर सावरकर, खासदार अनुप धोत्रे, पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर, संघटन मंत्री डॉ. उपेंद्र कोठेकर, माजी मंत्री संजय धोत्रे, आमदार प्रकाश भारसाकळे, आमदार हरीश पिंपळे, आमदार वसंत खंडेलवाल, तेजराव थोरात, किशोर पाटील व संघटनेतील विविध क्षेत्रां मध्ये काम करणाऱ्या पदाधिकाऱ्यांचा, ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा सल्ला घेऊन, मान्यता घेऊन आगामी जिल्हा परिषद, पंचायत समितीमध्ये भारतीय जनता पार्टी महायुतीचा झेंडा फडकवण्याच्या दृष्टीने वेगवेगळ्या समाजसेवकांना प्राधान्य देऊन कार्यकारिणीची घोषणा केली. संघटन सरचिटणीस म्हणून माधव श्यामराव मानकर यांना









पुन्हा जबाबदारी देण्यात आली, तर नवीन सरचिटणीस अंबादास उम ाळे, ॲड. रूपाली काकडे, राजेश नागमते यांची निवड करण्यात आली आहे. कोषाध्यक्षपदी बसंत बाछुका यांना जबाबदारी देण्यात आली, तर उपाध्यक्ष म्हणून डॉ. शंकरराव वाकोडे, गजानन उंबरकर, राजेश बेले, गणेश तायडे, अमोल साबळे, महिला आघाडी अध्यक्ष वैशाली निकम, विलास सोळंके, संदीप उगले यांना उपाध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. सचिवपदी विलास पोटे, डॉ. संजय भटकर, नंदकिशोर खोकले, मोनाली गावंडे, चंदा लवाडे, राखी गाडेकर, पुष्पा रत्नपारखी, दादाराव पेठे यांच्याकडे सचिवपदाची जबाबदारी देण्यात आली, तर प्रसिद्धी प्रमुख म्हणून गिरीश जोशी तर कायम निमंत्रित सदस्य म्हणून ॲड. आकाश फुंडकर, माजी मंत्री ॲड. संजय धोत्रे, आम दार रणधीर सावरकर, खासदार अनुप धोत्रे, आमदार प्रकाश भारसाकळे, आमदार हरीश पिंपळे, आमदार वसंत खंडेलवाल, डॉ. उपेंद्र कोठेकर, विजय कमलकिशोर अग्रवाल, जयंत मसने, तेजराव थोरात, किशोर पाटील, श्रावण इंगळे, शिवाजीराव देशमुख यांची निवड करण्यात आली.

# भाजपा सोशल मीडियामध्ये रिचा पाटील व शिवा हिंगणे यांची निवड

▪**अकोला,दि २९ (प्रतिनिधी) :** लोकसभा आणि विधानसभेम ध्ये सोशल मीडिया चं काम पाहणारे पडद्यामागे राहून पक्षाचा विचार विरोधकांना उत्तर देण्याचं काम करणारे वेगवेगळे कार्यकर्त्यांना निरोप देणारे वेगवेगळ्या माध्यमातून तसेच प्रशांत किशोर यांच्या टीम मध्ये काम करणाऱ्या सौभाग्यवती रिचा पाटील शहा यांची आयटी, सेल जिल्हा ग्रामीण संयोजक म्हणून तर सोशल मीडिया प्रमुख म्हणून शिवा हिंगणे यांची निवड करण्यात आली आहे त्या दोघांनीही भाजपा सोशल मीडिया मध्ये वेगवेगळ्या जबाबदाऱ्या सांभाळून लोकसभा आणि विधानसभेमध्ये विजय प्राप्त करून दिला पक्षाने आता त्यांना जबाबदारी दिली आहे यापूर्वी मोहन पारधी तसेच अक्षय जोशी हे काम पाहत होते त्याच धर्तीवर





आगामी महानगरपालिका आणि नगरपालिका जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणूक साठी त्यांची निवड करण्यात आली आहे पक्षाचे जिल्हाध्यक्ष संतोष शिवरकर यांनी आमदार रणधीर भाऊ सावरकर खासदार अनुप धोत्रे संघटन मंत्री डॉक्टर उपेंद्र कोठेकर पालकमंत्री ऍडव्होकेट आकाश फुंडकर, आमदार हरीश पिंपळे आमदार प्रकाश भारसाकले विनिमय करून मानव मानकर त्यांनी या नावाची घोषणा केली आहे.

# बोगस "डॉक्टरेट" पासून सावध रहा!

**मागच्या वर्षी मी एक लेख लिहिला होता, तो म्हणजे "असले पुरस्कार नको रे बाप्पा !" त्याचे कारण म्हणजे, समाज माध्यमांचा गैरवापर करून खोटी प्रतिष्ठा, प्रसिध्दी मिळवू इच्छिणाऱ्या व्यक्तींकडून काही हजार रुपये घेऊन हे पुरस्कार सरळसरळ विकण्यात आलेले असतात. तथाकथित पुरस्कार प्राप्त व्यक्ती त्या पुरस्कारासह छायाचित्रे काढून घेऊन, त्या सोबत स्वत:ची माहिती देऊन प्रसार माध्यमे, समाजमाध्यमे यात ती प्रसिद्ध करून खोटी प्रतिष्ठा आणि खोटा मोठेपणा मिरवित राहतात.अजाण नागरिक या सर्व बोगस बाबींना भुलून पुरस्कार प्राप्त व्यक्तींना कधी समक्ष भेटून,फोन करून, फेसबुक, व्हॉट्स ॲप वर भरभरून शुभेच्छा देत राहतात. असेच गैर प्रकार तथाकथित "डॉक्टरेट" "ऑनररी डॉक्टरेट" च्या बाबतीतही होत आहेत.**

-------------

● देवेंद्र भुजबळ
9869484800

-------------

"डॉक्टरेट" किंवा "ऑनररी डॉक्टरेट" बोगस आहे, हे ओळखण्याच्या काही महत्वाच्या पुढील बाबी आपण लक्षात घेतल्या पाहिजेत, जेणेकरून आपली आणि आपल्या मार्फत समाजाची, सरकारची आणि अन्य संबंधित व्यक्ती, संस्था यांची होणारी फसवणूक टळू शकेल.

अन्यथा अशा व्यक्तिविरुद्ध विविध कलमांद्वारे गुन्हे दाखल होऊन अशा बोगस पदव्यांपासून मिळणारी बोगस प्रतिष्ठा मिळणे तर दूरच राहील, पण आपल्या वाडवडिलांनी आणि आपण कष्टाने कमविलेली आहे ती खरीखुरी प्रतिष्ठा धुळीस मिळू शकेल.

या बाबतीत काय कायदेशीर कारवाईला तोंड द्यावे लागू शकते, याविषयी कुणी कायदेतज्ञ,जाणकार वकील अधिक चांगला प्रकाश टाकू शकतील.

आता मिळणारी "डॉक्टरेट" किंवा "ऑनररी डॉक्टरेट" ही बोगस आहे, हे ओळखण्याच्या काही अत्यंत सोप्या बाबी आहेत. त्या आपण लक्षात घेतल्या पाहिजेत.

१) कुठलेही खरेखुरे विद्यापीठ हे, ह्या बोगस जाहिरातींप्रमाणे समाज माध्यमातून जाहिराती देत नाही. तर ते अधिकृत वृत्तपत्रांमधूनच जाहिराती देत असतात.

२) ह्या जाहिरातीमध्ये ह्या बोगस विद्यापीठांचे पूर्ण पत्ते, लॅन्ड लाइन फोन नंबर नसतात. तर संपर्क साधण्यासाठी फक्त मोबाईल क्रमांक दिलेला असतो.

३) दिल्या जाणाऱ्या प्रमाणपत्रावर सुद्धा बोगस विद्यापीठांचे पूर्ण पत्ते नसतात.

४) जगातील कुठलेही विद्यापीठ हे त्यांचे पदवीदान समारंभ हे त्यांच्या पदवीदान सभागृहात किंवा पदवीदान समारंभ अतिशय भव्य स्वरूपात करावयाचा असेल तरी तो त्यांच्या प्रांगणातच आयोजित करीत असतात.

अशा पदवीदान समारंभांना त्या विद्यापीठाचे कुलगुरू, विद्यापीठाने निमंत्रित केलेले,तोलामोलाचे प्रमुख पाहुणे,विविध विभागांचे प्रमुख, संबंधित विद्यार्थी, पालक असे शेकडोंच्या संख्येने उपस्थित असतात.

५) कुठलेही खरेखुरे विद्यापीठ हे ऑनररी डॉक्टरेट साठी मुळात जाहिरातच देत नाही, तर ते स्वतःहून कुठल्या मान्यवर व्यक्तीला अशी पदवी द्यायची ते ठरवीत असते.

६) बोगस पदव्यांचे बोगस पदवीदान समारंभ हे कुठल्यातरी पंचतारांकित हॉटेलमध्ये किंवा अशाच स्वरूपाच्या सभागृहात आयोजित करण्यात येतात.

आता हे सर्व बोगसच असल्यामुळे वर उल्लेख केला आहे त्याप्रमाणे तिथे कुणी कुलगुरू, प्रमुख पाहुणे, हजारो विद्यार्थी, त्यांचे पालक असे कुणीही उपस्थित नसते. मात्र हे बोगस विद्यापीठ "आंतरराष्ट्रीय" आहे हे भासविण्यासाठी एकदोन आफ्रिकन, पाश्चात्य गोरी माणसे उभी केलेली असतात.





अर्थात ती सुद्धा ह्या टोळीचा भाग असतात. काही वेळा मात्र, अशा भानगडींची काही कल्पना नसलेल्या काही भारतीय प्रतिष्ठित व्यक्ती देखील उपस्थित राहून, अशा बोगस पदवीदान समारंभांची प्रतिष्ठा, शान वाढवित असल्याचे दिसून येते.

७) कुठलेली खरेखुरे विद्यापीठ हे ऑनररी डॉक्टरेट साठी एक पैसाही घेत नाही. कारण ती पदवी ही सन्मान म्हणून देण्यात आलेली असते.

८)बोगस डॉक्टरेट, ऑनररी डॉक्टरेट ह्या पदव्या सरळ सरळ लाखो रुपये घेऊन देण्यात आलेल्या असतात.


९) बरं,ह्या टोळ्या परदेशातीलच असतील,तर असेही नाही! मागे मी शोध घेतला असता,अशा बोगस विद्यापीठाचा पत्ता चक्क सांगलीचा निघाला. मी स्वतः येऊन पैसे भरतो, आपला पत्ता पाठविल्यास बरे होईल, असे सांगितल्यावर त्यांनी फक्त शिवाजी चौक, सांगली इतकाच पत्ता दिला.

माझ्या सांगली येथील एका मित्राला तिथे जाऊन शोध घेण्यास सांगितले असता, तास भर शोध घेऊनही त्याला हे आंतरराष्ट्रीय विद्यापीठ किंवा विद्यापीठाची साधी पाटीही कुठे दिसली नाही! मी संबंधित महिलेला फोन करून हे सांगितले तर तिने माझा फोन कट करून माझा नंबरच ब्लॉक करून टाकला. माझ्या लक्षात आलेल्या काही बाबी मी वर नमूद केल्या आहेत. जाणकार मंडळी अधिक भर घालू शकतील.

"बोगस डॉक्टरेट", "ऑनररी डॉक्टरेट" मिळविण्यापासून सावध रहा. स्वतः फसू नका आणि ह्या पदव्या स्वतःच्या नावापुढे लावून इतरांना फसवू नका, असे कळकळीने सांगावेसे वाटते. आपल्याला खरीखुरी डॉक्टरेट, खरीखुरी ऑनररी डॉक्टरेट खरोखरच खरेखुरे संशोधन करून मिळावी, समाजासाठी विशेष योगदान देऊन मिळावी, यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा.

■ ■ ■

# ६४ घरांची मराठमोळी राणी



जॉर्जिया देशाची राजधानी असलेल्या बटूमी या शहरात पार पडलेल्या जागतिक महिला बुद्धिबळ विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत मराठमोळ्या दिव्या देशमुखने भारताच्याच कोनेरू हंपी हिला टायब्रेकरमध्ये २.५ - १.५ अशी आघाडी घेऊन विश्वविजेतेपद मिळवले आणि इतिहास घडवला.

अवघ्या १९ वर्षाच्या दिव्याची ही कामगिरी स्वप्नवत अशीच आहे. तिच्या या कामगिरीने १३ कोटी मराठी माणसांचीच नाही तर १४५ कोटी भारतीयांची मान देखील अभिमानाने उंचावली आहे. हे विश्वविजेतेपद मिळवून दिव्याने आपणच ६४ घरांची नवी राणी असल्याचे सिद्ध केले.

तिच्या कामगिरीचे जितके कौतुक करावे तितके कमी आहे कारण ही स्पर्धा जेंव्हा सुरू झाली तेंव्हा तिला कोणीही जमेस धरले नव्हते. तिच्यापेक्षाही दिग्गज आंतरराष्ट्रीय बुद्धिबळपटू या स्पर्धेत सहभागी झाले होते. या स्पर्धेत जगभरातील १०७ बुद्धिबळपटू निवडले गेले होते.

बाद फेरीने रंगलेल्या या स्पर्धेत अंतिम फेरीसाठी निवडलेल्या बुद्धिबळपटूत अव्वल तीन खेळाडू हे चीनचे होते. चौथी खेळाडू ही भारताचीच अंतिम फेरीत पोहचलेली कोनेरू हंपी होती. दिव्याचे स्थान पंधरावे होते. अंतिम फेरीसाठी आठ भारतीय आणि आठ चिनी खेळाडूंची निवड झाली होती.

रशियाचेही काही खेळाडू अंतिम फेरीत होते. चीन, रशिया या देशातील खेळाडूंचा या स्पर्धेत दबदबा होता. भारताच्याही कोनेरू हंपी हिला विश्वविजेतेपदासाठी प्रबळ दावेदार समजले जात होते पण नवख्या दिव्याला मात्र कोणीच या स्पर्धेचे संभाव्य विजेते म्हणून संबोधले नव्हते मात्र जशीजशी स्पर्धा पुढे सरकत गेली तशीतशी दिव्याची कामगिरी सरस ठरत गेली.

आपल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंवर मात करत दिव्या पुढे जात होती. अंतिम फेरी चीनच्या दोन खेळाडूत होईल अशी स्पर्धेच्या सुरवातीस जी शक्यता वर्तवण्यात आली होती ती फोल ठरवत दिव्या आणि कोनेरू यांनी सर्वांना चकित करून अंतिम फेरी गाठली. अंतिम फेरीत दोन भारतीय खेळाडू असल्याने हा विश्वचषक भारताकडेच राहील हे स्पष्ट झाले.

अंतिम फेरीत दिव्याची गाठ अनुभवी ग्रँडमास्टर कोनेरू हंपी हिच्याशी पडली. ३८ वर्षीय ग्रँडमास्टर कोनेरू हंपी ही भारताचीच नव्हे तर जगातील दिग्गज बुद्धिबळपटू आहे. तिने याआधी अनेक आंतरराष्ट्रीय स्पर्धा जिंकून आपले श्रेष्ठत्व सिद्ध केले आहे. अंतिम फेरीपूर्वी कोनेरूच सवार्ची हॉट फेवरेट होती कारण १९ वर्षाची दिव्या तिच्यापुढे अतिशय नवखी होती.

कोनेरूने २००२ साली जागतिक जलद बुद्धिबळ स्पर्धा जिंकली होती. त्यानंतर तीन वर्षांनी दिव्याचा जन्म झाला होता. कोनेरूकडे अनुभव होता तर दिव्याकडे आत्मविश्वास होता. उपांत्य फेरीत दोघींनी चीनच्या खेळाडूंवर मात केली होती. अंतिम फेरीच्या सुरुवातीचे दोन्ही डाव बरोबरीत सुटले.

टायब्रेकरच्या दुसऱ्या डावात दिव्याने वर्चस्व राखले. तिने हा डाव ७५ चालित जिंकला आणि विश्वविजेतपदावर मोहोर उमटवली. अंतिम फेरीत अनुभवावर आत्मविश्वासाने मात केली आणि दिव्या बुद्धिबळाची नवी राणी ठरली.

हा विश्वकप जिंकणारी दिव्या ही भारताची चौथी खेळाडू ठरली. याआधी हा किताब कोनेरू हंपी , रमेशबाबू वैशाली आणि द्रोणवली हरिका यांनी जिंकला होता. या विजेतेपदाबरोबर दिव्या आता ग्रँडमास्टरही बनली आहे. ग्रँडमास्टर ठरणारी ती भारताची चौथी खेळाडू ठरली आहे.

अर्थात दिव्याला मिळालेले हे यश एका रात्रीत मिळालेली नाही त्यासाठी तिला मोठा त्याग आणि परिश्रम करावे लागले आहे. ज्या वयात मुले टीव्हीवर कार्टून पाहण्यात व्यग्र असतात त्या वयात तिने बुद्धिबळ खेळण्यास सुरुवात केली. बुद्धिबळासाठी ती टीव्ही आणि मोबाईलपासून दूर राहिली.

दिव्याने बुद्धिबळावर लक्ष केंद्रित करावे म्हणून तिच्या पालकांनी घरातील टीव्ही बंद केला. बुद्धिबळात आवड निर्माण झाल्यावर दिव्याने अवघ्या पाचव्या वर्षी पहिले विजेतेपद मिळवले. पाचव्या वर्षी बुद्धिबळात पहिले विजेतेपद मिळवणाऱ्या दिव्याने पुढे आपल्या विजेतेपदाचा धडाका सुरू केला.

दिव्याने २००२ साली महिला बुद्धिबळ स्पर्धेचे विजेतपद मिळवले आणि त्यानंतर पुढील वर्षी आशियाई स्पर्धेचे विजेतपद मिळवले. दिव्या अंडर २० विश्वचषक स्पर्धेची ज्युनियर चॅम्पियन देखील ठरली आहे. तिचा हा प्रवास निश्चितच प्रेरणादाई आहे. तिचे हे विजेतपद देशातील किशोरवयीन मुलांसाठी प्रेरणादाई आहे.

तिच्यामुळे आता ही मुले देखील बुद्धिबळाकडे वळतील आणि भविष्यात भारताला आणखी दिव्या मिळतील यात शंका नाही. जागतिक विश्वचषक बुद्धिबळ स्पर्धा जिंकून ६४ घरांची नवी राणी बनलेल्या मराठमोळ्या दिव्या देशमुख हिचे विश्वविजेतेपदासाठी मनापासून अभिनंदन!!



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

(कालच्या अंकावरून पुढे)

-------------

# शेख हसीना पुनरागमन करणार!

उत्तरार्ध

● अभय गोखले

जर मुक्त वातावरणात निवडणुका घेण्यात आल्या तर अवामी लीग हा पक्ष मोठा विजय मिळवू शकेल असे भाकीत त्यांनी केले. कोलकाता येथील " द स्टेट्समन " या वृत्तपत्राचे प्रतिनिधी म्हणून मानस घोष यांनी बांगलादेश मुक्तीसंग्रामाचे,ऑन द स्पॉट रिपोर्टिंग केले होते, त्यामुळे त्यांच्या म्हणण्याला मोठा अर्थ आहे.

घोष यांनी आपल्या पुस्तकात बंगबंधू शेख मुजिबर रेहमान यांनी सत्तेवर आल्यानंतर ज्या काही चुका केल्या, त्याबाबत सविस्तरपणे लिहिले आहे. बांगलादेश स्वतंत्र झाल्यानंतर स्टेट्समनचे ब्युरो चीफ म्हणून घोष यांची तेथे नियुक्ती करण्यात आली. त्यामुळे त्यांनी शेख मुजिबर रेहमान यांची राजवट जवळून पाहिली असणार. घोष यांचे ते पुस्तक मी वाचलेले नसले तरी बांगलादेशच्या राजकारणावर मी लिहिलेले पुस्तक " शेख मुजिबर रेहमान ते शेख हसीना वाजेद " हे गेल्यावर्षी प्रकाशित झाले आहे,त या पुस्तकात मी शेख मुजिबर यांनी सत्तेवर आल्यानंतर ज्या काही चूका केल्या त्याबाबत सविस्तरपणे लिहिले आहे.

शेख मुजिबर रेहमान हे सत्तेवर येण्यापूर्वीची परिस्थिती अशी होती. पाकिस्तानी लष्कराने पूर्व पाकिस्तानातील आपल्या नऊ महिन्यांच्या वास्तव्यात पूर्व पाकिस्तानला बेचिराख करून टाकले होते. तेथील अर्थव्यवस्था डबघाईला आली होती.

त्यातच १९७४ साली बांगलादेश मध्ये आलेल्या मोठ्या वादळाने आणि पुराने शेतीचे प्रचंड नुकसान झाले होते.ब ांगलादेशात ओला दुष्काळ पडला होता. खेडेगावातील शेतकरी आपली पाळीव जनावरे विकून आपला उदरनिर्वाह करत होते. खेडेगावातील बरेचसे लोक अन्नाच्या शोधात आपले गाव सोडून शहराकडे निघाले होते. दुष्काळग्रस्त लोकांसाठी शेख मुजिबर यांच्या सरकारने मदत कार्य हाती घेतले होते. मात्र अवामी लीगचे कार्यकर्ते गरीब लोकांकडून लाच घेऊन त्यांना मदत पुरवत होते.

मुजिबर रेहमान यांच्या पक्षाचे कार्यकर्ते हे चोर आणि लुटेरे असल्याचा समज जनतेमध्ये पसरला होता. मुजिबर रेहमान हे त्याला आळा घालू न शकल्याने जनतेचा मुजिबर रेहमान यांच्यावरील विश्वास उडत चालला होता.

महागाईवर नियंत्रण आणण्यात मुजिब, अपयशी ठरले होते. प्रशासनात भ्रष्टाचार वाढल्यामुळे त्याला पायबंद घालण्यासाठी मुजिब यांनी सर्व सूत्रे आपल्या हातात घ्यायचे ठरवले. त्यांनी घटना दुरुस्ती करून पाच वर्षांसाठी स्वतःला अध्यक्ष बनवले.

विरोधी पक्षांना मोडीत काढून त्यांनी बांगला देशमध्ये जवळजवळ एकपक्षीय राजवट आणली. संसदीय प्रणाली संपुष्टात आणली.आपल्या अवामी लीग या पक्षाचे नामांतर करून त्यांनी " बांगलादेश कृषक श्रमिक अवामी लीग " या पक्षाची स्थापना केली.

' एक नेता एक देश - शेख मुजिब बांगलादेश 'अशी नवीन घोषणा तयार करण्यात आली.मुजिब यांनी नवीन विचारसरणी अमलात आणून त्याला मुजिबवाद असे नाव दिले. बांगलादेश मधील जनतेने मुजिबवाद अंगिकारावा असे त्यांनी आवाहन केले. मुजिबवाद म्हणजेच राष्ट्रवाद, समाजवाद, धर्मनिरपेक्षता आणि लोकशाही असे स्पष्ट करण्यात आले.

मुजिबर यांनी देशातील दोन चार वृत्तपत्रे सोडली तर इतर सर्व वृत्तपत्रांवर बंदी घातली. त्यामुळे जनमानसात त्यांच्याबाबत असलेला असंतोष त्यांच्यापर्यंत नीटपणे पोहोचलाच नाही. त्यांच्याविरूध्दचा असंतोष वाढतच गेला. त्यांना फोनवर धमक्या येऊ लागल्या.

एक दिवस त्यांचे निकटचे सहकारी ताजुद्दिन हे त्यांना ढाका येथील धनमंडी या त्यांच्या निवासस्थानी मध्यरात्री भेटावयास आले होते. ताजुद्दिन यांनी मुजिबर यांना त्यांचे धनमंडी हे निवासस्थान सोडण्याचा सल्ला दिला. ते म्हणाले हे घर तुमच्यासाठी सुरक्षित नाही. कदाचीत लष्कर तुमच्या विरोधात बंड करू शकते.

तो सल्ला मुजीबर यांनी गंभीरपणे घेतला नाही. त्यांना अशी खात्री वाटत होती की, कोणताही बंगाली माणूस त्यांच्याशी दगाफटका करणार नाही. मात्र हा त्यांचा विश्वास चुकीचा ठरला आणि बांगलादेश लष्करातील ज्युनिअर ऑफिसर्सनी त्यांच्या विरुद्ध केलेल्या बंडात ते मारले गेले.

■ ■ ■

# आमचा इतिहासच बदलून टाकला



प्राचीन काळी ग्रीस देशामधे मॅरॅथॉन नावाचे एक पठार होते; तिथे एक लढाई झाली असता, ती लढाई जिंकल्यावर, ती बातमी सांगण्यासाठी एक सैनिक तिथपासून ते अथेन्सपर्यंत धावत गेला होता. ते अंतर ४२.१९५ किमी होते.

ज्या गावी लढाई ही झाली, त्या गावाचे नाव 'मॅरॅथॉन' हे स्पर्धेचे नाव झाले आणि जे अंतर तो सैनिक पळला ते अंतर स्पर्धेसाठी अधिकृतरित्या जगभर स्विकारले गेले.

दुर्दैवाने अतिश्रम होऊन तो सैनिक पोहोचताच विजयाचा निरोप देऊन मरण पावला. या सैनिकाचे नाव फेडापेद्दीस. काही इतिहासकार तो ३५ किमी पळाला असे म्हणतात. ते काहीही असो. पण याची दौड अजरामर झाली.

फेडापेद्दीस ४२ किमी पळाला. रिकाम्या हातानी पळाला. आणि आमचे मावळे? आषाढी पौर्णिमेला, गुरुवार १२ जुलै १६६० च्या पावसाळी रात्री पन्हाळा ते पावनखिंड हातात शस्त्र आणि पाठीवर शत्रू घेऊन मुसळधार पावसात दगड धोंडे तुडवत पळाले. किती? ३५ नाही, ४२ नाही तर तब्बल ५२ किमी! आणि लढलेसुद्धा! बलाढ्य शत्रूशी लढले.

कुठे आहे याची जगाच्या इतिहासात नोंद? असणारच नाही. आम्ही आमच्या कर्मानेे इंग्रजांचे गुलाम झालो. त्यांनी आमचा इतिहासच बदलून टाकला आणि आम्हीच आम्हाला लुटारू म्हणू लागलो. आपले दुर्दैव असे की केवळ इंग्रजांनीच आपला इतिहास बदलला नाही तर त्यांच्या पूर्वी येथील काही जातीवादी लोकांनी चुकीच्या इतिहासाची नोंद केली.

■ ■ ■




सौदी अरेबियातील शास्त्रज्ञांनी एक असे मीठ शोधून काढले आहे जे बॅटरीची शक्ती १० पटीने वाढवेल.

शास्त्रज्ञांना असे आढळून आले आहे की पाण्याचे द्रावण वापरणाऱ्या बॅटरीमध्ये 'फ्री वाटर' नावाचे कण असतात, जे बॅटरीला लवकर नुकसान पोहोचवतात.

आता असे आढळून आले आहे की जर झिंक सल्फेटसारखे विशेष 'मीठ' जोडले तर हे 'फ्री वाटर' कण नियंत्रित होतात आणि बॅटरीचे आयुष्य अचानक १० पट वाढते!

हे 'मीठ' खूप स्वस्त आणि सहज उपलब्ध आहे, ज्यामुळे बॅटरी स्वस्त आणि सुरक्षित होतील. शास्त्रज्ञांना आशा आहे की हा शोध सौरऊर्जेसारख्या मोठ्या वीज प्रणालींसाठी बॅटरी बनवण्यासाठी खूप उपयुक्त ठरेल, कारण या लिथियम बॅटरीपेक्षा सुरक्षित आणि अधिक टिकाऊ असतील.

■ ■ ■

## शिवलिंगावर अर्पण केलेले दूध वाया जात नाही !

वाचक लिहितात

श्रावणमास सुरु झाला आणि त्यातील पहिला सोमवारही नुकताच सरला. अनेक शिवभक्त श्रावण मासातील सोमवार व्रतस्थ राहून उपवास करतात. त्यानिमित्ताने शिवमंदिरात जाऊन शिवलिंगाला दुग्धाभिषेक करतात. शिवलिंगामध्ये प्रचंड शक्ती सामावली असल्याने त्यावर ताम्र कलशाद्वारे सतत जलाभिषेक चालू ठेवला जातो. शिवलिंगावर अर्पण केलेले दूध असेच वाया न घालवता भाविकांना ते तीर्थ स्वरूपात वाटले जाते. शिवलिंगावर अर्पण केलेल्या दुधाचे तीर्थात रूपांतर झाल्यावर शिवलिंगाच्या चैतन्यामुळे त्याच्या चवीत होणारा आमूलाग्र बदल प्रत्येक शिवभक्ताने अनुभवलेला असतो.

स्वतःला पुरोगामी म्हणवून घेणारी मंडळी मात्र श्रावण मास जवळ आला की, 'दूध पिंडीवर सांडून वाया घालवू नका त्याऐवजी ते गरिबांना वाटा' असा कंठशोष करताना आढळतात. होळी जवळ आली कि कचऱ्याची होळी करा, होळी लहान करा पोळी दान करा, गणेशोत्सवात मूर्तीदान करा यांसारख्या मोहिमा ही मंडळी राबवत असतात. बुद्धी पाजळणारी ही मंडळी अन्य धर्मियांच्या सणांच्या वेळी मात्र मूग गिळून गप्प असतात. सुधारणावादी मंडळींना सुधारणा करायचीच आहे तर मनुष्याच्या वृत्तीमध्ये सुधारणा करण्यासाठी त्यांनी प्रयत्न करावेत.

■ मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई.



# हार्ट ब्लॉकेजचा धोका टाळण्यासाठी आहारात करा या तीन भाज्यांचा समावेश

आजकाल सर्व वयोगटातील लोकांमध्ये हृदयविकाराचा धोका निर्माण होत आहे. त्यामुळे हा एक प्रमुख चिंतेचा विषय बनला आहे. विशेषतः हार्ट ब्लॉकेजचा धोका हा हृदयाच्या धमन्यांमध्ये अडथळा निर्माण करतो. त्याचे मुख्य कारण अनहेल्दी जीवनशैली, चुकीच्या खाण्याच्या सवयी आणि वाढता कामाचा ताण यामुळे हृदयविकाराचा धोका वाढत आहे. पण तुम्ही योग्य वेळी तुमच्या आहारात काही आवश्यक बदल केले तर हा धोका कमी करता येतो.

डॉक्टरांच्या मते, लसूण, ब्रोकोली आणि पालक यासारख्या काही नैसर्गिक भाज्या हृदयाच्या धमन्या स्वच्छ ठेवण्यासाठी, रक्तदाब नियंत्रित करण्यासाठी आणि कोलेस्टेरॉल कमी करण्यासाठी उपयुक्त आहेत.

**लसूण :** हृदयाच्या आरोग्यासाठी लसूण हा सर्वोत्तम नैसर्गिक औषध मानला जातो. त्यात ॲलिसिन नावाचे सक्रिय संयुग असते जे कोलेस्टेरॉल कमी करण्यास, रक्तदाब नियंत्रित करण्यास आणि रक्तवाहिन्यांमध्ये जमा झालेले फॅट साफ करण्यास मदत करते. तसेच संशोधनात असे आढळून आले आहे की कच्चा लसूण नियमितपणे खाल्ल्याने हृदयविकाराचा झटका आणि ब्लॉकेजचा धोका कमी होतो. दररोज सकाळी रिकाम्या पोटी कच्च्या लसूणाच्या एक किंवा दोन पाकळ्या चावून खा.

**ब्रोकोली :** ब्रोकोली हे फायबर, अँटिऑक्सिडंट्स आणि जीवनसत्त्वे के आणि सी ने समृद्ध असलेले सुपरफूड आहे. ते रक्तवाहिन्यांच्या भिंती मजबूत करते आणि त्यातील सुज कमी करते. ब्रोकोली रक्तदाब नियंत्रित करण्यास आणि हृदय निरोगी ठेवण्यास मदत करते. ब्रोकोली हलके वाफवून किंवा सॅलडमध्ये मिक्स करून खाऊ शकता.

**पालक :** पालकामध्ये लोह, फॉलिक ॲसिड आणि नायट्रेट भरपूर प्रमाणात असते, जे रक्त शुद्ध करण्यास, स्नायूंना ऑक्सिजन पोहोचवण्यास आणि धमन्या उघडण्यास मदत करते. शरीरात नायट्रेट्स प्रवेश केल्याने नायट्रिक ऑक्साईडमध्ये बदलतात, ज्यामुळे रक्त प्रवाह सुधारतो आणि हृदयाच्या विकाराचा धोका कमी होतो. पालक भाजी, सूप किंवा ज्यूस म्हणून सेवन करता येते.

**वेळोवेळी आरोग्य तपासणी करणे आवश्यक**

हृदयविकाराचा धोका पूर्णपणे रोखणे कठीण आहे, परंतु योग्य आहार आणि जीवनशैलीने ते निश्चितच टाळता येते. लसूण, ब्रोकोली आणि पालक यासारख्या नैसर्गिक भाज्यांचा रोजच्या आहारात समावेश करून हृदय निरोगी ठेवता येते.

● ● ●

अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

## पुतळ्यांचे मनोगत

**बंधुता समता एकतेसाठी
आयुष्यभर झटलो आम्ही
प्रेरणा मिळावी भावी पिढीला
म्हणून पुतळे उभारले तुम्ही..**

**जात - पात धर्मभेद
नाही आम्हा अपेक्षीत
जातीच्या पिंजऱ्याने आम्हा
तुम्ही केले संकुचित ..**

**उभारा पुतळे
करा आमचा उदो उदो
पण शपथेवर खरे सांगा
आमच्या आदर्शांचा तुम्ही
तरी अंगीकार केला काहो?**

## शिवसेनेची निवडणूक आयोगाकडे ठाम मागणी
## मतदार यादी आधारशी जोडा, बांग्लादेशी नावे वगळा!

नवी दिल्ली, दि. २९ : प्रतिनिधी




आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर, निवडणूक प्रक्रिया पारदर्शक करण्यासाठी शिवसेनेच्या शिष्टमंडळाने आज केंद्रीय निवडणूक आयोगाकडे ठोस मागण्या मांडल्या. मतदार यादी आधार क्रमांकाशी जोडण्याची आणि त्यामध्ये घुसखोर बांग्लादेशी नागरिकांची नावे वगळण्याची आग्रही मागणी या शिष्टमंडळाने केली.

उद्योगमंत्री उदय सामंत, मंत्री शंभूराज देसाई, खासदार मिलिंद देवरा, माजी खासदार राहुल शेवाळे यांनी आज नवी दिल्लीतील मुख्य निवडणूक आयुक्त ग्यानेश कुमार, आयुक्त डॉ. सुखबीर सिंग संधू आणि डॉ. विवेक जोशी यांची भेट घेऊन पक्षाचा स्पष्ट आणि कडक भूमिका मांडली.

"मुंबईसारख्या महानगरांमध्ये घुसखोरीचं प्रमाण गंभीर असून, अनेक बांग्लादेशी नागरिकांची नावे मतदार यादीत आढळून येतात. ही बाब लोकशाहीसाठी धोकादायक आहे. त्यामुळे निवडणूक आयोगाने या यादींची छाननी करून अवैध नावे हटवावीत," अशी ठाम मागणी सामंत यांनी यावेळी केली.

त्याचबरोबर, निवडणुका अधिक पारदर्शक व विश्वासार्ह करण्यासाठी मतदार यादी आधार क्रमांकाशी जोडण्याचा मुद्दाही यावेळी चर्चेला आला.

या बैठकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'एक देश, एक निवडणूक' या संकल्पनेला शिवसेनेने पुन्हा एकदा पाठिंबा दर्शवला. "एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना ही संकल्पना देशहिताची मानते," असं म्हणत सामंत यांनी आयोगाला पक्षाचा अधिकृत अभिप्राय दिला.

सर्वोच्च न्यायालयातील धनुष्यबाण खटल्यावर चर्चा झाल्याची अफवा सामंत यांनी स्पष्टपणे फेटाळून लावली. "आम्ही न्यायप्रक्रियेवर आणि निवडणूक आयोगाच्या प्रक्रियावर पूर्ण विश्वास ठेवतो," असं त्यांनी नमूद केलं.

या बैठकीत झालेल्या चर्चेमुळे स्थानिक निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या राजकारणात हलचाल वाढली असून, मतदार याद्यांच्या शुद्धीकरणास नव्या घडामोडींना सुरुवात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# ८ हजार कंत्राटी कामगार कायम होणार

## कामगारांना सरकारी योजनेतून मालकी हक्कांची घरे
## मुंबई मनपातील सफाई कामगारांचा ऐतिहासिक विजय

मुंबई, दि. २९ : प्रतिनिधी

मुंबई महानगरपालिकेतील कंत्राटी सफाई कामगारांच्या लढ्याला अखेर मोठे यश मिळाले आहे. 8 हजार कंत्राटी कामगार कायम होणार असून, यासोबतच लाड-पागे समितीच्या शिफारसी लागू करण्यात येणार असल्याने विविध आस्थापनांतील सुमारे 50 हजार कामगारांना त्याचा थेट लाभ मिळणार असल्याचे काल मनपा प्रशासनासोबत झालेल्या करारात स्पष्ट झाले. या ऐतिहासिक विजयाचे नेतृत्व समाजवादी कामगार नेते कपिल पाटील यांनी केले. बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त भूषण गगराणी यांच्या अध्यक्षतेखाली ही निर्णायक बैठक पार पडली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे कपिल पाटील यांनी सफाई कामगारांच्या आंदोलनाबाबत रदबदली केली होती. मुख्यमंत्र्यांच्या आश्वासनानंतर संप टळला होता. स्वत: मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या निर्देशानुसार मनपा आयुक्तांसोबत कामगार संघटनांच्या दोन बैठका झाल्या. सफाई कामगारांच्या मागण्यांना न्याय देण्याचा मार्ग मोकळा झाला. म्युनिसिपल



कामगार ॲक्शन कमिटी आणि मनपा कामगार संघर्ष समितीच्या शिष्टमंडळाने या बैठकीत सहभाग घेतला आणि अनेक मागण्यांवर ठोस निर्णय घेण्यात आले. विशेष म्हणजे, कोणतेही पद कमी न करता 8 हजार कंत्राटी कामगारांना कायम करण्यात येणार आहेत, लाड पागे समितीच्या शिफारशी लागू होणार असून त्याचा थेट लाभ 50 हजार कामगारांना मिळणार हे या कराराचे सर्वात मोठे आणि ऐतिहासिक यश ठरते.

लाड-पागे समितीच्या शिफारसी अंमलात आणण्याचा निर्णय फक्त काही निवडक कर्मचाऱ्यांपुरता मर्यादित न राहता सुमारे 50 हजार कर्मचाऱ्यांना त्याचा फायदा होईल. वेतन, सेवा-सुविधा आणि सुरक्षितता यांच्याबाबतीत मोठा बदल घडवणारा हा टप्पा आहे. शासनाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजेतून कामगारांना मालकी हक्क मिळवून देण्याबाबत महापालिका स्वतः पाठपुरावा करील असे आश्वासनही बैठकीत देण्यात आले. या ऐतिहासिक निर्णयामागे एकजुटीने लढलेले नेतेमंडळ आणि कामगारांची दीर्घकालीन चळवळ आहे. या बैठकीत समाजवादी कामगार नेते कपिल पाटील यांच्या नेतृत्वाखाली सुरेश ठाकूर, विजय कुलकर्णी, अशोक जाधव, रमाकांत बने, वामन कविस्कर, मिलिंद रानडे, रंगा सातवसे, बाबा कदम, देवी गुजर, प्रकाश जाधव, शेषराव राठोड, प्रफुल्लता दळवी आदी मान्यवर उपस्थित होते. या संघर्षात सहा संघटना एकत्र आल्या होत्या. त्यामुळेच हा ऐतिहासिक विजय शक्य झाला. या लढ्याने पुन्हा एकदा सिद्ध केले की, संघटित संघर्ष, स्पष्ट भूमिका आणि सामाजिक न्यायासाठीची बांधिलकी असेल तर कोणताही अन्याय दूर करता येतो. हा विजय केवळ कामगारांच्या एकजुटीचा आणि त्यांनी न्यायासाठी दिलेल्या लढ्याचा आहे, असे मत हिंद मजदूर किसान पंचायतचे राज्य अध्यक्ष कपिल पाटील यांनी व्यक्त केले आहे.

## परभणीतील काँग्रेसला मोठा झटका! वरपुडकरांचा भाजप प्रवेश
# गोरंट्यालांचा मात्र रखडला

मुंबई, दि. २९ : प्रतिनिधी

परभणीतील काँग्रेसला जबर धक्का देत माजी मंत्री सुरेश वरपुडकर यांनी आपल्या समर्थकांसह भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. मात्र, त्याचवेळी काँग्रेसचे आणखी एक वजनदार नेते – तीन वेळचे आमदार आणि सध्या काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष कैलास गोरंट्याल यांचा पक्षप्रवेश रखडल्याने चर्चेला उधाण आलं होतं. आता या चर्चांना पूर्णविराम देत, खुद्द गोरंट्याल यांनी स्पष्ट केले आहे की, ३१ जुलै रोजी ते स्वतंत्रपणे भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत. गोरंट्याल यांनी माध्यमांशी बोलताना स्पष्ट केले की, "आपला पक्षप्रवेश सुरेश वरपुडकर यांच्यासोबत नको अशी भूमिका मी भाजप नेत्यांकडे स्पष्टपणे मांडली होती." त्यामुळे गोरंट्याल यांच्या पक्षप्रवेशासाठी स्वतंत्र सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. भाजप प्रदेश कार्यालयात हा कार्यक्रम पार पडणार असून काँग्रेसमधील अनेक माजी नगरसेवक, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती सदस्य देखील यावेळी भाजपमध्ये



प्रवेश करणार आहेत. भाजपचे जिल्हाध्यक्ष नारायण कुचे आणि मंत्री अतुल सावे यांनी फोनवरून ३१ जुलै ही प्रवेशाची तारीख निश्चित केल्याची माहिती गोरंट्याल यांनी दिली आहे. विशेष म्हणजे, आगामी महापालिका निवडणुकीत भाजपच्या तिकीटावर स्वबळावर संपूर्ण ताकदीने लढण्याची भूमिका आपण मांडणार असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

**गोरंट्याल यांचा काँग्रेसमधील प्रवास :**

कैलास गोरंट्याल यांनी ३५ वर्षे काँग्रेसमध्ये कार्यरत राहून तीन वेळा आमदार म्हणून निवडून येण्याचा विक्रम केला आहे. १९९९, २००९ आणि २०१९ या विधानसभा निवडणुकांत जालना मतदारसंघातून ते विजयी झाले. १९९९ ते २०२४ या कालावधीत काँग्रेसने सातत्याने त्यांच्यावर विश्वास दाखवत उमेदवारी दिली. त्यांची पत्नी संगीता गोरंट्याल या नगराध्यक्षपदावर कार्यरत होत्या. गेल्या दशकभरात जालना नगरपालिकेवर गोरंट्याल यांची एकहाती सत्ता राहिली.

वरपुडकर आणि गोरंट्याल हे दोघेही आपापल्या भागातील काँग्रेसच्या आधारस्तंभ मानले जात होते. एकाच वेळी दोघांचा भाजप प्रवेश काँग्रेससाठी मराठवाड्यातील मोठी धोक्याची घंटा ठरतो आहे. विशेष म्हणजे गोरंट्याल यांनी वरपुडकर यांच्याशी असलेला राजकीय मतभेद उघडपणे स्वीकारत स्वतंत्र ताकद दाखवण्याची रणनीती अवलंबल्याने जालना-परभणीच्या राजकारणात नव्या समीकरणांची सुरुवात झाली आहे. भाजपसाठी मात्र हा राजकीय 'डबल बोनस' ठरला असून, येत्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत या प्रवेशांचा स्पष्ट फायदा होईल, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

## मुंबईत वीजेचा धक्का लागून सहा माकडे जखमी

मुंबई, दि. २९ : प्रतिनिधी

गेल्या दोन महिन्यांमध्ये शहर, तसेच उपनगरांमध्ये विजेचा धक्का बसून सहा माकडे गंभीर जखमी झाली आहेत. झाडावर चढताना माकडे काही वेळा विजेच्या तारांना लोंबकळतात, त्यांच्या सहाय्याने झाडावर किंवा इतर ठिकाणी चढण्याचा प्रयत्न करतात. पावसाळा सुरू झाल्यानंतर विजेच्या तारा ओल्या होतात आणि त्या माकडांसाठी धोकादायक बनतात.

मुलुंड परिसरात नुकतेच एका माकडाला विजेचा धक्का बसला असून हे माकड ८० टक्के भाजल्याचे निदर्शनास आले. यादरम्यान माकडाला मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाला होता. संबंधित माकडाला वनविभागाने रेस्क्यूइंक असोसिएशन फॉर वाईल्ड लाईफ वेल्फेअरकडे (रॉ) सुपूर्द केले. त्यानंतर माकडाला 'हिमी बर्क व्हेटरनरी क्लिनिक'मध्ये नेण्यात आले, तिथे डॉ. प्रीती साठे यांच्या नेतृत्वाखाली त्याच्यावर वैद्यकीय उपचार सुरू आहेत. दरम्यान, पावसाळ्यात वृक्ष, घरांची छपरे, विजेचे खांब आणि तारा ओल्या असतात. त्याला स्पर्श झाल्यास तीव्र झटका बसतो. अनेक माकडे मृत्युमुखी पडतात, तर काही २४ तासही जगत नाहीत. आरे, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान आणि ठाणे परिसरातील जंगलाच्या आसपासच्या परिसरात असलेल्या घारांजवळ अनेकदा विजेच्या तारा झाडांमुळे किंवा वाऱ्यामुळे तुटून लटकताना दिसतात. या परिसरात आंबा, जांभूळ यांसारखी फळझाडे असल्यामुळे माकडांचा कळप अन्नाच्या शोधात तिथे येतो आणि चुकून विजेच्या तारांना स्पर्श करतात. या प्रकारांमध्ये जवळपास ९० टक्के माकडांना इजा होते.

गेल्या काही वर्षांत शहर आणि उपनगरात माकडांचा स्वैरसंचार वाढला आहे. उघड्यावरील कचरा, माकडांना खायला देणारे नागरिक यामुळे माकड मानवी वस्तीकडे अधिक आकर्षित होत आहेत. नागरिकांनी वन्यप्राण्यांना खायला घालू नये. पवन शर्मा, संचालक, रेस्क्यूइंक असोसिएशन फॉर वाईल्डलाईफ वेल्फेअर

या समस्येवर तात्काळ तोडगा नाही, पण स्थानिकांनी विजेच्या उघड्या किंवा लटकणाऱ्या तारांबाबत तात्काळ वीज वितरण कंपनी किंवा पालिकेकडे तक्रार केल्यास अशा दुर्घटना टाळता येऊ शकतात.

# पुणे रेव्ह पार्टी प्रकरणी प्रांजल खेवलकरसह ५ जणांना दोन दिवसांची पोलीस कोठडी

पुणे, दि. २९ : प्रतिनिधी

पुणे : संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडवून देणाऱ्या हाय-प्रोफाइल पुणे रेव्ह पार्टी प्रकरणी आज शिवाजीनगर न्यायालयात महत्त्वपूर्ण सुनावणी पार पडली. याप्रकरणी मुख्य आरोपी प्रांजल खेवलकरसह पाच जणांना दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे, तर दोन महिला आरोपींना न्यायालयीन कोठडीत पाठवण्याचा आदेश न्यायालयाने दिला. या निकालामुळे आता प्रकरणाच्या तपासाला नवी दिशा मिळण्याची शक्यता आहे. आजच्या सुनावणीवेळी राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रोहिणी खडसे आणि ठाकरे गटाच्या नेत्या रुपाली पाटील ठोंबरे यांनी वकिलाच्या भूमिकेत कोर्टात हजेरी लावल्याने या प्रकरणाला आणखी महत्त्व प्राप्त झाले होते.

**पोलिसांचा युक्तिवाद: तपासाची दिशा आणि कोठडीची गरज**

पोलीस दलाच्या वतीने न्यायालयात बाजू मांडताना तपासातील महत्त्वाचे टप्पे आणि अडचणी मांडण्यात आल्या. पोलिसांनी खालील मुद्दे कोर्टासमोर ठेवले.

**नव्या व्यक्तीचा सहभाग:** या प्रकरणात 'राहुल' नावाच्या एका व्यक्तीचा सहभाग निष्पन्न झाला आहे. तो पार्टीमध्ये हुक्का भरून देण्याचे काम करत होता. त्याचा या गुन्ह्यातील नेमका सहभाग आणि सूत्रधारांशी असलेले संबंध तपासणे आवश्यक आहे.

**अमली पदार्थांचा स्रोत:** आरोपींना अमली पदार्थ कोठून मिळाले, या प्रश्नावर ते एकमेकांवर जबाबदारी ढकलत आहेत. कोणीही ठोस माहिती देत नसल्याने मूळ पुरवठादारापर्यंत पोहोचण्यात अडथळा येत आहे.

**वैज्ञानिक पुरावे:** आरोपींचे रक्त आणि लघवीचे नमुने न्यायवैद्यक प्रयोगशाळेत (लॅब) पाठवण्यात आले असून, त्याचा अहवाल येणे बाकी आहे.

**कोठडीची मागणी:** या गुन्ह्यातील दोन महिलांना न्यायालयीन कोठडी आणि इतर सहा जणांना तपासात सहकार्य करण्यासाठी पोलीस कोठडी देण्यात यावी, अशी मागणी पोलिसांनी केली.

**बचाव पक्षाचा हल्लाबोल :** "आम्ही राजकीय बळी, आम्हाला अडकवलं जातंय!"

आरोपी विजय ठोंबरे आणि प्रांजल खेवलकर यांच्या वकिलांनी पोलिसांच्या मागणीला तीव्र विरोध करत खळबळजनक दावे केले. त्यांनी पोलिसांच्या तपासाच्या हेतूवरच संशय व्यक्त केला.

**खोटा रिमांड रिपोर्ट :** 'पोलिसांनी मागील वेळेस दिलेला रिमांड रिपोर्टच पुन्हा सादर केला आहे. त्यात काहीही नवीन नाही. ज्या कारणांसाठी एकदा पोलीस कोठडी मिळाली, त्याच कारणांसाठी पुन्हा कोठडी मागणे चुकीचे आहे,' असा युक्तिवाद बचाव पक्षाने केला.

अमली पदार्थ आणि ईशा सिंग : 'व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये स्पष्ट दिसत आहे की, अमली पदार्थ ईशा सिंग नावाच्या महिलेच्या बॅगेतून मिळाले आहेत. मग ज्या महिलेच्या बॅगेत ड्रग्ज सापडले, तिला तुम्ही न्यायालयीन कोठडी मागता आणि आमच्या अशीलला पोलीस कोठडी? हा कोणता न्याय?' असा थेट सवाल वकिलांनी उपस्थित केला.

**राजकीय षडयंत्राचा आरोप :** बचाव पक्षाने सर्वात गंभीर आरोप करताना म्हटले, 'आमचे अशील एका राजकीय व्यक्तीच्या जवळचे असल्यामुळेच त्यांना लक्ष्य केले जात आहे. हा राजकीय सूडबुद्धीने रचलेला सापळा असून, आमचा बळी दिला जात आहे."

**जाणीवपूर्वक अडकवल्याचा संशय :** "त्या महिलेला (ईशा सिंग) मुद्दाम आमच्यासोबत पाठवून आम्हाला अडकवण्यासाठी तर आणले गेले नाही ना?' अशी शंकाही बचाव पक्षाने व्यक्त केली, ज्यामुळे या प्रकरणाला एक नवे वळण मिळण्याची शक्यता आहे.


### आज का अंदाज

बुधवार ३० जुलै २०२५
जबरदस्त पास होणारे चान्सेस
पत्थर फोड एकच

कल्याण बाजार

| 1 | 3 | 5 | 8 |
|---|---|---|---|
| 236 | 346 | 780 | 224 |
| 380 | 490 | 267 | 369 |
| 470 | 580 | 500 | 468 |
| 13 | 32 | 52 | 82 |
| 15 | 35 | 56 | 85 |
| 18 | 38 | 59 | 89 |

मुंबई बाजार

| 2 | 4 | 6 | 7 |
|---|---|---|---|
| 129 | 248 | 268 | 124 |
| 200 | 680 | 367 | 278 |
| 345 | 590 | 466 | 340 |
| 23 | 42 | 62 | 73 |
| 21 | 48 | 64 | 75 |
| 29 | 40 | 68 | 78 |

३० जुलै २०२५
सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| 13 | 34 | 63 | 82 |
| 15 | 37 | 65 | 85 |
| 16 | 39 | 69 | 87 |

कल्याण, मुंबई आणि सर्व बाजारासाठी 60 पानांचा चार्ट मिळेल. 100 टक्के खात्रीशीर.
प्रो. बालाजी कुमार
9822486034


## कोणी बनले मीडिया स्टार, तर कोणी आहे एआयच्या प्रेमात!

**मुंबई, २९ जुलै :** या आठवड्यात एण्ड टीव्हीवरील मालिका 'हप्पू की उलटन पलटन' आणि 'भाबीजी घर पर है' पाहण्यासह हसून-हसून लोटपोट होण्यास सज्ज राहा, जेथे आधुनिक तंत्रज्ञान गोंधळामध्ये विलक्षण वळण आणते. एण्ड टीव्हीवरील मालिका 'हप्पू की उलटन पलटन'च्या आगामी एपिसोडबाबत कटोरी अम्मा ऊर्फ हिमानी शिवपुरी म्हणाल्या, "हप्पू सिंग (योगेश त्रिपाठी) त्याच्या आजुबाजूला असलेले सर्वजण सोशल मीडियाद्वारे पैसे कमवत आहेत हे पाहिल्यानंतर सेलिब्रिटी होण्याचे स्वप्न पाहतो, अगदी त्याचा कमी हुशार मित्र चिरको देखील ऑनलाइन सेन्सेशन बनला आहे. निराश आणि स्वतःला सिद्ध करण्यास उत्सुक असलेला हप्पू घोषित करतो की तो देखील सोशल मीडिया स्टार बनेल. पण त्याची मुले हृतिक (आर्यन प्रजापती), चमची (झारा वारसी) आणि रणबीर (सोम्या आझाद) त्याची खिल्ली उडवतात, ज्यामुळे त्याला अपमानित झाल्यासारखे वाटते आणि त्याचा प्रसिद्धी मिळवण्याचा ध्यास अधिक वाढतो. हार न मानण्याचा निर्धार केलेला, घरात निर्माण होणाऱ्या गोंधळाची जाणीव नसलेला हप्पू स्टारडमचा पाठलाग करत राहतो. दरम्यान, राजेश (गीतांजली मिश्रा) आणि अवधेशिया (उर्मिला शर्मा) एक कपटी योजना आखतात. आजारी असल्याचे नाटक करून त्या हप्पूकडून पैसे घेतात आणि त्याला फसवतात. या पैशांमधून त्या साड्या व सँडल्स खरेदी करतात. पण त्यांच्या योजनेकडे लक्ष ठेवले जात असते, जेथे कटोरी अम्मा (हिमानी शिवपुरी) त्यांच्यावर बारकाईने नजर ठेवत त्यांचे प्रत्येक कृत्य पाहते. खरे-खोटे गोंधळामध्ये अडकलेल्या हप्पूला काहीच कळत नाही, कोण खोटे बोलत आहे, कोण खरे बोलत आहे हे समजत नाही.

## राशीभविष्य

**मेष :** सत्तेत असलेल्या उच्चपदस्थ लोकांच्या जवळीकतेचा तुम्हाला फायदा होईल. शेतीत तुम्हाला कठोर परिश्रम करावे लागतील. काळजीपूर्वक विचार करून या दिशेने पुढे जा.

**वृषभ :** कोणतेही महत्त्वाचे काम पूर्ण होईपर्यंत ते कोणालाही सांगू नका. अन्यथा तुमचे काम बिघडेल. तुमच्या भावनांना सकारात्मक दिशा द्या. अचानक नफा मिळण्याची शक्यता आहे.

**मिथुन :** तुम्हाला आर्थिक नुकसान सहन करावे लागू शकते. सुरक्षा क्षेत्रात काम कार्यरत लोकांना त्यांच्या धैर्य आणि शौर्याच्या जोरावर लक्षणीय यश मिळेल. महत्त्वाच्या कामात अडथळे येतील.

**कर्क :** कामाच्या ठिकाणी चढ-उतार येतील. नोकरीत वरिष्ठ अधिकाजयांशी जवळीक वाढेल. सहकाजयांसोबत विनाकारण मतभेद होऊ शकतात. व्यवसायात अनावश्यक अडथळे येवू शकतात.

**सिंह :** आज तुम्हाला काम करण्याची इच्छा होणार नाही. तुमच्या मनात सतत काही वाईट घटनेची भीती असेल. कायदेशीर सल्लामसलत करून न्यायालयीन प्रकरणे हाताळा. वाहन हळू चालवा.

**कन्या :** आज, मोठ्या व्यवसाय योजनेत भागीदारी करण्याची योजना यशस्वी होईल. यामुळे तुमच्या व्यवसायाची परिस्थिती सुधारेल. तुमच्या भावनांना सकारात्मक दिशा द्या.

**तूळ :** राजकीय क्षेत्रात, तुमच्या प्रभावी भाषण शैलीची सर्वत्र चर्चा होईल. तुमच्या मुलांकडून तुम्हाला काही खूप चांगली बातमी मिळेल. तुमच्या नोकरीत तुमच्या वरिष्ठ अधिकाजयांशी जवळीक वाढेल.

**वृश्चिक :** आज कामाच्या ठिकाणी तुमच्या सहकाजयाशी भांडण होऊ शकते. तुमच्या बोलण्यावर आणि रागावर नियंत्रण ठेवा. अन्यथा जुने संबंध बिघडू शकतात.


**धनु :** आज तुम्हाला उपासनेत विशेष रस असेल. कामाच्या ठिकाणी तुम्ही कर्म ही पूजा है या तत्वावर काम कराल. कामाच्या दरम्यान आध्यात्मिक चर्चा टाळा. जीवनाशी संबंधित गोष्टी गुप्त ठेवा.

**मकर :** आज, नवीन व्यवसाय किंवा उद्योग सुरू करण्याची योजना मित्राच्या मदतीने यशस्वी होईल. लहान व्यवसायात गुंतलेल्या लोकांना विशेष यश मिळू शकते. व्यवसाय वाढवण्याची योजना आखू शकता.

**कुंभ :** आजचा दिवस तुमच्यासाठी आनंददायी, फायदेशीर आणि प्रगतीशील असेल. सामाजिक प्रतिष्ठेबद्दल अधिक जागरूक रहा. कोणत्याही प्रकारचे वाद टाळा. स्वतःवर ठाम विश्वास ठेवा.

**मीन :** आज तुम्हाला तुमच्या कामाच्या ठिकाणी नवीन मित्र मिळतील. तुमच्या अधीनस्थ आणि वरिष्ठांशी चांगले समन्वय राखण्याचा प्रयत्न करा. अनावश्यक वाद टाळा.

## शब्दकोडे क्रमांक २१७८



**आडवे शब्द :-**
१) संकोच धरणारा, लाजाळू
३) दम्याचा विकार असलेला
५) पदवी, उच्च दर्जा
९) डुक्कर
१०) पडणे
११) खोडण्याचे साधन
१३) मालक
१४) नजरेचा तीर, कटाक्ष
१६) समीक्षक
१९) कुबेराचा सेवक
२१) वेळ, मृत्यू
२३) ओटा, पार
२४) अहंकार, अभिमान
२५) वांतीपूर्वीची स्थिती
२७) यमराज्य
२८) रजनी
२९) नावाडी
३०) साठ मीनिटांचा काळ
३२) शुभ कल्याण
३५) आल्याची वडी
३७) मुलीचा नवरा
३९) तोटी
४०) एक त्वचारोग
४१) कापणे (इं)
४३) आईची बहीण
४४) यात्रेस जाणे
४५) विरोध अडथळा
४७) चांदणी
४९) गव्हाचे पीठ
५०) ** बत्ता
५२) धमनी
५४) घागरा
५५) कागद चिटकविण्याचा घरगुती पदार्थ
५६) द्वेष
५८) कल्पना, निष्ठा
५९) जाणकार
६१) टिंगलटवाळी
६३) श्रेष्ठ पुरुष
६५) खोदकाम
६६) हात
६८) खिडकी
६९) पशू
७०) अंकुर
७१) वायू, पाहिजे
७२) पिता
७३) गालफडे आत गेलेला
७४) मीठ

**उभे शब्द :-**
१) किरात, एक आदिवासी जमात
२) स्तुत्य
३) जाळणे
४) यमतुल्य, अतिशय दुष्ट (माणूस)
५) अभिप्राय
६) जंगली
७) फणसाची एक जात
८) पराजय
१०) परंतु, अट
१२) भरभराट
१५) शिशु, बालक
१७) आजच्या आधीचा दिवस
१८) टाळाटाळ चुकवाचुकव
२०) माफी असावी
२२) द्वार
२६) महालावरचा अधिकारी
२७) बोटाच्या टोकावरील आवरण
२८) ढीग
२९) श्वसनेंद्रिय
३०) मोठी बहीण
३१) छोटी घागर
३३) हत्ती
३४) अर्धे अंग लुळे पडणे
३६) बसण्याची फळी
३८) पहिला ऋतू
३९) वर-वधू
४२) लोणच्यातील द्रवमसाला
४३) जननी
४४) हिस्सा
४५) नांगर
४६) गोष्टी सांगणे
४८) राजवाडा
४९) नाविकदल
५०) बारीक खड्डा
५१) अथवा, किंवा
५३) मज्जाव, बंदी
५५) धोकादायक
५७) जुगार
५८) सूर्याचे एक नाव
६०) शुष्कता, आग, भकभक
६२) थडगे
६३) पर्वत
६४) छाती
६७) सुगंध
६९) लोक
७१) शंकर

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# देवेंद्र फडणवीस आतापर्यंतचे सर्वात कमकुवत गृहमंत्री

## हर्षवर्धन सपकाळ यांची टीका

■अकोला,दि २९ (प्रतिनिधी) :

खामगाव येथील रोहण पैठणकर यांच्यावर त्यांच्या जाती-धर्माची चौकशी करून करण्यात आलेल्या भ्याड हल्ल्याने राज्यातील कायदा-सुव्यवस्थेचा चेहरामोहरा उघड केला आहे. या गंभीर घटनेनंतर आरोपींवर कठोर कारवाई होणे अत्यावश्यक आहे, तसेच आजवरच्या सर्व गृहमंत्र्यांमध्ये देवेंद्र फडणवीस हे सर्वात लाचार आणि कमकुवत गृहमंत्री ठरले आहेत, अशी तीव्र टीका महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली. मंगळवारी सकाळी त्यांनी अकोला येथे उपचार घेत असलेल्या रोहन पैठणकर यांच्या तब्येतीची विचारपूस केली.

मागील आठवड्यात खामगावमध्ये रोहन पैठणकर या युवकाला अमानुषपणे मारहाण करण्यात आली. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर प्रचंड वेगाने व्हायरल झाला असून, त्यामुळे राज्यातील कायदा-सुव्यवस्थेची स्थिती किती गंभीर आहे, याचे प्रत्यंतर येते. हल्लेखोरांनी पीडिताची जात आणि धर्म विचारून त्याला 'गाय चोर' म्हणत अमानुषपणे मारहाण केली आणि त्याला निर्वस्त्र करण्याचा प्रयत्न केला. संपूर्ण व्हिडीओ सोशल मीडियावर पसरविण्यात आला असून, त्यामुळे संपूर्ण राज्यभरात संतापाची लाट उसळली आहे.

यावेळी हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, राज्यात आता कायदा-सुव्यवस्थेचे काहीच उरलेले नाही. मॉब लिंचिंगच्या घटना आता सामान्य झाल्या आहेत. रोहन पैठणकर यांच्यावर झालेला हल्ला देखील मॉब लिंचिंगचाच एक प्रकार असून, समाजात जातीय तणाव पसरवणारी ही अतिशय धोकादायक घटना आहे. मागील काही काळात महायुती सरकार अशा घटनांना प्रोत्साहन देत असून, गुन्हेगारीला खतपाणी घालत आहे, असा आरोप त्यांनी केला.

सपकाळ यांनी सांगितले की, रोहण पैठणकर यांच्यावर अकोला येथील सुपर स्पेशालिटी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मात्र अद्याप बुलढाणा जिल्हा प्रशासनाकडून कोणताही अधिकारी न भेटीस आला, ना त्यांनी निवेदन घेतले, ना कुटुंबियांची संवेदना जाणून घेतली. ही गोष्ट सरकारच्या असंवेदनशीलतेचे प्रतीक आहे.

यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे महासचिव प्रकाश तायडे, आमदार साजिद खान पठाण, महानगराध्यक्ष डॉ. प्रशांत वानखेडे, अशोक अमानकर, बबनराव चौधरी, महेंद्र गवई, धनंजय देशमुख, राम विजय पुरुंगळे, तेजेंद्र चौहान, डॉ. जिशान हुसैन, कपिल रावदेव, कपिल ढोके, प्रमोद अवसरमोल, मोहम्मद इरफान, मोइन खान, मेहबूब खान, अफरोज लोधी, पराग कांबळे, मनीष हिवराळे, राजेश मटे, आलमगीर खान, सय्यद जहागिरदार, एजाज खान, जमीर बर्तनवाले, मोहम्मद नौशाद, हेमंत देशमुख, महेश गणगणे, अभिलाष तायडे, अज़हर इकबाल, फिरोज गवळी, सुनील वानखेडे, गणेश कळसकर, विनोद मराठे, गौतम गवई, संदेश वानखेडे, प्रमोद गवई, प्रशांत प्रधान, आशिष सोनोने यांच्यासह काँग्रेसचे अनेक पदाधिकारी, नेते आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शहरात नागपंचमी उत्साहात साजरी



**अकोला :** भारतीय संस्कृतीत सापाला पूजनीय स्थान आहे श्रावण महिन्यात येणाऱ्या नागपंचमीला सर्वत्र सापांचे पूजन करण्याची मोठी परंपरा आहे साप शेतकऱ्यांचा मित्र मानला जातो पिकाचे नुकसान करणाऱ्या उंदीर आणि घुशींचा साप शिकार करतो, भय आणि अंधविश्वासामुळे मनुष्य सापांना आपला शत्रू समजतात त्यामुळे अनेक जण गैरविषारी सापांना सुद्धा मारतात यामुळे निसर्गाचे मोठे नुकसान होत आहे परंतु आता सापां बाबत मोठ्या प्रमाणात जनजागृती होत असल्याने सापांचे रक्षण होत आहे शहरातील सर्वच नाग मंदिरात तसेच ज्या ठिकाणी सापांचे वारूळ आहे .

# किराणा दुकानात चोरी, दोन मोटारसायकली लंपास

■पातूर,दि २९ (प्रतिनिधी) :

चान्नी पोलीस स्टेशन अंतर्गत सस्ती येथे अज्ञात चोरट्यांनी रात्रभर धुमाकूळ घातल्याची घटना २८ जुलै रोजीच्या सकाळी उघडकीस आल्याने गावासह परिसरात खळबळ उडाली. रविवारी मध्यरात्री सस्ती येथे अरविंद शेळके यांच्या किराणा दुकानातून काजू, बदाम इतर किराणा सामान व रोख तसेच अमर खडके, रोहित इंगळे या दोघांच्या दोन मोटरसायकली लंपास केल्या तसेच सदाशिव शेळके, काशिनाथ नवले, यांच्या घरात अज्ञात चोरट्यांनी प्रवेश केला, मात्र चोरीचा प्रयन्न अयशस्वी ठरला, चोरट्यांनी रात्रभर धुमाकूळ केल्याने गावात दहशतीचे वातावरण पसरले आहे.

रविवारी मध्यरात्री तीन वाजताच्या सुमारास अज्ञात चोरटे चार मोटरसायकलीवर जात असताना सीसीटीव्ही कॅमेरे मध्ये कैद झाले. याप्रकरणी चान्नी पोलीस स्टेशनचे ठाणेदार रवींद्र लांडे यांनी आपल्या ताफ्यासह घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला आणि अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, तपासाची प्रक्रिया सुरू केली आहे.

# हिवरखेडमध्ये नागपंचमी पाटलीची मिरवणूक



■हिवरखेड,दि २९ (प्रतिनिधी) :

येथे सनातन धर्माला अनुसरुन भवानी मंदीर चंडिका मंदीर गणेश वाकोडे कडील नागदेवता मदींरातिल प्रत्येक पाटलीवर नागदेवतेचे पाच नागाचे कोरीव काम केलेले नागाचे पाटल्या आहेत त्यात सकाळी घरोघरी ज्वारीचे लाह्या फुटाने नारळाचा प्रसाद म्हणून नागदेवतेला प्रसन्न केल्या जाते महिला व पुरुष वर्ग नांगदेवता मंदीरात आपल्या बालगोपाला सहीत दर्शनाला जातात आजच्या दिवशी रीतिरीवाजाप्रमाने तव्यावरले अन्न सहसा कुन्याच घरी बनत नाही. सर्व घरातील मानसाठी पुरी भाजी शिरा बेसन लाडु मिस्टानाचे जेवन होते दूपारी भवानी मदीर मधील दोन नागदेवतेच्या भगत असलेले पांडुरंग गावडे व नागेश गावंडे हे नागदेवतेचे अरबडे यांचे जवळ नागोबा पाटली तसेच चंडीका मंदीर ची पाटली हभप अनत रेखाते साधूबुवा यांचे जवळ असे वाजत गाजत ढोल ताशे बॅड पथकासह गावातुन मिरवनूकीने निघून मंदीरात वापस जातात तिथे रात्रीला ताब्यांचे गूंड ,कोपर व पंचधातुचे कडे च्या तालावर ठावा म्हनून नागदेवतेची भंजने गायली जातातत पाच दिवस चालनारे नागपंचमीला अरबडेच्या भजंनाने भजनाच्या बाया गायील्या जातात

# 'आपदा मित्र' योजनेअंतर्गत ल.रा.तो. च्या एन.सी.सी. कॅडेट्सनी घेतले आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण

■अकोला,दि २९ (प्रतिनिधी) :

राज्य आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या 'आपदा मित्र' योजनेअंतर्गत अकोल्यातील श्रीमती लक्ष्मीबाई राधाकिसन तोष्णीवाल वाणिज्य महाविद्यालयातील एन.सी.सी. कॅडेट्सनी आपत्ती व्यवस्थापनाचे सखोल प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केले. हे प्रशिक्षण डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या कृषक भवन येथे पार पडले. अनुभवी प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली कॅडेट्स ला पूर, भूकंप, वादळ, आगीच्या घटना अशा आपत्कालीन परिस्थितीत मदत कार्य कसे करावे याचे तांत्रिक व व्यावहारिक प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षणादरम्यान एन.डी.आर.एफ. च्या तज्ज्ञांनी महापूर, बोटिंग, बचावकार्य आणि प्रथमोपचार यावर



प्रात्यक्षिकांसह सविस्तर माहिती दिली. सहभागी कॅडेट्सला आपत्कालीन प्रत्युत्तर किट आणि ५ लाख रुपयांचे विमा सुरक्षा कवच देण्यात आले. या प्रशिक्षणात ल.रा. तो. महाविद्यालयातील आदित्य ब्रम्हदेव टाले, नितीक्षा लक्ष्मीप्रसाद पांडे, तृष्णा संतोष सिंग, पल्लवी संदीप शिरसाट, जान्हवी गणेश पारसकर, तृप्ती साहेबराव कोरडे, ऐश्वर्या प्रकाश खंडागळे व दिव्या संदीप बावस्कर यांनी सहभाग घेतला. कॅडेट्सच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. जी. जी. गोंडाणे, आय. क्यू.ए.सी. समन्वयक डॉ. योगेश अग्रवाल, व्यवस्थापन अभ्यासक्रम समन्वयक डॉ. वर्षा सुखदेवे व एन.सी.सी. अधिकारी कॅप्टन डॉ. अनिल तिरकर यांनी सत्कार केला.

## निधन वार्ता

### रमेश पुंडकर



**अकोला :** स्थानिक सुधीर कॉलनी अकोला येथील रहिवासी तथा चार्टर्ड अकाउंटंट निलेश पुंडकर यांचे वडील रमेश सुखदेवराव पुंडकर यांचे नुकतेच निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ७५ वर्षाचे होते. खेडकर नगर अकोला येथील श्रीकृष्ण मंदिर ट्रस्ट व शहरातील प्रख्यात बारा ज्योतिर्लिंग मंदिर आरती मंडळाचे ते सदस्य होते. त्यांचे मूळ गाव अकोट तालुक्यातील पुंडा येथे त्यांचे वर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचे मागे पत्नी, ३ मुले, सुना, नातवंडे व बराच मोठा आप्त परिवार आहे.

# अ.भा.माळी महासंघ तेल्हाराकडून प्राविण्य प्राप्त गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा संपन्न



■तेल्हारा,दि २९ (प्रतिनिधी) :

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी भागवत मंगल कार्यालय तेल्हारा येथे तालुक्यातील माळी समाजातील इयत्ता दहावी व बारावीतील प्राविण्य प्राप्त व इतरही क्षेत्रात विशेष नैपुण्य प्राप्त विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा थाटात संपन्न झाला.यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांना मान्यवरांकडून सावित्रीबाई फुले,ज्योतिबा फुले व संत सावता महाराज यांची प्रतिमा व पुष्पगुच्छ भेट म्हणून देण्यात येऊन त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून अ.भा.माळी महासंघाचे राष्ट्रीय सरचिटणीस सुभाष सातव,स्वागताध्यक्ष म्हणून जि.प.अकोलाच्या मा.अध्यक्षा संगीताताई नंदकिशोर अढाऊ तर प्रमुख पाहुणे म्हणून बळीराम शिरस्कार मा.आमदार बाळापूर, प्रवीण लोखंडे जिल्हा उपनिबंधक अधिकारी अकोला, प्रमोद उलेमाले साहेब ठाणेदार तेल्हारा, प्रकाश तायडे महासचिव राष्ट्रीय काँग्रेस कमिटी, संतोष हुसे ओबीसी नेते, शंकरराव गिरे समाजभूषण, उमेश मसने कार्याध्यक्ष समता परिषद, अनिल गिरे शेगाव मेळावा कार्याध्यक्ष,गणेश काळपांडे प्रदेशाध्यक्ष, प्रकाश दाते जिल्हाध्यक्ष उपस्थित होते.

## स्वातंत्र्यदिनाचा सोहळा जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात

**अकोला :** स्वातंत्र्यदिनाच्या ध्वजारोहणाचा मुख्य सोहळा जिल्हाधिकारी कार्यालयाच्या १५ ऑगस्ट रोजी सकाळी ९.०५ वा. आयोजिण्यात आला आहे. सोहळ्याच्या अनुषंगाने आवश्यक तयारी व कार्यवाही सर्व विभागांनी समन्वयाने करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी आज येथे दिले. जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेत स्वातंत्र्यदिन पूर्वतयारीची बैठक झाली, त्यावेळी ते बोलत होते. निवासी उपजिल्हाधिकारी विजय पाटील व सर्व यंत्रणांचे अधिकारी उपस्थित होते.सोहळ्याच्या अनुषंगाने इमारत स्वच्छता, सजावट, रोषणाई, पारितोषिक वितरण, कायदा व सुव्यवस्था आदी विविध बाबींविषयी बैठकीत चर्चा करण्यात आली.

# अकोला गार्डन कल्ब तर्फे शेवंती लागवडी संदर्भात कार्यशाळा संपन्न



■अकोला,दि २९ (प्रतिनिधी) :

पर्यावरणाचा व आरोग्याचा समतोल साधणे व सर्वसामान्यांमध्ये झाडाफुलांची आवड निर्माण करणे याविषयी जनजागृती करण्याच्या उद्देशाने अकोला गार्डन क्लब तर्फे शहरात दरवर्षी विविध ठिकाणी वृक्षारोपण, वृक्षसंवर्धनाची मोहीम राबविली जाते. तसेच सर्वांना उपयुक्त अशा कार्यशाळेचे सुद्धा आयोजन केले जाते. अशीच एक कार्यशाळा नुकतीच शेवंती लागवडी संदर्भात संपन्न झाली. सदरहु कार्यशाळेमध्ये मध्ये शेवंती, व गुलाब लागवड, निगा, जोपासना, परसबाग निर्मिती, कमळ लागवड व जोपासना, अँडेनियम, बोन्साय, कँक्टस निर्मिती व जोपासना, औषधी वनस्पतींची लागवड व जोपासना, हे महत्वाचे विषय समाविष्ट असतात .

सबंधित कार्यशाळेचे विषयतज्ञ उपरोक्त विषयांवर प्रात्यक्षिकांसह उपस्थितांना सविस्तर योग्य व संयुक्तिक मार्गदर्शन करतात. अकोला शहर व नजिकच्या परिसरातील नागरिकांकरिता नुकतीच विषयतज्ञ श्रीकांत कोंडोलीकर यांच्यामार्फत शेवंती लागवड निगा व जोपासना या विषयावरील कार्यशाळा संपन्न झाली.

CHANGE IN NAME

I Have Change My Name in my son Passport No is K3567866
----From-----
KAVITA RAMCHANDRA PARWANI
------TO-------
KAVITA RAMKUMAR PARWANI
My Residential Address is - Near Gurunanak Mandir Sindhi Camp Akot Akola 444101.

# तेल्हारा ते तळेगांव वडनेर बस सुरू

## प्रहारचे संदीप ताथोड यांच्या निवेदनाची दखल

■तेल्हारा,दि २९ (प्रतिनिधी) :

तेल्हारा आगाराचे बसेस वाडी मार्गे तळेगांव पातुर्डा या गावा पर्यंत येत होत्या आणि तळेगांव (पा)या गावा पासुन परत तेल्हारा जात असत पण तळेगांव पातुर्डा या गावापासुन फक्त २ कि मी अंतरावर तळेगांव वडनेर हे गांव असुन हया गावा पर्यंत बस जात नव्हती विद्यार्थी यांना शाळेत जाणे करिता अडचण होत होती या करिता प्रहार अपंग संघटना अकोला जिल्हा कार्याध्यक्ष संदीप ताथोड यांनी १४ जुलै रोजी आगार प्रमुख श्री शर्मा सरांची भेट घेवुन निवेदन दिले आगार प्रमुख यांनी वरिष्ठ



अधिकारी यांचे मंजुरी घेत आज २९ जुलै रोजी तळेगांव वडनेर या गावाकरिता बस सेवा सुरू करून दिली,तळेगांव वडनेर येथील विद्यार्थी यांना शिक्षणाकरिता तसेच नागरिक यांना तालुका चे ठिकाणी जाणे करिता अडचण होत होती, ती आता दुर झाली असुन या बदल तळेगांव वडनेर येथील विद्यार्थी नागरिक यांचे मध्ये आनंदाचे वातावरण आहे.

# लोकस्वातंत्र्य म्हणजे खऱ्या कर्तृत्वाने राज्याबाहेर जाऊन पोहचलेला पत्रकार महासंघ : पुष्पराज गावंडे

■अकोला,दि २९ (प्रतिनिधी) :

पत्रकार आणि सामाजिक कल्याणाचा एकच ध्यास घेऊन संघर्षक चळवळीतील खऱ्या कर्तृत्वाने महाराष्ट्रभर संघटन आणि पाच राज्यामध्ये पोहचलेली लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघ ही समाजाभिमुख राष्ट्रीय संघटना आहे.पत्रकार आणि साहित्यिक ह्या एक नाण्याच्या दोन बाजू आहेत. त्यानुसार प्रत्येक राष्ट्रीय पदाधिकाऱ्याला मासिक कार्यक्रमाचे अध्यक्षपद देण्याच्या संघटना अध्यक्षांच्या सन्मानजनक समतावादी निर्णयानुसार एका साहित्यिकाला पत्रकार महासंघाचं अध्यक्षपद देण्यात आलं.असे प्रतिपादन महाराष्ट्र शासनाच्या साहित्य व संस्कृती मंडळाचे माजी सदस्य व याच पत्रकार महासंघाचे राष्ट्रीय पदाधिकारी कादंबरीकार पुष्पराज गावंडे यांनी व्यक्त केले. संघटनेचा ४७ वा मासिक विचारमंथन मेळावा गावंडे यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाला.त्यावेळी ते बोलत होते.पत्रकार महासंघासोबत गेल्या १० वर्षापासून



गरीबांसाठी मोतीबिंदू शस्त्रक्रिया मोहिम राबवणाऱ्या दमाणी नेत्र रूग्णालयाचे संचालक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी सभापती शुक्ल हे पुरस्कारार्थी व प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.खामगावचे ज्येष्ठ पत्रकार,युवा दर्शन संपादक जगदिश अग्रवाल तथा डॉ.मनिष हर्षे यांचा सुध्दा प्रमुख अतिथींमध्ये समावेश होता.

## थोडक्यात

### धागा शौर्य का राखी अभियान कुरणखेड येथील राखी जाणआर सीमेवर

**कुरणखेड :** रक्षाबंधन निमित्त धागा शौर्य का राखी अभियान कुरणखेड येथे स्थानिक आमदार आणि पोलीस अधीक्षकांसह अभिनव अनेकांच्या उपस्थितीत उपक्रमाला अनेक नागरिक उपस्थित राहणार आहेत. सीमेवर भारतमातेची अहोरात्र सेवा करणारे भारतीय सैनिकांप्रती आपुलकी, आदरभाव प्रत्येकाच्या मनात निर्माण व्हावा, या हेतूने कुरणखेड येथे वीर भगतसिंग आपत्कालीन शोध व बचाव पथकातर्फे दरवर्षी 'धागा शौर्य का' राखी अभियान राबविले जाते. या कार्यक्रमाचे आयोजन १ ऑगस्ट रोजी गजानन महाराज विद्यालय कुरणखेड येथे दुपारी १२ वाजता आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमातून गावातील विद्यार्थी यांच्या माध्यमातून गोळा महिला, शाळेमधील केलेल्या राखी पोस्टामार्फत सीमेवरील सैनिकांपर्यंत पोहोचणार आहे. तेथे रक्षाबंधनच्या दिवशी रक्षाबंधन उत्सव संपन्न होणार आहे. या कार्यक्रमासाठी मूर्तिजापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार हरीश पिंपळे, अकोला जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, खदान पोलीस स्टेशन ठाणेदार मनोज केदारे, समाजसेविका कमलजीत कौर, युवा समाजसेवक केल्विन सुबि माजी पंचायत समिती सदस्य प्रशांत पांडे, भाजपा मूर्तिजापूर मंडळ अध्यक्ष प्रशांत ठाकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न होणार आहे. कार्यक्रमाचे आयोजन समाजसेवक तथा वीर भगतसिंग आपत्कालीन बचाव पथकाचे योगेश विजयकर यांच्या टीम च्यावतीने करण्यात आले आहे.

### यशस्वी उद्योजकांचा केला सत्कार

**बोरगाव मंजू :** ग्रामीण विकास मंत्रालय भारत सरकार आणि सेंट्रल बँक ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था अकोला यांच्या विद्यमाने ग्रामीण विभागातील बेरोजगारांना विविध विषयांवर प्रशिक्षण दिले जाते. या प्रशिक्षणाचा फायदा म्हणजे आपल्या रोजगारात वाढ करून आपल्या कौशल्याचा उपयोग व्यवसायात करून घेण्यासाठी मोलाचे ठरते. त्यापैकीच गेल्या आर्थिक वर्षातील काही निवडक प्रशिक्षणार्थी जे आज विविध क्षेत्रात आपला व्यवसाय सुरू करून आज यशस्वी उद्योजक म्हणून कार्य करीत आहेत, असे आशिष इंगळे, आशा जांभे, उमा खैरे यांचा सत्कार यशस्वी उद्योजक म्हणून करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख उद्योजक गणेश काळे यांची उपस्थिती होती.

# अकोला संस्कार भारतीचा संस्कार मित्र व कलावंत मेळावा संपन्न

■अकोला,दि २९ (प्रतिनिधी) :

अकोला महानगर संस्कार भारती च्या वतीने स्थानिक आर एल टी महाविद्यालयाच्या सभागृहात अकोला जिल्ह्यातील संस्कार मित्र व कलावंत मेळावा उत्साहात साजरा झाला. रविवारी संपन्न झालेल्या या कार्यक्रमात नागपूरचे संस्कार भारतीचे विदर्भ प्रांत अध्यक्ष वीरेन चांडक,कार्यक्रमाचे उद्घाटक विदर्भ प्रांत उपाध्यक्ष अमर कुलकर्णी, प्रमुख वक्ते विदर्भ प्रांत कार्याध्यक्ष सुधाकर अंबुसकर,अकोला जिल्हा अध्यक्षा सौ चंदा जयस्वाल, अकोला महानगर अध्यक्ष डॉ राजकुमार हेडा, महानगर मंत्री महेश मोडक, प्राचार्य डॉ चंद्रवंशी विराजमान होते. कार्यक्रमाचा प्रारंभ संस्कार भारतीचे प्रांत नाट्यविभाग प्रमुख अशोक ढेरे यांच्या निवेदनाने झाला.दीप प्रज्वलन




व नटराज पूजन नंतर ,ध्येय गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली.मान्यवरांचे स्वागत शाल, श्रीफळ देऊन करण्यात आले. प्रास्ताविक प्रांत जिल्हाप्रमुख निनाद कुलकर्णी यांनी केले.आजच्या पाश्चात्य संस्कृतीच्या अनुकरणात भारतीय संस्कृतीचे हनन पाहता, संस्कृती चे जतन करणे ही आजच्या काळाची गरज आहे. संस्कार आणि संस्कृती कलेच्या माध्यमातून संपूर्ण देशात रुजवण्याचे कार्य संस्कार भारती करीत आहे असे प्रस्ताविकात कुलकर्णी म्हणाले.महानगर अध्यक्ष डॉ. हेडा यांनी आपल्या भाषणातून संस्कृती जतन करण्याची कळकळ व्यक्त केली. कार्यक्रमाचे संचालन प्रा. नाना भडके यांनी केले.कार्यक्रमात जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी भेट दिली. जिल्हा कार्याध्यक्ष प्रा. प्रकाश बोरकर यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी जिल्हा संगीत विभाग प्रमुख किसन जयस्वाल,जिल्हा कोषा प्रमुख अविनाश परळीकर,सौ आशाताई खोकले, सौ डॉ वासंती थोते,भाऊलाल देवतवाल आदि उपस्थित होते.

CHANGE IN NAME

I Have Change My Name in my son Passport No is K3567866
----From-----
RAMCHANDRA SAWALDAS PARWANI
------TO-------
RAMKUMAR SAWALDAS PARWANI
My Residential Address is - Near Gurunanak Mandir Sindhi Camp Akot Akola 444101.

RNINO-46973/1986 महासागर अकोला मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१-८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्केअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले. संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९७००२३ +स्थानिक संपादक पुरुषोत्तम बोले फोन ९८८१४८१४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

# भक्तिमार्ग

आता पाऊस स्थिरावला आहे. मैफिलीच्या सुरूवातीला वाद्यवृंदाशी जुळवून घेण्याची, रसिकांच्या आवडीचा वेध घेण्याची, आवाज लावण्याची गायकाची तयारी पूर्ण होते आणि मैफिलीवर कब्जा मिळवणारे, रसिकांच्या मनावर हुकूमत गाजवणारे गायकाचे सूर घुमू लागतात तसं काहीसं होतं आषाढात... आता मल्हाराच्या सुरांनी वातावरणातलं एक प्रकारचं भारलेपण दाटलेलं असतं. सरींना एक सुंदर लय सापडली आहे. संततधार पावसामुळे सगळीकडे नवचैतन्य पसरलं आहे. अशा या भारलेल्या वातावरणात वेध लागतात ते श्रावणातल्या उत्सवांचे. श्रावणमास म्हणजे उत्सवपर्वाची सुरूवात. याची तयारी करायलाच हवी. याची सुरूवात होते दिव्याच्या अमावस्येपासून. आषाढी अमावस्येला दिव्यांची पूजा होते आणि अंध:कार दूर लोटत प्रकाशाचं साम्राज्य सर्वदूर पसरतं.

आषाढी अमावस्या हा आनंद आणि उत्साहाने साजरा करावा असा दिवस. या दिवशी घरातील सगळे दीप घासूनपुसून स्वच्छ केले जातात. आता विजेचे दिवे वापरात असल्यामुळे अंधार पसरल्यावर उजेड मिळवण्यासाठी तेला-तुपावर तेवणारे दिवे प्रज्वलित करण्याची गरज राहिलेली नाही. आता तिन्ही सांज झाली की फक्त देवापाशी तेलाचा दिवा तेवतो, अन्यत्र नाही. पण हा बदल झाला असला तरी दिव्याच्या अमावस्येच्या निमित्ताने घरातील सगळे दिवे बाहेर काढले जातात. आपल्याकडे दिव्यांचे असंख्य प्रकार पहायला मिळतात. प्रत्येकाचा आकार वेगळा, उपयोग वेगळा. देवाला ओवाळण्यासाठी निरांजन, देवापुढे लावण्यासाठी समई, आरतीसाठी पंचारती, कोपऱ्यात लामणदिवा, घरातलं अंधाराचं साम्राज्य हटवण्यासाठी कंदील

**विजेच्या दिव्यांच्या लखलखाटातही दिव्याच्या अमावस्येचं महत्त्व कायम आहे. घरातील सर्व दिवे घासूनपुसून साफ करायचे, प्रज्वलित करायचे, त्यांना कापसाची वस्त्रं घालायची, हारफुलांनी शृंगारायचं आणि त्याच्यापासून मिळणाऱ्या तेजाने उजळून निघालेल्या मनाने उत्सवपर्वाच्या स्वागताची सिद्धता करायची असा या निमित्ताने पार पडणारा सुंदर उपचार आहे. यामुळे घराचेच नव्हे तर मनाचे अंधारलेले कोपरेही प्रकाशमान व्हायला हवे.**

अथवा बत्ते यासारखे एक ना अनेक प्रकार घरात असतात. या दिवशी हे सर्व दिवे लखलखीत करायचे, रांगोळीचा चौक घालून सजवायचे, हारफुलांनी शृंगारायचे, कापसाच्या वस्त्रांनी झाकायचे, या दीपतेजाला नैवेद्य दाखवायचा आणि वंदन करुन प्रकाशाचं दान मागायचं इतका मंगलमय हा उपचार... अनेक घरांमध्ये आजही मनोभावे दिव्यांची पूजा केली जाते.

भक्ती विशेष

या पूजेमागे तेजाची, प्रकाशाची पूजा करण्याचं औचित्य आहेच, त्याचबरोबर येणाऱ्या उत्सवपर्वाच्या स्वागताची तयारीही आहे. आता दिवाळीपर्यंत सणावारांची रेलचेल सुरू राहणार आहे. श्रावणात साजरे होणारे प्रत्येक सण, त्यानंतर येणारे गौरी-गणपती, नवरात्र, दसरा आणि दिवाळी असा मोठा कालखंड धामधूमीत सरणार असतो. या सणांनिमित्त घरात सजावट केली जाते. सजावट प्रकाशमान करण्यासाठी दिव्यांची आरास आवश्यक असते. कदाचित याचीच सिद्धता करण्यासाठी घरातील सर्व दिवे घासूनपुसून लखलखीत करण्याची ही शिस्त अंगिकारली गेली असावी.

या दिवशी अन्य काही रुढीही पाळल्या जातात. काही घरांमध्ये विस्तवावर तवा ठेवला जात नाही. या दिवशीचा खास मेन्यु म्हणजे कणकेचे अथवा बाजरीचे दिवे. बाजरीची भरड शिजवून त्याचे दिवे करायचे आणि दूध-गुळाबरोबर कुस्करुन खायचे. दुसरा एक प्रकार म्हणजे गुळाच्या पाण्यात कणीक भिजवायची आणि त्याला दिव्यांचा आकार देऊन वाफलवून घ्यायचं. गोडसर चवीचे कणकेचे हे दिवेही छान लागतात. दिव्यावर मनसोक्त तूप घेऊन खाणं हा आजही अनेकांचा आवडता प्रकार असेल. तर असा हा दिव्यांचा

## प्रकाशपर्वाच्या स्वागतासाठी...



सण... आपल्या संस्कृतीमधील सजिवांप्रमाणेच निर्जीवांचा सत्कार, सन्मान करण्याचे संस्कार या मंगल सणामध्ये दिसून येतात.

आपल्याकडे दररोज रात्री परवचा म्हणण्याची पद्धत आहे. कालानुरुप काही घरांनी या सुंदर प्रथेचा त्याग केला असला तरी आजही अनेक घरांमध्ये देवापाशी दिवा लावल्यावर शुभंकरोती म्हटली जाते. ही त्या तेजाची आराधना असते. अंधारावर विजय मिळवण्याची क्षमता देणाऱ्या प्रकाशाला केलेलं ते अभिवादन असतं. अंध:कार म्हणजे तेजरहित अवस्था... मग हे तेज बुद्धीचं असेल, ज्ञान-विज्ञानाचं असेल, धीरोदात्ततेचं असेल, कलागुणांचं असेल, निखळ आणि प्रांजळ स्वभावाचं असेल, मनातील भूतदयेचं असेल... तेजाचे असे कोपरे असलेलं व्यक्तिमत्त्व कायमच झळाळत असतं. ते स्वत: प्रकाशाचा दीपस्तंभ असतंच पण या तेजाने उजळलेल्या वाटांवर चालणाऱ्या अनेक पांथस्तांसाठीही त्याचं महत्त्व अपूर्व आणि अनमोल असतं. म्हणूनच दीप उजळणं, अंधार दूर सारणं या कृत्यातून मनातील अंधारलेले कोपरे उजळून टाकण्याचाही संकेत दिला जातो. दररोज दिव्यासमोर हात जोडून आपण हेच वरदान, हेच शहाणपण मागत असतो. दिव्याच्या अमावस्येच्या निमित्ताने पुन्हा एकदा हीच प्रार्थना केली जाते. मनात दु:ख, व्यथा, चिंतेची काजळी असताना उत्सव साजरा करणं हे केवळ उपचार ठरतील. पण हे केवळ उपचार न राहता आनंदनिधान ठरावं, व्रतवैकल्यांद्वारे मिळणारी ऊर्जा, चैतन्य थेट पाझरावं या हेतूने मनाची कवाडं उघडण्यासाठी दाखवलेली मशाल म्हणूनही आपण या साजरीकरणाकडे पाहू शकतो. आपल्या सणांमध्ये, प्रथा-परंपरांमध्ये असे अनेक संकेत दडले आहेत. गरज आहे त्याकडे सुबुद्ध नजरेने बघण्याची...

आज सगळा परिसर विजेच्या दिव्यांनी तेजाळत असला तरी समईच्या मंद प्रकाशाची महती तसुभरही कमी झालेली नाही. किंबहुना, मेडिटेशनमध्ये या मंद तेवणाऱ्या ज्योतीकडे एकटक बघण्याचा उपाय अस्थिर मनाला ताळ्यावर आणण्याचा सुकर मार्ग असल्याचं सांगितलं आहे. समईभोवतीचं तेजोवलय आपल्याला एका अवकाशाची प्राप्ती करुन देतं. या अवकाशात स्वत:च्या अस्तित्वाचं प्रयोजन आणि जागृतीचा अर्थ गवसतो. आरतीच्या ताम्हणातल्या इवल्याशा निरांजनाची धग साशंक मनातली आंदोलनं शांत करण्यास पुरेशी असते. तो कर्पुरमिश्रीत सुगंध घराच्या कानाकोपऱ्यातील नकारात्मक ऊर्जा दूर घालवून देतो. म्हणूनच वातीच्या अग्रावर डोलणाऱ्या लवलवत्या ज्योतीची महती आपल्याला जाणवते. आपणही तिला वंदन करु या आणि येऊ घातलेल्या प्रकाशपर्वाच्या स्वागतासाठी सज्ज होऊ या.

## यशस्वी होण्यासाठी...

आयुष्यात यशस्वी होण्यासाठी आपण बरेच प्रयत्न करतो. पण अहंकारावर मात करता आली तर आपण सहज यशस्वी होऊ शकतो. एका बोधकथेतून याबाबत जाणून घेऊ. स्वामी सदानंद हे स्वामी श्रद्धानंद यांचे शिष्य होते. गुरूकुलात राहून सदानंदांनी शिक्षण पूर्ण केलं. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर ते अहंकारी बनले. इतरांना कमी लेखू लागले. यामुळे मित्रपरिवार त्यांच्यापासून दूर होऊ लागला. याबाबत स्वामी श्रद्धानंदांना कळलं पण शिष्य गंमत करत असतील असं वाटून त्यांनी दुर्लक्ष केलं. पण श्रद्धानंदांनाही याचा अनुभव आला. एके दिवशी श्रद्धानंद सदानंदांच्या जवळून गेले. त्यावेळी सदानंदांनी आपल्या गुरूकडे अजिबात लक्ष दिलं नाही. त्यांना वंदनही केलं नाही. यामुळे श्रद्धानंदांना खरं काय ते कळलं. सदानंदांना अहंकाराने ग्रासलं असल्याचं त्यांच्या लक्षात आलं. सदानंदांचा अहंकार मोडायला हवा. अहंकारी वृत्तीमुळे भविष्यात त्यांचं काहीही भलं होणार नाही, हे त्यांनी जाणलं होतं. आता यासाठी नेमकं काय करायला हवं, असा विचार श्रद्धानंदांनी करायला सुरूवात केली. श्रद्धानंदांनी सदानंदाला आपल्यासोबत फिरायला येण्याबाबत विचारलं. दुसऱ्या दिवशी दोघेजण रानात फिरायला गेले. त्यावेळी समोरून एक झरा वाहत होता. श्रद्धानंदांनी सदानंदांना विचारलं, तुला समोर काय दिसत आहे? सदानंद म्हणाले, गुरूजी पाणी अतिप्रचंड वेगाने वाहत आहे. खाली पडल्यानंतर ते दुप्पट वेगाने उसळत आहे. सदानंदाचं उत्तर ऐकून श्रद्धानंदांनी त्यांना उपदेश केला. ते म्हणाले की, आयुष्यात यशस्वी होण्यासाठी थोडं झुकायला हवं. तुम्ही झुकायला शिकला की संपूर्ण जग तुमच्यापुढे झुकतं. यावरून सदानंद समजायचे ते समजले. आयुष्यात पुढे जाण्यासाठी अहंकारी वृत्ती नाही तर नम्रता कामी येते, हे त्यांना उमगलं.



भक्ती आणि बोध



## शंकराची गुहा


अमरनाथ यात्रेचं महत्त्व आपण जाणतोच पण जम्मू-काश्मीरमध्ये अजून एक गुहा आहे. या गुहेत भगवान शंकराचा वास असल्याचं मानलं जातं. ही गुहा शिवखोडी या नावाने ओळखली जाते. या गुहेत एक भुयारी मार्ग असून या मार्गातून अमरनाथाच्या गुहेकडे जाता येतं. या भुयारी मार्गातून जाणारी व्यक्ती परत येत नाही, असं म्हटलं जातं. जम्मूपासून १४० किलोमीटर अंतरावर असलेल्या उधमपूरमध्ये ही गुहा वसली आहे. अमरनाथ यात्रा करून आलेले भाविक या गुहेतल्या शिवलिंगाचं दर्शन करण्यासाठी आवर्जुन येतात. या गुहेतल्या भुयारी मार्गातून अमरनाथ गुहेपर्यंत जाता येतं. द्वापारयुगातले साधूसंत याच भुयारी मार्गातून अमरनाथ गुहेकडे जात असत. मात्र कलियुगात कोणीही असा प्रयत्न केलेला नाही. या भुयारी मार्गातून जाणारा माणूस परत येत नाही, असं मानलं जात असल्याने कोणी हे धाडस केलेलं नाही. सध्या हा भुयारी मार्ग बंद करण्यात आला आहे.

या गुहेतलं शिवलिंग स्वयंभू असल्याचं मानलं जातं. त्यामुळे या स्थानाचं महत्त्व प्रचंड वाढलं आहे. या गुहेचं वर्णन करायचं तर ती तीन मीटर उंच आणि २०० मीटर लांब आहे. यासोबतच गुहेत पार्वती, नंदी यांच्या मूर्ती आहेत. या मूर्तीही स्वयंभू असल्याचं मानलं जातं. तसंच गुहेच्या वरच्या भागावर सापाचं चित्र आहे. या गुहेची निर्मिती प्रत्यक्ष भगवान शंकराने केल्याचं मानलं जातं. याबाबत एक आख्यायिका सांगितली जाते. ती अशी की, भस्मासूर नावाच्या राक्षसाने तप करून शंकराला प्रसन्न करून घेतलं. आपण ज्याच्या डोक्यावर हात ठेऊ तो भस्म होईल, अशा स्वरूपाचा वर भस्मासूराने शंकराकडून घेतला. नंतर मात्र भस्मासूर शंकरालाच भस्म करायला निघाला. त्यावेळी शंकर आणि भस्मासूर यांच्यात घनघोर युद्ध झालं. या युद्धानंतरही भस्मासूराने हार मानली नाही. त्यानंतर शंकर उंच डोंगरावर गेला. तिथे त्याने गुहा तयार केली आणि लपून बसला. याच गुहेला शिवखोडी असं म्हटलं जातं. शंकराचं रक्षण करण्यासाठी विष्णूने सुंदर स्त्रीचं रूप धारण केलं. या रूपावर भाळलेल्या भस्मासूराला शंकराने दिलेल्या वरदानाचा विसर पडला आणि त्याने स्वत:च्याच डोक्यावर हात ठेवला. यामुळे तो नष्ट झाला.

तीर्थक्षेत्र

## लक्षणं उत्तम गुणांची...

मनुष्याने उत्तम गुण आत्मसात करायला हवेत. या गुणांमुळे भौतिक आणि आध्यात्मिक उन्नती होत असते. समर्थ रामदास स्वामींनी दासबोधात या उत्तम गुणांचं वर्णन केलं आहे. दुसऱ्या दशकातल्या दुसऱ्या समासात ते उत्तम गुणांची लक्षणं सांगतात. ते म्हणतात,




श्रोतां व्हावे सावधान। आतां सांगतों उत्तम गुण।
जेणें करिता बाणे खूण। सर्वज्ञपणाची।।१।।
वाट पुसल्याविण जाऊं नये। फळ वोळखिल्याविण खाऊं नये। पडिली वस्तु घेऊं नये। येकायेकीं।।२।।
अति वाद करूं नये। पोटी कपट धरू नये। शोधल्याविण करूं नये। कुळहीन कांता।।३।।
विचारेविण बोलू नये। विवंचनेविण चालों नये। मर्यादेविण हालो नये। कांहीं येक।।४।।
प्रीतीविण रूसों नये। चोरास वोळखी पुसों नये। रात्री पंथ क्रमूं नये। येकायेकी।।५।।

याचा अर्थ असा की, आता मी उत्तम गुणांची लक्षणं सांगत आहे. श्रोत्यांनी ती लक्षपूर्वक आणि सावधपणे ऐकावी। ही लक्षणं ग्रहण केली तर अंगी सर्वज्ञता बाणवता येते. या लक्षणांचं वर्णन समर्थ करतात. ते सांगतात, कोणत्याही मार्गावर चालताना आधी चौकशी करूनच पुढे जायला हवं. एखादं फळ खाण्याआधी त्याची व्यवस्थित माहिती घ्यायला हवी. वाटेत पडलेली वस्तू एकाएकी उचलून घेऊ नये. फार वादविवाद करू नये, कोणाशी कपटाने वागू नये. मनात आकस धरू नये. मुलीशी विवाह करण्याआधी तिच्या कुळशीलाची व्यवस्थित चौकशी करायला हवी. नेहमी विचारपूर्वक बोलावे. पूर्वचर्चे शिवाय कोणत्याही कामाला सुरूवात करू नये. लोकांमध्ये वावरताना मर्यादेचं पालन करावं. प्रेम नसेल तिथे रूसू नये. चोराला परिचय विचारू नये. रात्री एकट्याने प्रवास करू नये. यासारखी अनेक लक्षणं समर्थांनी या समासात सांगितली आहेत.

या समासाच्या अखेरीस समर्थ म्हणतात,

सत्यमार्ग सांडू नये। असत्य पंथे जाऊ नये। कदा अभिमान घेऊ नये। असत्याचा।।४०।।
अपकिर्ती ते सांडावी। सत्कीर्ती वाढवावी। विवेकें दृढ धरावी। वाट सत्याची।।४१।।
न घेता हे उत्तम गुण। ते मनुष्य अवलक्षण। ऐक तयांचे लक्षण। पुढील समासीं।।४२।।

याचा अर्थ असा की, सत्यमार्ग कधीही सोडू नये, असत्याच्या मार्गाने कधी जाऊ नये। असत्याचा अहंकार, अभिमान बाळगू नये। अपकिर्ती कधीही होऊ देऊ नये. सत्कीर्ती वाढवण्यासाठी प्रयत्न करावा. विवेकाचा मार्ग अवलंबवावा. सत्याची कास धरावी. हे गुण न घेणारी व्यक्ती अवलक्षणी मानली जाते. अवलक्षणी माणसाचे गुण समर्थ पुढच्या समासात वर्णन करतात. त्यामुळे शक्य तितके उत्तम गुण घेऊन आयुष्यात मार्गक्रमणा करायला हवी.

दासबोधातून...

## महत्त्व शिवामुठीचं...

सर्वांना हवाहवासा वाटणारा, आनंद देणारा, व्रतवैकल्यं, सणवारांनी नटलेला, अत्यंत पवित्र असा श्रावण मास सुरू होत आहे. श्रावण महिन्याचे वेध काही दिवस आधीपासूनच लागू लागतात. या महिन्यात सगळीकडे पावित्र्य, मांगल्य, उल्हास आणि उत्साह भरून राहिलेला असतो. श्रावणाला धार्मिकदृष्ट्या अनन्यसाधारण महत्त्व आहे. श्रावण हा शंकराला प्रिय असणारा महिना. म्हणूनच श्रावणातल्या सोमवारी शंकराची आराधना केली जाते, उपवास केला जातो. शंकराला धान्य अर्पण केलं जातं. याला शिवामूठ असं म्हणतात. पहिल्या सोमवारी शंकराला तांदळाची, दुसऱ्या सोमवारी तिळाची, तिसऱ्या सोमवारी मुगाची, चवथ्या सोमवारी जवसाची तर पाचवा सोमवार असल्यास सातूची मूठ अर्पण केली जाते. यामागे धार्मिक महत्त्व आहेच शिवाय आपल्या शेतात पिकवलेलं धान्य सर्वप्रथम देवाला अर्पण करावं, अशीही भावना आहे. तसंच या पदार्थांचं आपल्या आहारातलं महत्त्व अधोरेखित करण्याचा प्रयत्नही आहेच.

मनासारखा पती मिळावा यासाठी मुली शंकराची आराधना करतात. शिवामुठीच्या या व्रताला शिवमुष्ठीव्रत असंही म्हटलं जातं. विवाहानंतर पहिली पाच वर्षं शिवामुठीचं हे व्रत करण्याची परंपरा आहे. या व्रतादरम्यान एक वेळ उपवास करायचा असतो. शिवलिंगाची मनोभावे पूजा करून त्यानंतर धान्याची ही शिवामूठ अर्पण करायची असते. या व्रताचे आध्यात्मिक लाभही आहेत. या व्रतामुळे



शिवतत्त्व आकर्षित होतं. चैतन्य आणि शक्तीचा प्रवाह व्रत करणाऱ्या महिलेकडे आकृष्ट होतो. तसंच चातुर्मासात ऋतूनुसार एकभुक्त राहण्याला महत्त्व आहे. श्रावणी सोमवारच्या निमित्ताने एक वेळचा उपवासही घडतो. त्यामुळे शिवशंकराची आराधना करून श्रावणातल्या पवित्र महिन्याचे आध्यात्मिक लाभ भाविकांनी मिळवायला हवे.

परंपरा

## सोमवारच का?



परमेश्वराची भक्ती करण्यासाठी काळ-वेळाची आवश्यकता नाही. देवाची भक्ती कोणत्याही दिवशी करता येते पण हिंदू धर्मातल्या प्रत्येक दैवताचा ठराविक वार आहे. सोमवार शंकराचा, मंगळवार गणपतीचा, हनुमानाचा शनिवार, गुरूदत्ताचा गुरूवार मानला जातो. त्या त्या दिवशी या दैवतांची आराधना केली जाते. मंदिरांमध्ये भक्तमंडळींची गर्दी झालेली असते. श्रावण महिन्यात शंकराच्या पूजनाला महत्त्व असतं. त्यामुळे शंकराची सोमवारी पूजा का केली जाते? सोमवार हा शंकराचा आवडता वार का आहे, याबाबतची माहिती जाणून घेऊ.

शंकराची आराधना सोमवारी करण्याची परंपरा प्राचीन काळापासून चालत आली आहे. शंकराची आराधना आठवड्याच्या कोणत्याही वारी करता येते. प्रत्येक वारी शंकराची आराधना केल्याचं वेगवेगळं फळ मिळतं. याबाबतचा एक श्लोक शिवपुराणात आहे. तो असा की, आरोग्यसंपद चैव व्याधीनांशांतिरेव च। पुष्टीरायुस्तथा भोगोमृतेर्हानिर्यथाक्रमम।। याचा अर्थ असा की आरोग्य, संपत्ती, रोग-नाश, पुष्टी, आयुष्य, भोग आणि मृत्यूची हानी टाळण्यासाठी रविवारपासून शनिवारपर्यंत शंकराची आराधना करायला हवी. कोणत्याही वारी केलेली शिवाची आराधना फलद्रूप होत असेल तर सोमवारचा आग्रह का धरला जातो? यामागे अनेक कारणं आहेत.

पुराणांनुसार सोम म्हणजे चंद्र. भगवान शंकराने चंद्राला मस्तकावर धारण केलं आहे. चंद्राने शंकराकडे क्षमायाचना केली. यानंतर शंकराने त्याला क्षमा केली. अनेक अवगुण असूनही शंकराने चंद्राला आपल्या मस्तकावर धारण केलं. त्याचप्रमाणे शंकर भक्तांना मस्तकावर नाही पण चरणांवर नक्कीच स्थान देईल, या आशेने सोमवारी शंकराची आराधना करायला सुरूवात झाली असावी तर सोम म्हणजे उमा आणि शिव असंही काही भक्त मानतात. त्यामुळे सोमवारी पार्वती आणि शंकर अशा दोघांची पूजा केल्याने अनेक लाभ होतात. शक्तीशिवाय शिवाचं अस्तित्त्व नाही. त्यामुळे सोमवारी शिवाची आराधना करायला प्रारंभ झाला असावा. सोम म्हणजे सौम्य. शंकर हा समाधीस्त देव आहे. त्याचा सौम्य भाव जाणून लोकांनी सोमवारी त्याच्या पूजनाची सुरूवात केली असावी. सोममध्ये ओम सामावला आहे. ओमकार हे शंकराचं प्रतिक आहे. त्यामुळे सोमवारी शिवाची आराधना करण्याची प्रथा सुरू झाली असावी, असंही मानलं जातं.

जाणून घ्या

## यात्रेला जाताना...

हिंदू धर्मियांमध्ये विविध यात्रा प्रचलित आहेत. अमरनाथ, कैलास मानसरोवर, चारधाम, कावड, बारा ज्योतिर्लिंग, अष्टविनायक यासोबत कुलदेवतेच्या दर्शनाला लोक जात असतात. नवरात्रांमध्ये देवीच्या यात्रा भरतात, कुंभमेळे असतात. या यात्रांदरम्यान घातपात, अपघात होण्याची शक्यता असते. अलिकडेच अमरनाथ यात्रेकरूंवर दहशतवादी हल्ला झाला. यात्रेकरूंची बस कोसळून अपघातही झाला. याचप्रमाणे विविध यात्रांमध्ये यात्रेकरूंना तब्बेतीच्या तक्रारी निर्माण होतात. अमरनाथ, कैलास मानसरोवर सारख्या यात्रा खूप कठिण असतात. धार्मिक यात्रा हा प्रत्येकाच्या आस्थेचा, श्रद्धेचा प्रश्न असतो. कितीही हल्ले झाले तरी यात्रेकरू यात्रा पूर्ण करतातच. चेंगराचेंगरीसारखे प्रसंग उद्भवले तरी यात्रेकरूंच्या उत्साहात कुठेही कमतरता जाणवत नाही. अर्थात आध्यात्मिक




समाधान म्हणून भाविक यात्रा करणारच. या यात्रांमध्ये तरूणांची संख्या वाढताना दिसत आहे. काही तरूण मंडळी थ्रील म्हणून अशा यात्रा करतात. धार्मिक यात्रा कितीही पुण्यदायी मानल्या जात असल्या त्या करताना विशेष काळजी घ्यायला हवी. नियमांचं पालन करायला हवं. त्याविषयी...

✲ अमरनाथ यात्रेकरूंच्या बसवर दहशतवाद्यांनी हल्ला केला. या हल्ल्यात आठ भाविकांचा मृत्यू झाला. तर काही भाविक जखमी झाले. चालकाच्या प्रसंगावधानामुळे लोकांचा जीव वाचला. पण नियमांचं पालन न केल्यामुळे भाविकांवर हा प्रसंग उद्भवला. ही बस सुरक्षा ताफ्यापासून वेगळी झाली होती. तसंच तिची सुरक्षा यंत्रणेकडे अधिकृत नोंदणीही करण्यात आली नव्हती. सुरक्षा ताफ्यापासून वेगळ्या झालेल्या या बसवर हल्ला करण्याचा डाव अतिरेक्यांनी साधला. त्यामुळे अशा यात्रांमध्ये जाण्याआधी आपली बस नोंदणीकृत आहे की नाही, याची खात्री करून घ्यायला हवी.

✲ अमरनाथ, कैलाश मानसरोवर सारख्या यात्रा अत्यंत कठिण असतात. या यात्रा करताना आरोग्य तपासणी करून घेणं गरजेचं असतं. अनेकजण त्या टाळतात. यामुळे आरोग्यविषयक समस्या निर्माण होण्याची शक्यता असते.

✲ बऱ्याच यात्रांदरम्यान चेंगराचेंगरी होते. रांग मोडल्याने किंवा दर्शनासाठी गर्दी केल्याने असं होऊ शकतं. प्रशासन वेळावेळी नियमांबाबत सांगत असतं पण भाविक त्याकडे दुर्लक्ष करतात, रांगा मोडतात. यामुळे असे प्रसंग उद्भवतात. यासोबतच अफवांवर विश्वास ठेवल्याने असं होऊ शकतं.

✲ कुंभमेळ्याला किंवा तीर्थक्षेत्री गेल्यानंतर नदीच्या पाण्यात आंघोळ केली जाते. पाण्यात उतरताना खबरदारी घेण्याबाबत प्रशासन वारंवार सांगत असतं पण भाविकांना नदीत स्नान करून पुण्य मिळवायचं असतं. या नादात सगळे नियम पायदळी तुडवले जातात आणि अपघातांना निमंत्रण मिळतं. त्यामुळे यात्रांना जाताना तिथल्या परिस्थितीची, वातावरणाची माहिती करून घ्यावी. यात्रेच्या नियमांचं पालन करावं. यामुळे यात्रा निर्विघ्न पार पडू शकेल.

भक्तीयात्रा





# सेन्सेक्समध्ये 447 अंकांची वाढ

## निफ्टीने 24,800ची पातळी पुन्हा गाठली

मुंबई, दि. २९ प्रतिनिधी

भारतीय शेअर बाजाराने मंगळवारी सलग तीन सत्रांच्या घसरणीनंतर तेजी दाखवली. रिलायन्स इंडस्ट्रीज आणि एचडीएफसी बँकसारख्या ब्लू-चिप शेअर्समध्ये झालेल्या खरेदीमुळे गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास वाढला आणि परदेशी गुंतवणूकदारांच्या सततच्या निधी बाहेर जाण्याबाबत व अमेरिका-भारत व्यापार करारातील विलंबाबाबत असलेली चिंता काही प्रमाणात कमी झाली.

बीएसई सेन्सेक्स ४४६.९३ अंशांनी, म्हणजे ०.५५ टक्क्यांनी वाढून ८१,३३७.९५ वर बंद झाला. तर एनएसई निफ्टी १४०.२० अंशांनी, म्हणजे ०.५७ टक्क्यांनी वाढून २४,८२१.१० वर बंद झाला.

बीएसईवरील सर्व सूचीबद्ध कंपन्यांचे एकत्रित बाजार भांडवल २.८४ लाख कोटींनी वाढून ४५१.५९ लाख कोटींवर पोहोचले.

रिलायन्स इंडस्ट्रीज, लार्सन अँड टुब्रो, एशियन पेंट्स, अदानी पोर्ट्स आणि टाटा मोटर्स या सेन्सेक्समधील ३० प्रमुख शेअर्सपैकी प्रमुख कंपन्यांनी बाजारात उभारी दिली. या शेअर्समध्ये प्रत्येकी १.५ टक्के ते २.२ टक्क्यांपर्यंत वाढ झाली.

सत्राच्या सुरुवातीस ०.५ टक्क्यांनी घसरलेला फायनान्शियल्स निर्देशांक अखेर ०.३ टक्क्यांनी वाढत बंद झाला, तर एचडीएफसी बँकेचा शेअर ०.७ टक्क्यांनी वाढला.

रिलायन्स इंडस्ट्रीज, जो निर्देशांकातील सर्वात मौल्यवान शेअर आहे, त्यात २.१ टक्क्यांची वाढ झाली. स्मॉलकॅप बाजार देखील या तेजीमध्ये सहभागी झाले. मिड-कॅप आणि स्मॉल-कॅप निर्देशांक अनुक्रमे ०.८ टक्के आणि १ टक्क्यांनी वधारले.

**सेन्सेक्स 81,337**

**निफ्टी 24,821**

लार्सन अँड टुब्रोचा शेअर, पहिल्या तिमाहीच्या निकालांपूर्वी, २.१ टक्क्यांनी वाढला. एशियन पेंट्सचा शेअर १.८ टक्क्यांनी उसळला कारण कंपनीचे निकाल विश्लेषकांच्या अपेक्षांपेक्षा चांगले आले.

गेले तीन सत्रे सेन्सेक्स आणि निफ्टी सुमारे २ टक्क्यांनी घसरले होते. यामागे अपेक्षेपेक्षा कमी तिमाही निकाल, परदेशी निधीचा सतत ओघबंद आणि भारत-अमेरिका दरम्यानच्या व्यापार करारावरील आशावाद कमी होणे, ही मुख्य कारणे होती.

भारत आणि अमेरिकेतील व्यापार कराराविषयीची चर्चा अद्यापही स्थगित आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी सोमवारी इशारा दिला की जे देश अमेरिका सोबत वैयक्तिक व्यापार करार करण्यात अपयशी ठरतील त्यांच्यावर १५ टक्के ते २० टक्क्यांपर्यंत आयात शुल्क लावले जाऊ शकते, जे एप्रिलमध्ये लागू केलेल्या १० टक्क्यांच्या शुल्कांपेक्षा खूप अधिक असेल.

# ऑपरेशन सिंदूर हा केवळ सरकारचा तमाशा होता- प्रणिती शिंदे

नवी दिल्ली, दि. २९ वृत्तसंस्था

पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी केलेला हल्ला आणि त्यानंतर भारतीय सैन्यदलाने राबवलेल्या 'ऑपरेशन सिंदूर' या मोहिमेबाबत लोकसभेमध्ये प्रदीर्घ चर्चा चालू आहे. या चर्चेदरम्यान, विरोधकांनी अनेक प्रश्न उपस्थित करून सरकारला धारेवर धरलं. दरम्यान, काँग्रेस खासदार प्रणिती शिंदे यांनी केलेल्या एका वक्तव्यामुळे त्यांच्यावर टीका होऊ आहे. प्रणिती शिंदे सभागृहात म्हणाल्या की "ऑपरेशन सिंदूर हे नाव जरी देशभक्तीचं वाटत असलं तरी हा केवळ सरकारचा प्रसारमाध्यमांवरील तमाशा होता. या मोहिमेतून सरकारने काय सिद्ध केलं ते अद्याप कोणालाही समजलेलं नाही."

खासदार प्रणिती शिंदे म्हणाल्या, "ऑपरेशन सिंदूर हे नाव ऐकताना असं वाटतं की यात देशभक्ती आहे. मात्र, हा प्रसारमाध्यमांवर दाखवला गेलेला सरकारचा एक तमाशा होता. कारण या मोहिमेद्वारे आपण काय साध्य केलं, किती दहशतवाद्यांना पकडलं, शत्रूने आपली किती विमानं पाडली या हल्ल्याला कोण जबाबदारी होतं, यात कोणाची चूक होती, दहशतवादी कुठून आले, आपल्या नागरिकांना ठार मारून दहशतवादी कुठे पळून गेले, यापैकी सरकारला काहीच माहिती नाही. सरकारकडे कुठल्याही प्रश्नाचं उत्तर नाही."

काँग्रेसच्या खासदार म्हणाल्या, "सरकारकडे ऑपरेशन



सिंदूरबाबत कुठल्याही प्रश्नाचं उत्तर नाही आणि यांना शेजारी असलेल्या देशावर आक्रमण करायचंय, त्या नावाखाली निवडणुकीत लोकांची मतं घ्यायची आहेत. कोणी मेलं तरी यांना काहीच फरक पडत नही. कारण आपले पंतप्रधान आणि सरकार २४/७ (दिवसाचे २४ तास, आठवड्याचे सातही दिवस) निवडणुकांच्या मोडमध्ये असतात. आपल्या देशाची प्रतिमा याआधी इतकी कमकुवत कधीच झाली नव्हती. मात्र, या लोकांमुळे तसं घडलंय. कारण यांना प्रत्येक गोष्टीचा इव्हेंट करायचा आहे. माझी मोदींना विनंती आहे की प्रत्येक गोष्टीचा इव्हेंट करणं थांबवा. माझी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना विनंती आहे की त्यांनी त्यांची 'मन की बात' थांबवून 'जन की बात' करावी, जनतेच्या प्रश्नांची उत्तरं देण्याची हिंमत दाखवावी."

# मॅच्युअर व्हा, तुम्ही आता महापालिकेत नाहीत

## विरोधकांनी 50 खोक्याची घोषणा देताच श्रीकांत शिंदे संतापले

नवी दिल्ली, दि. २९ वृत्तसंस्था

संसदेचं पावसाळी अधिवेशन सध्या सुरू असून ऑपरेशन सिंदूरसंदर्भात सभागृहात चर्चा सुरू आहे. या चर्चेवेळी सत्ताधारी आणि विरोधक आमने-सामने येत असल्याचं पाहायला मिळत आहे. ऑपरेशन सिंदूरवरून सत्ताधारी आणि विरोधक एकमेकांवर जोरदार टीका करताना पाहायला मिळत आहेत. आज लोकसभेत शिवसेना (शिंदे) खासदार श्रीकांत शिंदे यांचं भाषण झालं. यावेळी श्रीकांत शिंदे यांनी विरोधकांवर जोरदार टीका केली.



आपल्या भाषणात बोलताना एका कवितेच्या माध्यमातून ऑपरेशन सिंदूरचं कौतुक केलं. तसेच ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून भारतीय सैनिकांनी न्याय केला असल्याचंही ते म्हणाले. त्यामुळे मी भारतीय सैनिकांचं अभिनंदन करत आहे. प्रत्येक देसवासीयांमध्ये देशभक्तीची ज्वाला आहे. मात्र, तरीही विरोधक या ठिकाणी विचारत आहेत की दहशतवादी पहलगाममध्ये कसे आले? त्या दहशतवाद्यांचं पुढे काय झालं?, असं खासदार श्रीकांत शिंदे बोलत असताना विरोधकांनी अचानक जोरदार घोषणाबाजी केली.

विरोधी पक्षातील काही खासदारांनी '५० खोके एकदम ओके' अशा घोषणा दिल्या. त्यामुळे श्रीकांत शिंदे यांना बोलताना अडथळा निर्माण झाला. त्यामुळे खासदार श्रीकांत शिंदे हे चांगलेच संतापले. त्यामुळे श्रीकांत शिंदे विरोधकांना सुनावताना म्हणाले की, "तुम्ही आता मॅच्युअर व्हा, त्यातून (५० खोके एकदम ओके या घोषणेतून) बाहेर या. तुम्ही आता सभागृहात आहात. देशाच्या संसदेत आलेला आहात. तुम्ही महापालिकेत नाहीत", अशा शब्दांत श्रीकांत शिंदे यांनी विरोधकांना सुनावलं. त्यानंतर विरोधकांनी घोषणाबाजी बंद केली.

# सायबर फसवणूकः महिला डॉक्टरकडून 19 कोटी उकळले

गांधीनगर, दि. २९ वृत्तसंस्था

देशभरात सायबर फसवणुकीच्या अनेक घटना दररोज घडत असून अशा प्रकारच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याची माहिती समोर येत आहे. अनेक लोक ऑनलाईन फसवणुकीला बळी पडत आहेत. त्यामुळे मोठ्या प्रमाणात अनेकांना आर्थिक फसवणुकीला समोरं जावं लागत आहे. अशाच प्रकारची एक घटना गुजरातच्या गांधीनगरमध्ये घडली आहे. गांधीनगरमधील एका महिला डॉक्टरकडून तीन महिन्यांत तब्बल १९ कोटी रुपयांपेक्षा जास्त पैसे उकळल्याची घटना उघडकीस आली आहे. त्यामुळे गांधीनगरमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

गांधीनगर येथील एका महिला डॉक्टरला १५ मार्च रोजी एक फोन आला. त्या फोनच्या माध्यमातून तिला सांगण्यात आलं की तिच्या फोनमध्ये आक्षेपार्ह मजकूर आढळला आहे. त्यामुळे तिचा फोन बंद करण्यात येणार असल्याचं सांगितलं. तसेच तिच्याविरुद्ध मनी लाँड्रिंगचा गुन्हा दाखल करण्याची धमकी संबंधित फोनवरून देण्यात आली. मात्र, सायबर चोरटे एवढ्यावरच थांबले नाहीत. त्यानंतर महिला डॉक्टरला वारंवार फोन सुरू झाले.

दरम्यान, सायबर चोरट्यांनी स्वत:ची ओळख पोलीस अधिकारी असल्याचं सांगितलं होतं. यामध्ये एक उपनिरीक्षक, एक सरकारी वकील आणि इतरांचा समावेश होता. शेवटी या प्रकरणात हेराफेरी करणारे कॉल्स आणि धमकी दिल्यामुळे संबंधित डॉक्टर



महिलेला 'डिजिटल अटक' करण्यात आली आणि यामध्ये महिला डॉक्टरने तीन महिन्यांच्या कालावधीत तिच्या आयुष्यातील बचत आणि मालमत्ता खरेदीसाठी ठेवलेले तब्बल १९ कोटी रुपये ३५ वेगवेगळ्या बँक खात्यांमध्ये हस्तांतरित केले.

एवढंच नाही तर या परिस्थितीचा फायदा घेऊन फसवणूक करणाऱ्या चोरट्यांनी सोन्याच्या दागिन्यांवर कर्ज मिळवून ते पैसे देखील लंपास केले. सतत धमकी देण्यात येणाऱ्या फोनमुळे ही महिला डॉक्टर घराबाहेर पडताना फसवणूक करणाऱ्यांना तिचा ठावठिकाणा सांगत असत. त्यांना मोठ्या प्रमाणात मानसिक छळ करण्यात येत होता. मात्र, त्यानंतर एके दिवशी अचानक कॉल बंद झाले. त्यानंतर त्या महिलेने तिच्या नातेवाईकांना फसवणूक झाल्याचं सांगितलं. मात्र, तो पर्यंत खूप उशीर झाला होता.

दरम्यान, या प्रकरणी आता पोलिसांनी चौकशी सुरू केली असून सुरतमध्ये एका आरोपीला अटक केली आहे. तसेच या प्रकरणातील संशयिताची चौकशी केली जात आहे. जेणेकरून हे नेटवर्क उघड होईल आणि घोटाळयात सहभागी असलेल्या इतर व्यक्तींची ओळख पटेल. तसेच सायबर चोरट्यांनी महिला डॉक्टरकडून १९ कोटी उकळल्यानंतर हे पैसे परत मिळवणं हे पोलिसांसमोर मोठं आव्हान असणार आहे. १६ जुलै रोजी मिळालेल्या तक्रारीच्या आधारे गुजरातमधील सीआयडी क्राईमच्या सायबर सेलने पुढील कारवाई सुरू करण्यात आल्याचं पोलिसांनी सांगितलं आहे.

# काावड यात्रेला गालबोट, बस अपघातात 18 भाविकांचा मृत्यू

देवघर, दि. २९ वृत्तसंस्था

श्रावण महिन्यात काढण्यात येणाऱ्या एका कावड यात्रेला गालबोट लागले आहे. या कावड यात्रेकरूंना घेऊन जाणाऱ्या एका बसला मंगळवारी पहाटे भीषण अपघात झाला. झारखंडच्या देवघर जिल्ह्यातील मोहनपूर पोलीस ठाण्यांतर्गत येणाऱ्या जमुनिया फॉरेस्ट परिसरात हा अपघात झाला. ही बस गॅस सिलेंडर घेऊन जाणाऱ्या एका वाहनावर धडकली. त्यानंतर हा भीषण अपघात घडला. या दुर्घटनेत १८ भाविकांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून, अनेक जण गंभीर जखमी झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, कावड यात्रेकरूंनी भरलेली ही बस बाबा बैद्यनाथ धाममध्ये जलाभिषेक केल्यानंतर दुमका येथील



बासुकीनाथ मंदिराकडे जलाभिषेक करण्यासाठी जात होती. पहाटे ४.३० वाजताच्या सुमारास ही बस मोहनपूर पोलीस ठाण्यांतर्गत येणाऱ्या जमुनिया परिसरात आली. त्यावेळी अचानक एलपीजी सिलेंडर घेऊन जाणारा ट्रक आणि बसमध्ये जोरदार धडक झाली. ही धडक इतकी जोरदार होती की बसचा अक्षरश: चक्काचूर झाला.

या अपघातात सुरुवातीला ५ कावड यात्रेकरूंचा मृत्यू झाला अशी माहिती समोर आली होती. मात्र त्यानंतर खासदार निशिकांत दुबे यांनी मृतांचा आकडा वाढल्याचे सांगत १८ भाविकांचा मृत्यू झाल्याची माहिती दिली. तसेच अन्य अनेक जण गंभीर जखमी असल्याचेही बोललं जात आहे. या भीषण अपघाताची माहिती मिळताच प्रशासनात खळबळ उडाली. यानंतर तातडीने मदत आणि बचाव कार्यासाठी पोलिसांची पथके घटनास्थळी रवाना झाली. या अपघातातील जखमींना अपघातग्रस्त वाहनांमधून बाहेर काढून उपचारांसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. यातील काहींची प्रकृती चिंताजनक आहे.

# विक्रमवीर बालगिर्यारोहक शर्विका म्हात्रे

शर्विका म्हात्रे महाराष्ट्राची 'हिरकणी' म्हणून ओळखली जाते ! तिने दीड वर्षे वयापासून गिर्यारोहण क्षेत्रात पदभ्रमणाला सुरुवात केली. तिने त्यांनंतर अडीच वर्षात म्हणजे वयाच्या चौथ्या वर्षापर्यंत गिर्यारोहण क्षेत्रातील यशाचे शिखर गाठले. शर्विकाने शिवनेरी, हडसर, मंडणगड , कर्नाळा, बाणकोट असे सव्वीस किल्ले वयाच्या चार वर्षात सर केले आहेत ! तिच्यात किल्ल्यांच्या संवर्धनाची जाणीव आहे. तिला गडावर प्लास्टिक टाकू नये ही समज आहे. तिच्या आईचे नाव अमृता आणि वडिलांचे जितेन. त्यांची सर्व आवडनिवड आणि श्रद्धा शर्विकात उतरली आहे. म्हात्रे कुटुंब रायगड जिल्ह्याच्या अलिबाग तालुक्यातील लोणारे या गावचे. गोष्ट घडली ती अशी शर्विकाच्या आईवडिलांना सह्याद्री प्रतिष्ठान ह्या दुर्गसंवर्धन संस्थेची माहिती मिळाली आणि त्यांना त्यांचा छंदच गवसला ! त्या दोघांच्या गडकिल्ल्यांच्या प्रवासाला सुरुवात झाली.

शर्विकाने पहिली यशस्वी मोहीम 26 जानेवारी 2019 रोजी केली, ती महाराष्ट्रातील कठीण दुर्गांच्या यादीत असणारा कलावंतीण सुळका सर करून ! त्यामुळे महाराष्ट्राला तिची ओळख झाली. शर्विका आणि तिचे आईबाबा या तिघांचे किल्ल्यावर जाण्याचे बेत चालत. कधी प्रत्यक्ष जाणेही होई. एके दिवशी, त्यांचे कलावंतीण मोहिमेचे नियोजन ठरले. महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्याच्या पनवेल, कर्जत या तालुक्यांच्या सीमेवर असणारा कलावंतीण सुळका म्हणजे प्रबळगड किल्ल्याचा एक भाग. दगडात कोरलेल्या पायऱ्या, निसरडी वाट,अंगात धडकी भरवणारी खोल दरी, वेडीवाकडी वळणे असा



मुलखावेगळी माणसं

तो सुळका सर करणे म्हणजे एक भयानक अनुभव. परंतु शर्विकाने तो सुळका लीलया सर करून वेगळा इतिहास घडवला !शर्विकाला आणि विशेषतः तिच्या आईवडिलांना त्या गोष्टीची पुसटशीही कल्पना नव्हती, की ती मोहीम त्यांच्या आयुष्याला वेगळे वळण देणारी ठरेल. गडकिल्लेकऱ्यांची संख्या, विशेषतः महाराष्ट्रात झपाट्याने वाढत आहे. 'वीकेण्ड'ला तर मुंबई-पुण्याभोवतीचे उंच उंच सुळके पार करण्याची इर्षाच तरुणांत असते. शर्विकाची कलावंतीण शिखर मोहीम चालू असताना अनेक जण अवाक होऊन तिच्याकडे पाहत होते. शर्विकाचे छोटेपण त्यांना अचंबित करून गेले. शर्विका सुळका आरोहण करत असताना अनेकांनी तिचे व्हिडिओ काढले आणि तिचे व्हिडिओ व्हायरल झाले. शर्विका ही एवढ्या लहान वयात अवघड सुळका सर करणारी महाराष्ट्रातीलच नव्हे तर भारतातील सर्वात लहान कन्या होती ! त्यानंतर मीडिया, वृत्तपत्रे अशा सर्व माध्यमांनी तिच्या कामगिरीची दखल घेतली आणि तिची नोंद 'इंडिया बुक' आणि 'आशिया बुक ऑफ रेकॉर्ड'मध्ये झाली, 'इंडिया बुक'मध्ये तिची भारतातील 'सर्वात लहान गिर्यारोहक' म्हणून नोंद झाली, तर 'आशिया बुक रेकॉर्ड'ने तिला 'ग्रँडमास्टर' हा किताब दिला. अशा प्रकारे, शर्विकाची गिर्यारोहण क्षेत्रात ग्रँड एंट्री झाली.शर्विकाने वयाच्या तिसऱ्या वर्षी 10 ऑक्टोबर 2020 रोजी महाराष्ट्रातील सर्वात उंच असा साल्हेर किल्ला साडेपाच तासांत सर करून कोरोना योद्ध्यांना मानवंदना दिली. तो तिच्या स्वतःच्या नावावरील नोंदला गेलेला सलग पाचवा विक्रम आहे. शर्विकाची कळसुबाई मोहीम 26 जानेवारी 2021 रोजी आखण्यात आली. त्या मोहिमेत शर्विकासोबत पस्तीस जणांची टीम सहभागी झाली होती. त्यामध्ये डॉ. राजाराम हुलवान, पोलिस अधिकारी जयश्री बोरकर, वकील सुधाकर निषाद, शिक्षक अशोक वारगे, ड्रोन ऑपरेटर प्रणित माने आणि साहित्यिक सलोनी बोरकर, दीपक लाल सहभागी झाले होते. शर्विकाने कळसुबाई शिखर अवघ्या तीन तास दहा मिनिटांत सर केले आणि महाराष्ट्रातील सर्वात उंच असलेल्या त्या शिखरावर स्वतःचे नाव कोरणारी ती जगातील सर्वात लहान कन्या ठरली. शर्विकाच्या नावावर वयाच्या साडेतीन वर्षात तब्बल दहा विक्रम आहेत. शर्विकाची 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड'मध्ये तीन वेळा, 'आशिया बुक ऑफ रेकॉर्ड'मध्ये तीन वेळा, 'वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड' (लंडन) मध्ये दोन वेळा, 'डायमंड बुक ऑफ रेकॉर्ड'मध्ये एकदा आणि ओ.एम.जी. रेकॉर्डमध्ये एकदा अशी नोंद झाली आहे.

**लोकमानस**

# टीसीएस 12 हजार जणांना देणार नारळ

बंगळुरू, दि. २९ वृत्तसंस्था

अमेरिकेत AI मुळे टेक उद्योगातील हजारोंनी नोकऱ्या कमी केल्या जात आहेत. आता टेक क्षेत्रातील नोकरकपातीची ही लाट भारतातही सुरु झाली आहे. टाटा समुहातील दिग्गज कंपनी टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस अर्थात टीसीएसने नुकतीच १२ हजार नोकरकपातीची घोषणा केली. दरम्यान, टीसीएसच्या सुमारे १२ हजार कर्मचाऱ्यांची कपात करण्याच्या घोषणेनंतर माहिती तंत्रज्ञान मंत्रालय याबाबतच्या घडामोडींवर लक्ष ठेवून आहे.

आयटी मंत्रालय कंपनीतील परिस्थितीवर जवळून लक्ष ठेवून आहे आणि ते टीसीएस कंपनीच्या संपर्कात आहे. आयटी मंत्रालय इतक्या मोठ्या प्रमाणातील नोकरकपातीचे मूळ कारणे जाणून घेण्याचा प्रयत्न करीत आहे.

भारतातील आघाडीची आयटी सेवा देणारी कंपनी टीसीएसने यावर्षी १२,२६१ कर्मचाऱ्यांना कामावरुन कमी करण्याची योजना आखणे, ही आयटी क्षेत्रासाठी गंभीर बाब मानली जात आहे. ही नोकरकपात त्यांच्या जागतिक स्तरावरील मनुष्यबळाच्या दोन टक्के आहे. या नोकरकपातीचा मध्यम आणि वरिष्ठ व्यवस्थापन पदांवरील कर्मचाऱ्यांना सर्वाधिक फटका बसणार आहे.

३० जून २०२५ पर्यंत टीसीएसमधील कर्मचाऱ्यांची संख्या ६,१३,०६९ इतकी होती. विशेष म्हणजे एप्रिल-जूनदरम्यानच्या तिमाहीत कंपनीत नवीन ५ हजार कर्मचाऱ्यांची वाढ झाली. टीसीएस कंपनीने रविवारी स्पष्ट केले होते की, ही पुनर्रचना भविष्यासाठी सज्ज राहण्याच्या धोरणाशी सुसंगत आहे. टेक्नॉलॉजीमध्ये गुंतवणूक, AI ची अंमलबजावणी, बाजारातील वाढ आणि मनुष्यबळ पुनर्रचना यावर भर दिला जात आहे.

# जातीच्या नावावर राजकारण करता, ज्ञानेश्वरी मुंडेंना का भेटला नाहीत? - करुणा शर्मा

बीड, दि. २९ प्रतिनिधी

जातीच्या नावावर राजकारण करता पण ज्ञानेश्वरी मुंडेंना का भेटला नाहीत असा सवाल करुणा शर्मा यांनी मुंडे बंधु भगिनींना विचारलाय. बीडमध्ये महादेव मुंडे खून प्रकरणात नवे खुलासे होत असताना करुणा शर्मांनी महादेव मुंडे यांच्या पत्नीची ज्ञानेश्वरी मुंडेंची भेट घेतली. त्यानंतर त्यांनी माध्यमांशीही संवाद साधला.पंकजा मुंडे आणि धनंजय मुंडे यांनी देखील येथे भेटायला यायला पाहिजे, तुम्ही जातीच्या नावावर राजकारण केलं पण तुम्ही त्यांना भेट द्यायला येत नाहीत असं त्या म्हणाल्या.



संतोष देशमुख प्रकरण, वाल्मीक कराडशी असणारी निकटचे संबंध यावरून विरोधकांकडून होणारी राजीनामाची मागणी, हत्या प्रकरणाचे फोटो येतात मंत्रिपदाचा द्यावा लागणारा राजीनामा यावरून 200 दिवसांनी वंजारी समाजाच्या राज्यस्तरीय अधिवेशनात धनंजय मुंडे बोलले . यानंतर आता करुणा शर्मांनी महादेव मुंडे कुटुंबीयांची भेट घेत नंतर माध्यमांशी संवाद साधला .

'समाजाच्या प्रोग्राम मध्ये तुम्ही मोठ्या गप्पा मारत आहात .तुम्ही जातीच्या नावावर राजकारण केलं पण तुम्हाला त्यांना भेट द्यायला येता येत नाही ' असे म्हणत माजी मंत्री धनंजय मुंडेंवर टीका केली .

ज्ञानेश्वरी मुंडे यांच्या लढ्यात त्यांना मनोबल देण्यासाठी मी इथे आले आहे .पंकजा मुंडे आणि धनंजय मुंडे यांनी देखील येथे भेटायला यायला पाहिजे, तुम्ही जातीच्या नावावर राजकारण केलं पण तुम्ही त्यांना भेट द्यायला येत नाहीत . समाजाच्या प्रोग्राम मध्ये तुम्ही मोठ्या गप्पा मारत आहात .मी महादेव मुंडे यांच्या कुटुंबाच्या आंदोलनात येणार होते पण तब्येत बरी नसल्यामुळे आले नाही .आज तुम्ही लढत रहा आम्ही सर्वजण तुमच्यासोबत आहोत .कोणीही महिलेचं कुंकू पुसण्याचे हिंमत करणार नाही . असं करुणा शर्मा म्हणाल्या . 'अजित पवार तुम्हाला धनंजय मुंडे यांचे दुःख दिसते पण महादेव मुंडे परिवाराच्या दुःख दिसत नाही .आज ज्ञानेश्वरी मुंडे मी आणि सारंगी महाजन असे आम्ही सगळे लोक अन्यायाविरुद्ध लढत आहोत "असेही करुणा शर्मा म्हणाल्या .

# मर्सिडीज-बेंझच्या पहिल्या अत्याधुनिक लक्झरी कार सुविधेचे उद्घाटन

**चलती का नाम गाडी**

मर्सिडीज-बेंझ या नामांकित मोटार कंपनीने भारतातील प्रवासात एक महत्त्वाचा टप्पा गाठत पटनाच्या पहिल्या लक्झरी कार शोरूमचे उद्घाटन केले आहे. पटनातील नवीन काळातील ग्राहकांच्या वाढत्या आकांक्षांचे प्रतिनिधित्व पटनाने केले आहे ज्यात लक्झरी उत्पादने, सेवा आणि अनुभवांची वाढती क्षमता आहे. 'गो-टू-कस्टमर' रणनीतीचा एक भाग म्हणून, मर्सिडीज-बेंझची पटनातील उपस्थिती वाहनांच्या वाढत्या मागणीला अधोरेखित करते, ज्यामुळे या प्रदेशातील विवेकी ग्राहकांच्या जवळ नेले जाते. हा दीर्घकालीन भागीदार लँडमार्क कार्स



पाटण्यातील थ्री-पॉइंटेड स्टारच्या मूल्यांचे प्रतिबिंबित करणारा जागतिक दर्जाचा ग्राहक अनुभव देईल ग्रुप लँडमार्क ही पटनामधील पहिली लक्झरी 3S सुविधा आहे, जी मर्सिडीज-बेंझची प्रसिद्ध विक्री आणि सेवा ऑफरिंग्ज या प्रदेशातील ग्राहकांच्या जवळ आणते. लक्झरी सुविधेचे एकूण क्षेत्रफळ १६,५०० चौरस फूट आहे. संपूर्ण मर्सिडीज-बेंझ मॉडेल लाइनअप प्रदर्शित केले जाऊ शकते, ज्यामध्ये टॉप-एंड लक्झरी वाहनांचा समावेश आहे ज्यामध्ये एस-क्लास, मर्सिडीज-मेबॅक आणि एएमजी श्रेणीतील परफॉर्मन्स कारचा समावेश आहे 'लँडमार्क कार्स' च्या 3S सुविधेत अत्याधुनिक आर्किटेक्चर आणि डिजिटल सुधारणा आहेत या सुविधेत 60 किलोवॅट डीसी फास्ट चार्जर आहे जो शहरातील सर्व ईव्ही मालकांसाठी खुला आहे मर्सिडीज-बेंझ आता भारतातील ५० शहरांमध्ये उपस्थित आहे आणि १२५ हून अधिक लक्झरी टचपॉइंट्सचे मजबूत नेटवर्क आहे मर्सिडीज-बेंझ कानपूर, वाराणसी, उदयपूर येथे नवीन लक्झरी शोरूमची योजना आखत आहे आणि आग्रा आणि जम्मू सारख्या उदयोन्मुख बाजारपेठांमध्ये लक्झरी शोरूमचे उद्घाटन आधीच केले आहे .

# गणेश मूर्तींच्या उंचीवर मर्यादा असावी का ?

**वाद संवाद**

१] मनोहर त्रिंबक [कार्यकर्ता ]

हो नक्कीच गणेशमूर्ती या कमीत कमी उंचीच्या असाव्यात आणि त्यासाठी सरकारने सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना ठराविक उंचीची मर्यादा देखील घालून दिलेली आहे. मागील काही वर्षांपासून विविध गणेशोत्सव मंडळांमध्ये अक्षरशः गणेश मूर्तींच्या बाबतीत विचित्र स्पर्धा सुरु आहे. मात्र प्लास्टर ऑफ पॅरिस चा वापर करून बनविलेल्या अशा मूर्तींचे समुद्रात विसर्जन करणे अवघड होत आहे. आणि त्याच वेळी या मुर्त्यांचे रासायनिक रंग आणि प्लास्टर ऑफ परिसमुळे जीवांना आणि पर्यायाने पर्यावरणाला देखील धोका पोहचतो आहे. म्हणूनच छोट्या गणेशमूर्ती बनवून सार्वजनिक मंडळांनी खऱ्या अर्थाने पर्यावरणपूरक असा गणेशोत्सव साजरा करावा.

२] विद्याधर वालावलकर [पर्यावरण अभ्यासक ]

खरं तर आपल्याकडे अलीकडच्या काही दशकांमध्ये सण आणि उत्सवाचं बाजारीकरण होताना दिसतेय आणि त्यातूनच विविध सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांमध्ये गणेश मूर्तींच्या उंचीची जीवघेणी स्पर्धाच सुरु असलेली दिसतेय. गणेशोत्सव हा श्रद्धेचा एक भाग असेल तर त्यात अशी मूर्तींच्या उंचीची जीवघेणी स्पर्धा हवीच कशाला? मागील काही वर्षांपासून गणेश विसर्जनानंतर अशा प्रकारच्या प्लास्टर ऑफ पॅरिसचा अंतर्भाव असलेल्या गणेशमूर्ती मुळे समुद्रातील आणि तलावातील मासे आणि इतर जलजीव मोठ्या प्रमाणात प्रदूषणामुळे मृत्युमुखी पडताना दिसताहेत. त्यामुळेच काही मासे दुर्मिळ होत आहेत. पर्यावरणाचे हे धोकादायक संकेत वेळीच ओळखून आपण अशा प्रकारच्या उत्सवांवर नियमांची मर्यादा आखून घ्यायलाच हवी.

संकलन –संयोजन
सुबोध रणशेवरे
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# 2021 पासून आतापर्यंत टायगर रिझर्वच्या बाहेर 50 टक्क्यांहून अधिक वाघांचे मृत्यू

नवी दिल्ली, दि. २९, वृत्तसंस्था

भारतामध्ये २०२१ सालापासून आतापर्यंत जेवढे वाघांचे मृत्यू झाले आहेत, त्यापैकी निम्म्याहून अधिक वाघांचे मृत्यू टायगर रिझर्वच्या बाहेर झाले आहेत. यामध्ये सर्वाधिक मृत्यू महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशमधून नोंदवले गेले आहेत. ही माहिती सरकारच्या आकडेवारीतून समोर आली आहे.

राष्ट्रीय वाघ संरक्षण प्राधिकरण (एनटीसीए) नुसार, २०२१ ते २०२५ या कालावधीत एकूण ६६७ वाघांचे मृत्यू झाले असून त्यापैकी ३४१ म्हणजेच ५१ टक्के वाघांचे मृत्यू टायगर रिझर्वच्या बाहेर झाले आहेत. वर्षनिहाय आकडेवारीनुसार, २०२१ मध्ये १२९, २०२२ मध्ये १२२, २०२३ मध्ये १८२, २०२४ मध्ये १२६ आणि २०२५ मध्ये आतापर्यंत १०८ वाघांचे मृत्यू झाले आहेत. यापैकी टायगर रिझर्वच्या बाहेर २०२१ मध्ये ६४, २०२२ मध्ये ५२, २०२३ मध्ये १००, २०२४ मध्ये ६५ आणि २०२५ मध्ये आतापर्यंत ६० वाघांचे मृत्यू झाले आहेत.

महाराष्ट्रात सर्वाधिक १११ वाघांचे मृत्यू टायगर रिझर्वच्या बाहेर झाले आहेत, त्यानंतर मध्य प्रदेशमध्ये ९० अशा मृत्यूंची नोंद झाली आहे. २०२१ मध्ये महाराष्ट्रात २३, मध्य प्रदेशात १८, केरळमध्ये ५ आणि तेलंगणामध्ये ४ वाघांचे मृत्यू रिझर्वच्या बाहेर झाले. २०२२ मध्ये महाराष्ट्रात १८, मध्य प्रदेशात १२, आणि केरळ व उत्तराखंडमध्ये प्रत्येकी ४-४ वाघांचे मृत्यू रिझर्वच्या बाहेर नोंदवले गेले.

२०२३ मध्ये महाराष्ट्रात ३४, मध्य प्रदेशात १३, केरळ व उत्तराखंडमध्ये प्रत्येकी ११-११ आणि कर्नाटकमध्ये ६ वाघांचे मृत्यू टायगर रिझर्वच्या बाहेर झाले. २०२४ मध्ये मध्य प्रदेशात २४ आणि महाराष्ट्रात १६ वाघांचे मृत्यू रिझर्वच्या बाहेर झाले. २०२५ मध्ये आतापर्यंत महाराष्ट्रात २०, मध्य प्रदेशात १३, केरळमध्ये ८ आणि कर्नाटकमध्ये ७ वाघांचे मृत्यू रिझर्वच्या बाहेर झाले आहेत.

एनटीसीएच्या आकडेवारीनुसार, २०१२ ते २०२४ या काळात एकूण १,५१९ वाघांचे मृत्यू झाले असून त्यापैकी ६३४ म्हणजेच ४२ टक्के वाघांचे मृत्यू टायगर रिझर्वच्या बाहेर नोंदवले गेले. सध्या भारतामध्ये अंदाजे ३,६८२ वाघ असून त्यापैकी सुमारे ३० टक्के वाघ टायगर रिझर्वच्या बाहेर वास्तव्य करत आहेत.